


# जनमाध्यम


paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १८ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# क्रीडामंत्री कोकाटेंचा राजीनामा

## राज्यपालांकडूनही मंजूर, खाते अजित पवारांकडे वर्ग

**मुंबई/प्रतिनिधी :** क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. राज्यापल आचार्य देवव्रत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्राचा संदर्भ देत खातेबदल पत्रावर मंजुरी दिली आहे. त्यामुळे, राज्याच्या राजकीय वर्तुळातील ही सर्वात मोठी बातमी असून आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच माणिकराव कोकाटे यांच्याकडील सर्व खात्यांची जबाबदारी असणार आहे. माणिकराव कोकाटे यांनी अजित पवारांकडे आपला राजीनामा दिला होता. त्यानंतर, सर्व घडामोडी वेगाने घडल्या आहेत. सदनिका घोटाळाप्रकरणी जिल्हा न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यानंतर माणिकराव कोकाटे आज सकाळीच मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांच्यावर तिथे उपचार सुरू असल्याची माहिती आहे. दरम्यान, अजित पवारांकडे आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर माणिकराव कोकाटे यांची खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. नाशिक सत्र न्यायालयाने काल (मंगळवारी, ता १६) सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यामुळं माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली होती. विरोधी पक्ष माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झाले होते. कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मात्र, त्याची सुनावणी शुक्रवारी होणार आहे, त्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचं समोर आलं आहे.



■ **कोकाटे बिनखात्याचे मंत्री-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटेंचं मंत्रीपद काढून घेतलं आहे. माणिकराव कोकाटेंची खाती अजित पवारांकडे वर्ग करण्यात आल्याने ते आता बिन खात्याचे मंत्री बनले आहेत. क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग ही खाती अजित पवारांकडे सोपवली गेली आहेत. मुख्यमंर्त्यांनी राज्यपालांना पत्र दिल्यानंतर राज्यपालांकडूनही त्यास मंजुरी देण्यात आली.

■ **कोकाटेंविरुद्ध अटक वॉरंट जारी**

सदनिका घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वारंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज युक्तिवाद होउन न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वारंट जारी केले. हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. तसेच, कोकाटे यांना कधी अटक केली जाणार हे पाहता येईल.

■ **सदनिका लाटल्याचे प्रकरण** मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणा-या सदनिका बनावट दस्तावेज देउन लाटल्याचा आरोप माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाउ विजय कोकाटे यांच्यावर करण्यात आला होता. त्यांना प्रत्येकी दोन वर्षाचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा झाल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.कमी उत्पन्न असणा-या व्यक्तीला शासनाकडून म्हणजे मुख्यमंत्री कोट्यातून कमी दरात सदनिका उपलब्ध केली जाते. त्यासाठी संबंधिताला आपल्या नावावर कुठेही सदनिका नसल्याचे प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतात. माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी १९९५ मध्ये अशी कागदपत्रे सादर करून नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्हू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून दोन सदनिका प्राप्त केल्या. इतकेच नव्हे तर, या इमारतीतील अन्य दोन सदनिका इतरांनी मिळवल्या, त्याचा वापर कोकाटे बंधूंकडून केला जात होता. या संदर्भात तक्रारी झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने चौकशी केली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नागरी जमीन (कमाल मर्यादा विनियमन) विभागाचे तत्कालीन विश्वनाथ पाटील यांनी कोकाटे, ➩(पान २ वर)

## धनुभाऊ थेट दिल्लीत, अमित शाहांच्या भेटीने राजकीय वर्तुळात खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सदनिका घोटाळाप्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वारंट जारी केले आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. नाशिक उच्च न्यायालयाने काल माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यावरुन राज्यातील वातावरण चांगलेच तापल्याचं बोललं जात आहे. माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी देखील विरोधकांकडून केली जात आहे. अशातच माजी मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.



■ **धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणार असल्याची चर्चा-** दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांनी अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. माणिकराव कोकाटे यांच्या जागी धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. त्यामुळं मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेणार असल्याचीही चर्चा सुरु आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांनी दिल्लीत अनेक राजकीय नेत्यांच्या भेटी घेतल्याची देखील माहिती मिळत आहे. जवळपास एक तास धनंजय मुंडे हे संसद भवनात होते. ११ वाजता ते संसद भवनात आले होते. त्यानंतर त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. त्यामुळं धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळात वापसी होणार असल्याचं बोललं जात आहे. अद्याप, याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी देखील अद्याप काही माहिती दिलेली नाही. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे हे दिल्लीत आहेत. त्यामुळं धनंजय मुंडे यांचा दिल्ली दौरा महत्वाचा मानला जात आहे.

■ **माणिकराव कोकाटे यांना अटक होण्याची शक्यता**

राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वारंट जारी केले आहे. त्यामुळे मंत्री ➩(पान २ वर)

## आपण निवडणुकीत बाता मारणारे लोक नाहीत-मुख्यमंत्री



### जोपर्यंत देवाभाऊ आहे तोपर्यंत लाडकी बहिण योजना बंद होणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. जोपर्यंत देवाभाउ आहे तोपर्यंत ही योजना बंद होनार नसल्याचे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आपल्याला पारदर्शी कारभार आणायचा आहे. कोणतीही गुंडा गर्दी करायची नाही असे ते म्हणाले. अंबरनाथमध्ये ऐआयोजीत करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. आपण निवडणूका आल्या की बाता मारणारे लोक नाहीत असे म्हणत त्यांनी विरोधकांनाही टोला लगावला.

***अंबरनाथकरांसाठी १५ डब्यांची लोकल सुरू करणार-*** अंबरनाथकरांसाठी १५ डब्यांची लोकल सुरू करणार आहोत. १० ते १५ मिनिटांनी लोकल सेवा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. अंबरनाथ बदलापूरला लोकलच्या प्रवासाची सवय झाली आहे. मी देखील लोकलने प्रवास केला आहे आता सवय राहिली नाही असे मुख्यमंत्री म्हणाले. मात्र लोकल सेवा एसी लोकल मध्ये रूपांतर होणार आहे. ➩(पान २ वर)

## लोकसभेत अणुउर्जा विधेयक मंजूर

### 'VB-जी राम जी' विधेयकावर चर्चा: कृषी मंत्री म्हणाले- बिलात रोजगाराचे दिवस 100 वरून 125 केले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेत बुधवारी 'विकसित भारत-रोजगार आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) म्हणजेच (VB-जी राम जी) विधेयक, २०२५' वर सायंकाळी ५.४० वाजता चर्चा सुरू झाली. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, विरोधकांना विनंती आहे की त्यांनी चर्चेनंतर त्यांचे उत्तर नक्की ऐकावे. ते म्हणाले की, या विधेयकात गावांमध्ये दरवर्षी रोजगार १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढवण्याची हमी दिली आहे. हे विधेयक गावांना दारिद्र्यमुक्त करेल.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सदन या विधेयकांवर दीर्घ चर्चा करेल आणि गरज पडल्यास रात्रीपर्यंत कामकाज सुरू राहील. यापूर्वी लोकसभेने लोकसभेत 'सस्टेनेबल



हार्नेसिंग ऑफ अटामिक एनर्जी फार ट्रान्सफार्मिंग इंडिया (SHANTI) विधेयक' मंजूर केले. तर, काँग्रेस संसदीय दल कार्यालयात काँग्रेस खासदारांची बैठक झाली आणि काँग्रेसने आपल्या खासदारांना व्हिप जारी केला. यानंतर काँग्रेस खासदारांनी संसदेबाहेर 'जए-जी राम जी' विधेयकाविरोधात निदर्शनेही केली. 'जी राम जी' विधेयकावरील चर्चेदरम्यान, टीएमसी खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या की, मनरेगा योजनेचे नाव बदलून हे विधेयक महात्मा गांधींच्या रामराज्याच्या कल्पनेला अक्षरशः नष्ट करते. त्यांनी आरोप केला की मनरेगा नाव बदलून सरकार ➩(पान २ वर)

## संसदेने विमा क्षेत्रात १००% FDIचे विधेयक मंजूर केले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदने विमा क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीची (FDI) मर्यादा ७४% वरून १००% पर्यंत वाढवणारे विधेयक मंजूर केले आहे. 'सर्वांसाठी विमा, सर्वांचे संरक्षण (विमा कायदा सुधारणा) विधेयक, २०२५' ला राज्यसभेने बुधवारी ध्वनी मताने मंजुरी दिली. तर




लोकसभेने ते एक दिवसापूर्वीच मंजूर केले होते. या बदलामुळे परदेशी कंपन्या

■ ***आता परदेशी कंपन्या पूर्णपणे मालक होऊ शकतील***
■ ***प्रीमियम स्वस्त होण्याची शक्यता***

भारतात विमा कंपन्यांच्या पूर्ण मालक होउ शकतील. ज्यामुळे या क्षेत्रात अधिक भांडवल येईल आणि विमा संरक्षण वाढेल. हे विधेयक विमा कायदा १९३८, जीवन विमा महामंडळ कायदा १९५६ आणि ➩(पान २ वर)

## वाल्मिक कराडचा उच्च न्यायालयाने जामीन फेटाळला

**छत्रपती संभाजीनगर /मुंबई/ प्रतिनिधी :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात कराडने दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. वाल्मिक कराडने औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सविस्तर सुनावणी झाली. मात्र, सरकारी पक्षाचा युत्तीवाद त्या दिवशी पूर्ण होउ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणी १६ डिसेंबर रोजी ठेवली होती. त्यानंतर आज अंतिम निर्णय देत न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज नामंजूर केला. ही सुनावणी न्यायमूर्ती सुशिल एम. घोडेस्वार यांच्या न्यायालयात पार पडली. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांविरोधात खून तसेच मकोका कायद्याअंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पासून वाल्मिक कराड कोठडीत आहे. दीर्घकाळ कोठडीत असल्याने आणि आपल्याला जामीन



### उच्च न्यायालयाचा मोठा झटका संतोष देशमुख हत्या प्रकरण

मिळावा यासाठी त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणातील गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे पाहता न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला आहे.

**हत्येच्या वेळी कराड दूर असल्याचा दावा-** कराडच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ शिरीष गुप्ते यांनी जोरदार युत्तीवाद केला होता. त्यांनी असा दावा केला की, कराडला ➩(पान २ वर)

## आता नोकरी जॉईन करणार नाही

### ■ CM नितीश यांनी हिजाब ओढला,
### ■ डॉक्टर परवीन नुसरतने बिहार सोडले

**पाटणा/वृत्तसंस्था :** मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी ज्या महिला डॉक्टर नुसरत परवीन यांचा हिजाब ओढला होता, त्यांनी बिहार सोडले आहे. त्या आता कोलकात्यात त्यांच्या कुटुंबाकडे परत गेल्या आहेत. १५ डिसेंबर रोजी ही घटना घडली, त्यानंतर दुस-याच दिवशी नुसरत कोलकात्यात त्यांच्या कुटुंबाकडे परत आल्या. त्या अभ्यासात खूप हुशार आहेत. डॉक्टर बनणे हे त्यांचे स्वप्न होते. सध्या त्या बिहार सरकारची नोकरी जॉईन करणार नाहीत. कुटुंब नुसरत परवीन यांना समजावण्याचा प्रयत्न करत आहे, पण त्या पुन्हा बिहारमध्ये येउन नोकरी जॉईन करण्याचे धाडस करू शकत नाहीत.

घटनेनंतर नुसरत परवीन धक्का बसलेल्या अवस्थेत आहेत. कुटुंब त्यांना सतत समजावत आहे, पण त्या समजून घेण्यास तयार नाहीत. कुटुंबाने बिहारला परत येण्याचा आणि नोकरी जॉईन करण्याचा निर्णय आता नुसरत यांच्यावरच सोडला आहे.१५ डिसेंबर रोजी त्यांनी सर्वात आधी आपल्या भावाला फोन करून घटनेची माहिती दिली होती. फोनवर बोलताना त्या भावूक झाल्या होत्या. भावाने त्यांना कोलकाता येथे येण्यास सांगितले, त्यानंतर त्या दुस-या दिवशी कोलकाता येथे आल्या. नुसरतचे म्हणणे आहे की, मुख्यमंत्री जे काही केले ते त्यांनी जाणूनबुजून केले असे मी म्हणत नाही, पण जे घडले ते मला आवडले नाही. तिथे खूप लोक होते. काहीजण तर हसत होते. एक मुलगी म्हणून ते माझ्यासाठी अपमानासारखे होते. मी शाळेपासून कॉलेजपर्यंत हिजाबमध्येच राहून शिक्षण घेतले. घर असो, मार्केट



असो किंवा मॉल, प्रत्येक ठिकाणी मी हिजाब घालून गेले. असे कधीच घडले नाही. अबू-अम्मीनेही घरात नेहमी हेच शिकवले. हिजाब आमच्या संस्कृतीचा भाग आहे.

## स्वर्गीय राजीव सातव यांच्या पत्नी आ.प्रज्ञा यांचा भाजप प्रवेश ठरला

**छत्रपती संभाजीनगर-** हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजप प्रवेश ठरल्याची माहिती आहे. त्यांचे कार्यकर्त्यांनी मुंबई गाठली आहे. डॉ. प्रज्ञा सातव या दिवगंत काँग्रेस नेते राजीव सातव यांच्या पत्नी आहेत. राजीव हे २०१४ ते २०१९ दरम्यान हिंगोलीचे खासदार होते. गांधी घराण्याच्या अत्यंत जवळचे असलेल्या राजीव यांचं २०२१ मध्ये निधन झालं. प्रज्ञा सातव यांचा उद्याच (१८ डिसेंबर) भाजप प्रवेश होणार असल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी गटबाजीला कंटाळून निर्णय घेतल्याची चर्चा आहे.



दरम्यान, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी या पक्षप्रवेशात तथ्य नसल्याचे म्हटलं आहे. स्वर्गीय राजीव सातव यांच्या निधनानंतर काँग्रेसकडून त्यांची विधानपरिषदेवर वर्णी लावण्यात आली होती. राजीव सातव हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जात होते.




## उमेदवारी अर्जावर निवडणूक निर्णय अधिका-यांचा निर्णय अंतिम राहणार

### कॅबिनेट बैठकीत सरकारचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीपूर्वी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने आज महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणा-या किंवा स्वीकारण्यास नकार देणा-या निवडणूक अधिका-याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते.

**निवडणुका कालबद्धरित्या घेणे होणार शक्य-** मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणा-या किंवा स्वीकारण्यास नकार देणा-या निवडणूक निर्णय अधिका-याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात



आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली.

**अतिक्रमणे रोखण्यासाठी समिती-** याच बैठकीत गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारक परिसरातील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंर्त्यांच्या नेतृत्वात एक समिती स्थापन करण्याचाही निर्णय हातावेगळा करण्यात आला. या निर्णयानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या यापूर्वीच्या शासन निर्णयातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही समावेश करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य मंर्त्यांच्या नेतृत्वातील समितीत महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, पर्यटन मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, वन मंत्री, बंदरे व विकास मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव, प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिव यांचा समावेश असणार आहे.

**जिल्हास्तरीय समितीत ४ अशासकीय सदस्य-** राज्यस्तरीय समितीमध्ये ४ निमंत्रित सदस्यांचा समावेश करण्यास तसेच प्रत्येक जिल्ह्यात गठीत करण्यात येणा-या जिल्हास्तरीय समितीमध्ये ४ अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. हे अशासकीय सदस्य गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांचे अभ्यासक असावेत किंवा संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती अथवा स्वयंसेवी संस्था असावी, अशी अट ठेवण्यात आली आहे.



# अर्जुन नगर,नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनीत सांडपाण्याची समस्या

## नाली, अंडरग्राउंड पाइपही नाही

**अमरावती/प्रतिनिधीः-** अर्जुन नगर परिसरातील नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनी या दोन्ही वसाहतींमध्ये सांडपाणी व्यवस्थेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून परिस्थिती आता अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचली आहे. या भागातील घरांमधून बाहेर पडणारे सांडपाणी मुख्य नालीमध्ये जाण्यासाठी ना नियोजित उघडी नाली उपलब्ध आहे, ना अंडरग्राउंड ड्रेनेज पाइपलाइन टाकण्यात आलेली आहे. परिणामी सांडपाणी मोकळ्या जागेत, झुडपांमध्ये व रस्त्यालगत साचत असून परिसरात भीषण अस्वच्छता निर्माण झाली आहे.

साचलेल्या सांडपाण्यामुळे चिखल, प्लास्टिक व घरगुती कचऱ्याचे ढीग तयार झाले आहेत. संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचे व इतर कीटकांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया,



टायफॉईडसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. लहान मुले, वृद्ध नागरिक, महिला व आजारी व्यक्ती यांचे आरोग्य थेट धोक्यात आले आहे.

या परिस्थितीत सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे महानगरपालिकेने आजवर या भागात कोणतीही स्वच्छता मोहीम राबवलेली नाही. हे प्रशासनाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असून, मूलभूत नागरी सुविधा देण्यात महानगरपालिका सपशेल अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिक रहिवाशांनी वारंवार स्वच्छता विभाग, ड्रेनेज विभाग तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. तात्पुरतेही उपाय न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व संताप व्यक्त होत आहे.

पावसाळ्याच्या काळात ही समस्या आणखी भयावह होण्याची शक्यता असून साचलेले सांडपाणी घरांमध्ये शिरण्याचा धोका आहे.

नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनीतील नागरिकांची ठाम मागणी आहे की, महानगरपालिकेने तातडीने या संपूर्ण परिसराची जबाबदारी घ्यावी,

साचलेले सांडपाणी व कचरा पूर्णपणे हटवावा आणि या दोन्ही वसाहतींचे सांडपाणी मुख्य नालीशी जोडण्यासाठी योग्य उघडी नाली किंवा अंडरग्राउंड ड्रेनेज पाइपलाइन त्वरित टाकावी. तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी व शास्त्रीय पद्धतीने ड्रेनेज व्यवस्था उभारावी.

प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष न दिल्यास नागरिकांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा स्पष्ट इशाराही स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.

# बनावट नोटा प्रकरणात आरोपीस १० वर्षांची सक्तमजुरी

## -अमरावती जिल्हा न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

अमरावती/प्रतिनिधीः- बनावट चलन नोटा वापरणे व त्या व्यवहारात आणण्याच्या गंभीर गुन्ह्यात अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय क्र. १ यांनी आरोपीला कठोर शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश रितेश गो. वाघमारे यांच्या न्यायालयाने आरोपी अरशीद खान रशीद खान (रा. हैदरपुरा, अमरावती) याला दोषी ठरवून १० वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा ठोठावली आहे. ही घटना १२ जुलै २०१५ रोजी बापट चौक येथील के. एन. जयस्वाल देशी दारू दुकानात घडली होती.

फिर्यादी आनंद नंदकिशोर जयस्वाल यांच्या दुकानात आरोपी दारू खरेदीसाठी आला होता. त्याने काऊंटरवर १०० रुपयांची नोट दिली, मात्र दुकानातील कर्मचारी सचिन खोंडे यांना ती नोट संशयास्पद वाटली. नोट बनावट असल्याचे लक्षात येताच आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र फिर्यादी व कर्मचाऱ्यांनी त्याला अडवून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात सुपूर्द केले. पोलिसांनी आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून २० बनावट १०० रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या. तपासादरम्यान या नोटांवर 'Examine Chali Currency Note Press – Counterfeit Note' असे चिन्ह असल्याचे आढळून आले. पुढील तपासात या नोटा नाशिक येथील शासकीय मुद्रणालयातून चोरीला गेलेल्या बनावट नोटांपैकीच असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. तपास सुरुवातीला पोलीस उपनिरीक्षक विजय चव्हाण यांनी केला, तर पुढील तपास गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांनी पूर्ण केला व दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकारीं पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. दिलीप डी. तिवारी यांनी प्रभावी युक्तिवाद करत एकूण ९ साक्षीदार तपासले. सर्व पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीस कलम ४८९ (ब) अंतर्गत १० वर्षे सक्तमजुरी व ५,००० रुपये दंड (दंड न भरल्यास १ वर्ष अतिरिक्त सक्तमजुरी), कलम ४८९ (क) अंतर्गत ७ वर्षे सक्तमजुरी व २,००० रुपये दंड (दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद) अशी शिक्षा सुनावली. कोर्ट पैरवी म्हणून प्रणाली म्हाला यांनी कामकाजा पाहिले.

# उमेद पंख विश्वासाचे

## निशुल्क कृत्रिम अंगरोपण उपक्रमाचा आजपासून शुभारंभ




**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षण महर्षी कृषिरत्न पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त दिव्यांग बंधू भगिनींसाठी उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमाचा शुभारंभ १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे सकाळी ११ वाजता या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ प्रमुख मान्यवरांचे उपस्थित होणार आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेट क्रॉस सोसायटी अकोला, रामेश्वर मनियार आर्किटेक्ट, अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांना निशुल्क कृत्रिम अवयवाटप करण्यात येणार आहे.या ऐतिहासिक उपक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## क्रीडामंत्री कोकाटेंचा

त्यांचे बंधू विजय कोकाटे यांच्यासह एकूण चार जणांविरुद्ध बनावट दस्तावेजाच्या आधारे सदनिका मिळवत शासनाची फसवणूक केल्याबाबत तक्रार दिली होती. त्यावरून चार जणांविरुध्द सरकारवाडा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## धनुभाऊ थेट दिल्लीत,

माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. नाशिक उच्च न्यायालयाने काल (मंगळवारी, ता १६) सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यानंतर सदनिका घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वारंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

## आपण निवडणुकीत बाता

देवभाउ जो बोलता है ओ करता है जो नही बोलता ओ डेफिनेटली करता है. देवभाउ जो बोलता है ओ करता है जो नही बोलता ओ डेफिनेटली करता है असेही मुख्यमंत्री म्हणाले. गेली अनेक वर्षे धरण तीच आहेत. शहराकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. मी मुख्यमंत्री झाल्यापासून माझ्याकडे इरिगेशन होते.

## लोकसभेत अणुउर्जा

गांधी आणि राष्ट्रपिता महात्मा ही पदवी देणा-या रवींद्रनाथ टागोर दोघांचाही अपमान करत आहे. हे विधेयक दर्शवते की सरकार 'कोणाचाही आधार नाही, विकास नाही, कोणाचाही आधार नाही, रहीमचा विकास नाही, रामचा विकास नाही' यावर विश्वास ठेवते.

## संसदेने विमा क्षेत्रात

IRDAI कायदा १९९९ मध्ये सुधारणा म्हणजेच बदल करते. मुख्य बदल म्हणजे FDI मर्यादा १००% करणे हा आहे. याव्यतिरिक्त, पालिसीधारकांच्या चांगल्या संरक्षणासाठी पालिसीधारक शिक्षण आणि संरक्षण निधी तयार केला जाईल. बिगर-विमा कंपनीचे विमा कंपनीसोबत विलीनीकरण देखील सोपे होईल. आतापर्यंत या क्षेत्रात FDI मधून ८२,००० कोटी रुपये आले आहेत.

## वाल्मिक कराडचा उच्च

अटक करताना पोलिसांनी अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिली नाहीत, त्यामुळे ही अटक बेकायदेशीर ठरते. तसेच, या प्रकरणात मकोका कायदा चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला असून मकोका लागू करण्यासाठी दिलेली मंजुरीही नियमबा असल्याचा युक्तीवाद करण्यात आला. याशिवाय, संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी वाल्मिक कराड घटनास्थळापासून शेकडो किलोमीटर दूर असल्याचा दावा करत, त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगण्यात आले. कराडला खोट्या पद्धतीने गोवण्यात आले असून, त्याच्याविरोधात थेट पुरावे नसल्याचा मुद्दा उपस्थित करत जामीन देण्याची मागणी करण्यात आली होती.

## दोन कारसह दुचाकीचा भीषण

झाले. दरम्यान तेवढया तिवसावरून येणाऱ्या एम एच ३४ ए एम ५४७७ क्रमांकांच्या भरधाव स्कोडाने केने यांच्या स्विफ्ट डिझायर या कारला जबर धडक दिली. ज्यात अनिल खारकर व निलेश लोंदे हे गंभीर जखमी झाले. खारकर यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीसांनी धाव घेत सर्व जखमीना तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जखमींची प्रकृती पाहता डॉक्टरांनी सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा रुग्णालय पाठविले. मृतक अनिल खारकर यांच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून दोन्ही कार चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

## व्यापाऱ्याला १६.५३ लाखांने

झारखंडमधील जामतारा येथून अटक करण्यात अमरावती सायबर पोलिसांना यश आले. माहितीनुसार ९ नोव्हेंबर रोजी शहरातील श्री राधे ऑईल मिलचे मालकाच्या व्हॉट्स ॲपवर 'पाण्याचे कनेक्शन कापण्यात येणार आहे' असा बनावट संदेश पाठवण्यात आला. या संदेशा सोबत पाठवण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करताच फिर्यादीचा मोबाईल हॅक झाला. यानंतर सायबर गुन्हेगारांनी फिर्यादी यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यातून एकूण १६ लाख ५३ हजार १८६ इतकी मोठी रक्कम विविध व्यवहारांद्वारे काढून घेतली.या प्रकरणी सायबर पोलीस ठाणे, येथे कलम ३१८(४), ३१९(२), ६१(२) तसेच आयटी ॲक्ट कलम ६६(क), ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, फसवणुकीतील काही रक्कम क्रेडिट कार्डद्वारे ट्रान्सफर करण्यात आली होती. फिर्यादीच्या खात्यातून झालेल्या एकूण ९ व्यवहारांपैकी १ लाख ४५ हजार व १ लाख २० हजार असे दोन व्यवहार आरबीएल बँकेच्या क्रेडिट कार्डवर झाल्याचे स्पष्ट झाले. या क्रेडिट कार्डचे तपशील विविध एजंट्स मार्फत मृणाल उर्फ विक्रम पांडे याच्या पर्यंत पोहोचवण्यात आले होते. आरोपीने १२ नोव्हेंबर रोजी या तपशीलांचा वापर करून फसवणुकीची रक्कम ट्रान्सफर केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा ठावठिकाणा ग्राम हरिराखा, जि. जामतारा (झारखंड) असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वरिष्ठांच्या परवानगीने सायबर पोलिसांचे विशेष पथक झारखंडला रवाना झाले. पथकाने डुंबरिया चौक, जामतारा येथून आरोपी मृणाल बलाईचंद्र पांडे (वय २६) याला शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीच्या घराची झडती घेतली असता १० क्रेडिट/डेबिट कार्ड , २ पासबुक ,२ चेकबुक, आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती २, मोबाईल फोन व रोख १४ हजार ५०० रूपये असा मुद्देमाल जप्त केला.आरोपीचे आंतरराज्यीय सायबर गुन्हेगार टोळीशी घनिष्ठ संबंध असल्याचे उघड झाले आहे. आरोपीला पोलीस कोठडी रिमांडवर घेऊन पुढील तपास सुरू असून, या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त शाम घुगे, रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोनि संदीप चव्हाण, पो.नि. महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शना खाली सहायक निरीक्षक प्रियंका कोटावार, अनिकेत कासार, विशाल यादव, निखिल माहुरे, उल्हास टवलारे, अश्विनी यादव, रोशन लकडे, अनिकेत वानखडे, सुषमा आठवले यांनी केली.

## दर्यापूर येथील राष्ट्रीय लोक

काढली. एकाच दिवसात व एकाच निर्णयात या सर्व प्रकरणांमधील पक्षकारांची कायमची कोर्टबाजीतुन सुटका झाली.

लोक न्यायालयात तडजोड केल्यामुळे सदर पक्षकारांचा वेळ व पैसा वाचला तसेच मानसिक त्रासातुन त्यांची सुटका झाली.

दर्यापूर येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालयातील एकूण १४ प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये महावितरण कंपनीने दाखल केलेली ११ प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाईची ११ प्रकरणे व २ दिवाणी प्रकरणे निकाली काढण्यात आली. जिल्हा न्यायालयातील प्रकरणांसाठी तालुका विधि सेवा समितिचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधिश सत्यवान डोके हे पॅनल प्रमुख होते. तर ॲड. वैभव इंगळे यांनी पॅनल वरील सदस्य म्हणुन काम पाहीले.

लोकन्यायालयामध्ये एकून ४ पॅनल तयार करण्यात आले होते. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर महेश शिलार, न्यायाधिश. ए. एम. जोशी व न्यायाधिश एस. डी. कमलाकर यांनी पॅनल प्रमुख म्हणुन काम पाहीले.

सदर लोक न्यायालय यशस्वी होण्यासाठी दर्यापूर तालुका वकील संघाने सकारात्मक भूमिका घेवुन सहकार्य केले. आपली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवुन पक्षकारांनी देखील चांगला प्रतिसाद दिला. लोकन्यायालय यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी भरपूर परिश्रम घेतले. तालुका विधि सेवा समितीचे कामकाज पाहत असलेले न्यायालयीन कर्मचारी सिद्धार्थ लोणारे व अभिजीत धांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महसूल मंत्री बावनकुळे यांच्या

व सेवा विषयक विविध मागण्यांचा निपटारा न झाल्यामुळे महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आणि दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. महसूल विभागाद्वारा शासनाच्या अनेक महत्वाकांक्षी व जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमल बजावणी करण्यात येते. सर्वसामान्य जनतेशी संबंधित कामे व समस्यां सदर्भात महसूल विभाग कार्यरत असल्याने जनमानसात विभागाबाबत आदराची व आपुलकीची भावना आहे. तथापी, महसूल मंत्री महोदयांच्या मार्फत विधिमंडळात अधिकारी व कर्मचारी यांच्या होणाऱ्या एकतर्फी निलंबनांच्या घोषणांमुळे व सर्वसामान्यांसमक्ष दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे जनमानसात महसूल विभागाची प्रतिमा खालावत आहे. तसेच महसूल अधिकारी व कर्मचारी यांना सातत्याने मानसिक तणावाखाली काम करावे लागत आहे. हिवाळी अधिवेशनात १२ डिसेंबर रोजी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूल मंत्र्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणत्याही चौकशी समितीचा अहवाल नसताना, संबंधिताचे म्हणणे न एकता चार तहसीलदार, चार मंडळ अधिकारी, दोन ग्राम महसूल अधिकारी यांना निलंबित करण्याची घोषणा केली. १३ डिसेंबर रोजी भंडारा जिल्ह्यातील पवनी येथील तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांचे निलंबन व तत्कालीन तहसीलदाराविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्याचे जाहीर केले. महसूल मंत्री यांच्या कार्यकाळात केवळ एका वर्षात महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विक्रमी संख्येने निलंबन झाले असून कर्मचाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे. याविरुद्ध १९ डिसेंबर पासून राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. निलंबन रद्द करणे, निलंबनाचे कार्यवाही बाबत आदर्श कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी,सुधारित ग्रेड पे व वेतन श्रेणी लागू करणे महसूल विभागातील नायब तहसिलदार यांचे ग्रेड पे, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, सहायक महसूल अधिकारी यांचे वेतन श्रेणीबाबत प्रलंबित प्रस्ताव मान्य करण्यात यावे,महसूल विभागाचे सर्व संवर्ग कार्यालयाचे सुधारित आकृतीबंध तात्काळ मंजूर करणे, खात्यांतर्गत परीक्षा घेणे, महसूल अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात येऊ नयेत. या मागण्यासाठी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आलेला आहे. निवेदन देताना सुरेश बगळे, प्रवीण ठाकरे, विजय लोखंडे, अक्षय मंडवे, अरविंद माळवे, अशोक काळीवकर, अविनाश हाडोळे, प्रवीण देशमुख, निकिता जावरकर, कृष्णा गाडेकर ,पूजा माटोडे, विवेक जाधव शिवाजी शिंदे ,ब्रजेश वस्तानी, निनाद लांडे, कमल गाडे, सौरव वानखडे आदि उपस्थित होते.

## पोलीस आयुक्तांनी खोलापुरी

त्यांनी खोलपुरी गेट ठाण्याचा रेकॉर्ड, केस डायरी ,सीसीटीव्ही फुटेज आणि साक्षीदारांचे बयान आणि संशयित यादीचे निरीक्षण केले. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, हत्या कोणत्या कारणाने झाली, हत्येचा मास्टरमाईंड कोण आहे? त्याचा लवकरात लवकर सुगावा लावावा आणि तपासाला गती द्यावी. कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा कामांमध्ये चालणार नाही असेही ते म्हणाले. पोलीस आयुक्तांनी अचानक केलेल्या या दौऱ्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. १५ डिसेंबर रोजी रात्री भाजी बाजार चौकात प्रॉपर्टी ब्रोकर पवन वानखेडे यांची चार हल्लेखोरांनी भेटण्यासाठी बोलवून हत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण शहरात दहशत निर्माण झाली होती. पोलिसांनी घटनेतील चारही आरोपींना ताब्यात घेतले आहे. दरम्यान आता पोलीस आयुक्तांनी या प्रकरणात योग्य तपास करण्याचे निर्देश दिले.

## ट्रकच्या धडकेत ऑटो पुलाखाली

एका आयशर ट्रकने पाठीमागून ऑटोला धडक दिली. त्यामुळे ऑटो पुलाखाली जाऊन कोसळला. सुदैवाने या अपघातात कुठलीही जिवित हानी झाली नाही. यावेळी घटनास्थळी नागरिकांची पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. तसेच मुख्य रस्त्यावर काही वेळ वाहतूक सुद्धा विस्कळीत झाली होती. दरम्यान दर्यापूर पोलिस स्टेशनचे वाहतूक पोलिस घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी वाहतूक सुरळीत केली. या घटने संदर्भात पुढील तपास दर्यापूर पोलिस करीत आहे.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण

अमरावती विद्यापीठ, अमरावती उपस्थित राहतील. या क्रीडा स्पर्धेत ॲथलेटिक्स मध्ये धावणे (१००, २०० व ४०० मीटर), लांब उडी, गोळाफेक यांसारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकारांसह कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल यांसारख्या सांघिक खेळांचेही आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच १९ डिसेंबर रोजी विविध खेळांच्या अंतिम फेऱ्या पार पडतील. त्यानंतर संध्याकाळी ४ वाजता बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे . श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर यांच्या अध्यक्षतेत होईल. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष, ॲड.जयवंत उपाख्य भैय्यासाहेब वि. पाटील (पुसदेकर) व कार्यकारिणी सदस्य प्रा. सुभाष बनसोड, १९ व्या आशियाई खेळातील रजत पदक विजेता तुषार शेळके यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना चषक,पदक, पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेच्या आयोजना करीता संस्थेचे सचिव प्राचार्य वि.गो ठाकरे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## राजापेठ उड्डानपुलावर अपघातात

असून, त्यांना दुपारी ३.१५ वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे सांगितले आहे.

## मनपा प्रशासन निवडणुकीसाठी

शिक्षण विभाग मध्ये ६, १३, १७, जुने तहसील कार्यालय १४, १५, १६ आणि बडनेरा दक्षिण झोन कार्यालयात १९, २० ,२१ व २२ प्रभागातील निवडणूक लढवणाऱ्यांसाठी इच्छुक उमेदवारांच्या नामांकनाची सुविधा राहणार आहे. प्रत्येक झोनवर निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे ६३० कर्मचाऱ्यांचे निवडणुकीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. नामांकन प्रक्रिया पूर्वी कागदपत्र तपासण्यासाठी एक सहायता कक्ष निर्माण करण्यात आला आहे. सर्व प्रकारच्या परवानगी साठी महापालिकेने एक खिडकी योजना सुरू केली आहे. पत्रकार परिषदेमध्ये अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त योगेश पीठे ,जनसंपर्क अधिकारी भूषण पुसदकर उपस्थित होते.

खर्च मर्यादा ९ लाख-

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ड वर्ग महापालिकेत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा ९ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे निवडणूक विभागाचे विविध पथक आदर्श आचारसंहिता आणि निवडणूक खर्च पाहणी करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. पेड न्यूज आणि कुठल्याही प्रकारे मतदारांना आमीष दाखवणाऱ्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी एक पथक गठीत करण्यात आले आहे.

नवसारी स्पोर्ट कॉम्प्लेक्समध्ये मतमोजणी-

१५ जानेवारी रोजी महापालिकेचे मतदान झाल्यानंतर १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. येथे सात वेगवेगळ्या विभागात ईव्हीएम ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रूम तयार करण्यात आले आहे. मत मोजणीसाठी सात हॉलची निर्मिती करण्यात आली आहे. येथे १६ जानेवारी रोजी मतमोजणी नंतर निकाल घोषित करण्यात येईल. निवडणुकी दरम्यान शांतता व कायदा व्यवस्था कायम राहावी यासाठी पोलीस विभागासोबत समन्वय साधण्यात येणार आहे.

## वडाळी व जनता कॉलनीत

माहितीनुसार फ्रेजरपुरा पोलिसांनी गुप्त माहिती आधारे वडाळी परिसरातील एका महिलेच्या घरी धाड मारून दारू, मोह आणि इतर साहित्य असा एकूण ५२ हजार १५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच राजापेठ पोलीस ठाणे क्षेत्रातील जनता कॉलनी मध्ये विजय सुनील चौरगडे (वय २५) याला मोटरसायकलवर दारूची तस्करी करताना पकडले. त्याच्या कडून १३ हजार ४४० रुपयाची दारू व मोटरसायकल असा एकूण ९३ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोन्ही कारवाईमध्ये एकूण १ लाख ४५ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## कत्तलीकरिता बांधून ठेवलेल्या

मोहम्मद जाकीर यांच्या गोठ्यात धाड मारली. तेथून २६ गोवंशाची सुटका करण्यात आली. हा गोठा मोहम्मद साकीब मोहम्मद जाकीर याचा असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीलाही ताब्यात घेतले. आरोपी विरुद्ध कलम ५ (अ) (ब) ,महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६,सहकलम ११(१)(क) प्राण्यांना निर्दयतेने वागण्याच्या प्रतिबंध अधिनियम अन्वये वलगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच गोवंशाला दस्तूर नगर येथील गोरक्षण संस्थेच्या स्वाधीन करण्यात आले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक निरीक्षक मनीष वाकोडे, अंमलदार सतीश देशमुख, फिरोज खान ,मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सय्यद नाझीमुद्दीन, रंजीत गावंडे, प्रभात पोकळे यांनी केली.

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.७६१/२५ ने.ता.०९.०१.२०२६

अर्जदार -
**१.श्रीमती शोभा आनंदराव अंबाडकर,** वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
**२.संजय आनंदराव अंबाडकर,**वय ५८ वर्षे, धंदा - मजुरी
रा.इंद्रप्रस्थ अपार्टमेट, इंद्रप्रस्थ कॉलनी, शेगाव रोड, अमरावती
ता.जि.अमरावती
**३.विनोद आनंदराव अंबाडकर,** वय ५६ वर्षे, धंदा - नोकरी
रा.सिंघानिया लेआउट, चालबर्डी रोड, पांढरकवडा
ता.केळापुर, जि.यवतमाळ
**४.मनोज आनंदराव अंबाडकर,** वय ५३ वर्षे, धंदा - वकिली
रा.जयश्री अपार्टमेंट, सौरभ कॉलनी, व्ही.एम.व्ही.अमरावती
ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**निल**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे **आनंदराव श्रावणजी अंबाडकर यांचा दिनांक २९/०४/२०१४ रोजी अंबाडा, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मृत्यू झाला.** तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०८/१२/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात एक ठार; तीन गंभीर जखमी

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक १६८ जवळ मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे सुमारे ४.१० वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. श्प ० ३ ख ४९१६ क्रमांकाची कार मुंबईहून उत्तर प्रदेशकडे जात असताना हा अपघात घडला. या अपघातात घटनास्थळीच एकाचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.**

या अपघातात मोहम्मद असलम खान (वय ४०, रा. नालासोपारा, मुंबई) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर मोहम्मद मुस्लिम (वय ४०), फातिमा मोहम्मद (वय ५२) आणि कंमरू निसा शेख (वय ५५) हे तिघे गंभीर जखमी झाले असून सर्व जखमी नालासोपारा, मुंबई येथील रहिवासी आहेत.




## चॅनल क्रमांक १६८ जवळील घटना

अपघाताची माहिती श्री गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी समृद्धी महामार्ग टोल प्लाझा, कारंजा येथील १०८ रुग्णवाहिका पायलट सोनू शिंदे व डॉक्टर गणेश यांना दिली. त्यानंतर शिवनी रुग्णवाहिकेचे १०८ पायलट प्रतीक चाकट यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमींना कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

कारंजा उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जखमींना अमरावती येथे रेफर करण्यात आले.

या दरम्यान मदतकार्याकरिता समृद्धी रुग्णवाहिकेचे अजय घोडेस्वार, शिवनेरी रुग्णवाहिकेचे विनोद खोंड व श्याम घोडेस्वार, कक्ष सेवक विजय सिरसाठ, शिवम खोड, समृद्धी महामार्ग अग्निशामक दल तसेच हायवे पोलीस घटनास्थळी उपस्थित होते.

कारंजा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अपघातातील रुग्ण अति गंभीर असतानाही त्यांना वेळेत उच्चस्तरीय रुग्णालयात पाठवले जात नसल्याचे आरोप करण्यात येत आहेत. गोल्डन अवरमध्ये रुग्णांना मोठ्या रुग्णालयात नेणे अत्यावश्यक असताना, १०८ रुग्णवाहिकेची एक ते दीड तास वाट पाहण्यास सांगितले जाते, त्यामुळे रुग्णांची प्रकृती अधिक गंभीर होत असल्याचा आरोप आहे. याकडे कारंजा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षकांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# तिक्ष्णगत महोत्सव २०२५: आदर्श शिंदेंच्या आवाजाची अकोल्यात जादू

## 'कॉन्सर्टला' तरुणाईचा 'रेकॉर्डब्रेक' प्रतिसाद!



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

बुलंद आवाजाचे जादूगार आणि अवघ्या महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत असलेले गायक आदर्श शिंदे यांच्या सुरांनी अकोलेकर मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटीतर्फे आयोजित 'तिक्ष्णगत महोत्सवा'चे! गौरक्षण संस्थानमागील मैदानावर पार पडलेल्या या ऐतिहासिक 'आदर्श शिंदे कॉन्सर्ट'ला अकोल्यातील तरुणाईने अभूतपूर्व गद करत रेकॉर्डब्रेक प्रतिसाद दिला. तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटी आणि अजिंक्य भारत परिवाराचे डॉ. सुगत वाघमारे, तनुजा सुगत वाघमारे आणि तिक्ष्णगत वाघमारे यांनी अकोलेरांसाठी ही पर्वणी उपलबध करुन दिली.

मंगळवार, १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता कार्यक्रमाची दमदार सुरुवात झाली. सुरुवातीला प्लेबॅक सिंगर जनार्दन धात्रट यांनी 'चंद्रभागेच्या तीरी' हे भक्तीगीत सादर केले. त्यानंतर नाशिक आयडॉल अमित पगारे यांनी 'आता तरी देवा मला पावशील काय' आणि प्रबुद्ध जाधव यांनी 'पाउले चालती पंढरीची वाट' ही भक्तीगीते सादर करून वातावरणात चैतन्य निर्माण केले.

**आदर्श शिंदेंच्या आगमनाने मैदान दुमदुमले:** जसा आदर्श शिंदे यांचा रंगमंचावर प्रवेश झाला, तसा उपस्थित हजारो तरुणांनी एकच जल्लोष केला. आपल्या घराण्याचा वारसा जपत त्यांनी आजोबा प्रल्हाद शिंदे आणि वडील आनंद शिंदे यांची 'तूच सुखकर्ता', 'पार्वतीच्या बाळा' ही गाणी सादर करून कार्यक्रमाची उंची गाठली. 'दगडी चाळ' चित्रपटातील 'मोरया मोरया' गाणे सुरू होताच संपूर्ण मैदानात टाळ्यांचा कडकडाट झाला. यावेळी बोलताना आदर्श म्हणाले की, 'आज इथे अंकुश चौधरी असता, तर तो नक्कीच नाचला असता!! त्यानंतर 'देवा तुझ्या गाभाऱ्याला', 'अरे भावा माझा जयभीम घ्यावा', 'माझ्या शिवबारं' यांसारख्या गाण्यांनी अकोलेकरांना अक्षरशः वेड लावले. तर, 'नव्हतं मिळत पोटाला, आता कमी नाही नोटाला. माझ्या भिमाची पुण्याई, अंगठी सोन्याची बोटाला?' या गाण्यावर उपस्थित तरुणाई बेधुंदपणे थिरकली. मुंबईहून आलेल्या विशेष वाद्यवृंदाने (म्युझिक टीम) संगीताची साथ दिली, तर निवेदिका माधुरी भारती, पल्लवी डोंगरे आणि आकांक्षा गोमासे यांनी आपल्या बहारदार निवेदनाने प्रेक्षकांची मने जिंकली.

**तिक्ष्णगत वाघमारे यांचा वाढदिवस उत्साहात :** कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'अजिंक्य भारत'चे मुख्यसंपादक तिक्ष्णगत वाघमारे यांचा वाढदिवस. सामाजिक कार्याचा वारसा समर्थपणे चालवणाऱ्या तिक्ष्णगत यांचा वाढदिवस आदर्श शिंदे आणि उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अकोलेकरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

**डॉ. सुगत वाघमारेंचे मानले आभार :** 'तिक्ष्णगत महोत्सवाचे सातत्यपूर्ण आयोजन करणे सोपे काम नाही. मला अकोल्यात बोलावल्याबद्दल मी डॉ. सुगत वाघमारे यांचा ऋणी आहे. आज प्रथमच मला अकोल्याच्या भूमीत आजोबा आणि वडिलांची गाणी गाण्याचे भाग्य लाभले,' अशा भावना आदर्श शिंदे यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**लावणीने रंगविली मैफल :** कार्यक्रमात अबोली गिऱ्हे यांनी 'खेळताना रंग बाई होळीचा' ही लावणी सादर केली. त्यांच्या नृत्याविष्काराला युवक-युवतींनी प्रचंड दाद दिली.



# निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने रस्त्यांचा सवाल!

## सागर कोकास यांचे मंत्री बावनकुळेंना अनोखे आमंत्रण



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक सुरू असून प्रचार शिगेला पोहोचला आहे. दरम्यानच्या काळात आम आदमी पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदाची निवडणूक सागर कोकास लढवत आहेत. त्यासाठी त्यांनी प्रचाराला सुरु आहे. दरम्यानच्या काळात सागर कोकास हे निवडणूक प्रचाराला दुय्यम स्थान देत असून त्यांनी वाशिम शहरातील नागरी समस्या बाबत आवाज उठवला आहे. यासाठी त्यांनी प्रचारातून एक दिवस सुट्टी घेत नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात जाऊन त्यांनी अधिवेशनाला आलेल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाच्या आमदारांना वाशिम शहरातील नागरी समस्या बाबत जाणीव करून दिली. त्यासाठी मुख्यमंत्र्यां सह सर्वांनाच ' साहेब तुम्ही वाशिमला या' असे आमंत्रण दिले जेणेकरून वाशिम शहरातील रस्ते काही तासात प्रशासन चांगले करेल. या त्यांच्या अनोख्या आंदोलनाचे वाशिम शहरात कौतुक होत असतानाच जनता पक्षाच्या नगरपालिकेतील उमेदवाराच्या प्रचारार्थ दिनांक १९ डिसेंबर रोजी राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे येत असल्याची माहिती मिळाल्यावरून त्यांनी दिनांक १७ डिसेंबर रोजी वाशिम शहरात पुन्हा एकदा अनोख्या प्रकारे आंदोलन केले, ज्यामध्ये त्यांनी मंत्री बावनकुळे यांना आवाहन दिले की 'साहेब तुम्ही निवडणूक प्रचाराला आलाच आहात तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यासाठी पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्याने जाण्याचे नियोजन करून ठेवा जेणेकरून तुम्ही येत असल्याचे पाहून सार्वजनिक बांधकाम विभाग या रस्त्याची दुरुस्ती करेल, कारण गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता खड्डयात आहे? का खड्डयात रस्ता आहे? हे समजत नाही. या रस्त्यावरिल धुळीने परिसरातील नागरीक हैराण झाले असून साहेब तुम्ही या तुमच्या येण्याने नागरिकांचे त्रास तरी कमी होतील असे आवाहन त्यांनी मंत्री बावनकुळे यांना केले आहे.

# २५ वर्षांचा रखडलेला पाणीप्रश्न मार्गी!

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव शहरासाठी गेली अनेक वर्षे ज्वलंत ठरलेला पाणीप्रश्न आता कायमचा सुटण्याच्या मार्गावर आहे. आमदार भावनाताई गवळी यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि प्रशासनातील २५ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या बळावर चाकातीर्थ पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होऊन मालेगाव शहराला मुबलक आणि नियमित पाणीपुरवठा होणार आहे, अशी माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख (ओबीसी सेल, वाशिम) विवेक बबनराव गवळी यांनी दिली.

ते म्हणाले की, पाणीप्रश्नावर केवळ आश्वासनांची पोकळी न ठेवता आमदार भावनाताई गवळी यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला, स्वतः जातीने लक्ष घालून प्रकल्प मंजूर करून घेतला आणि प्रत्यक्ष कामही सुरू करून दाखवले. मात्र प्रकल्प मंजूर झाल्यानंतर काही स्थानिक आमदार व लोकप्रतिनिधी श्रेय घेण्यासाठी पुढे सरसावले असून, हे केवळ केविलवाणे राजकारण आहे, अशी टीका ही त्यांनी केली. गेली वीस वर्षे मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांना मालेगावच्या मूलभूत समस्या कधीच दिसल्या नाहीत. मात्र अल्पावधीतच आमदार भावनाताई गवळी यांच्या माध्यमातून शहरात विकासकामांचा सपाटा सुरू झाला आहे.

## मुठ्ठा शेत शिवारातील घटना: खोदकाम सुरू असताना काळाचा घाला

### विहीर खचली : एकाचा मृत्यू, तीन गंभीर जखमी

**मालेगाव :** तालुक्यातील मुठ्ठा शेत शिवारात विहिरीचे खोदकाम सुरू असताना अचानक मातीचा वरचा भाग खचून भीषण दुर्घटना घडली. १७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडलेल्या या घटनेत ढिगाऱ्याखाली दबल्या गेल्याने एका मजुराचा जागीच मृत्यू झाला.

# सहाय्यक नगररचनाकार संदीप गावंडे यांची अचानक बदली

## चारही झोनचे काम एका अधिकाऱ्यावर

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

महापालिकेच्या नगररचना विभागात सहाय्यक नगररचनाकार म्हणून कार्यरत असलेले संदीप गावंडे यांची कोणतेही ठोस कारण जाहीर न करता प्रशासनाने थेट मालमत्ता विभाग प्रमुखपदी बदली केल्याने महापालिका वर्तुळात आश्चर्य आणि संभ्रम व्यक्त केला जात आहे. या निर्णयामुळे नगररचना विभागातील चारही झोनचे काम आता एका सहाय्यक नगररचनाकारावर येऊन पडले असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महापालिकेच्या नगररचना विभागात सहाय्यक नगररचनाकारांची दोन पदे मंजूर असून ती पदे सरळसेवा भरती व पदोन्नतीने भरली जाण्याची तरतूद आहे. मात्र नगररचनाकार तसेच सहाय्यक संचालक नगररचनाकार ही पदे गेल्या अनेक वर्षापासून प्रतिनियुक्तीवरच कार्यरत आहेत. विशेष म्हणजे सहाय्यक नगररचनाकार हे पद प्रतिनियुक्तीने भरता येत नसल्याचे नियमांमध्ये स्पष्ट नमूद आहे.

सध्या महापालिकेत दोन सहाय्यक नगररचनाकार कार्यरत होते. यामध्ये एक अधिकारी शासन सेवेतून प्रतिनियुक्तीवर असून, दुसरे मानसेवी स्वरूपात नियुक्त होते. संदीप गावंडे हे गेल्या सुमारे २५ वर्षांपासून नगररचना विभागात कार्यरत असून, त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा विभागाला मोठा लाभ होत होता. कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी प्रत्येकी दोन झोनची जबाबदारी दोन्ही सहाय्यक नगररचनाकारांकडे सोपविण्यात आली होती. त्यामुळे नकाशा मंजुरी, बांधकाम परवानग्या व अन्य तांत्रिक कामे वेळेत पूर्ण होत होती. मात्र संदीप गावंडे यांची अचानक बदली करून त्यांची नियुक्ती मालमत्ता विभाग प्रमुखपदी करण्यात आल्याने नगररचना विभागातील सर्व चारही झोनची जबाबदारी आता एका सहाय्यक नगररचनाकारावर आली आहे. नगररचना विभागातील बहुतांश कामकाज ऑनलाईन पद्धतीने होत असले तरी इतक्या मोठ्या प्रमाणात कामाचा भार एका अधिकाऱ्यावर पडल्याने कामे रखडण्याची व विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या बदलीच्या पार्श्वभूमीवर महापालिका परिसरात विविध तर्कवितर्कांना उधाण आले असून, प्रशासनाने या निर्णयामागील नेमके कारण स्पष्ट करावे, अशी मागणी कर्मचारी व नागरिकांकडून होत आहे.

# डॉ होमीभाभा बालवैज्ञानिक परिक्षेत विद्यार्थीचे सुयश

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाद्वारे इयत्ता सहावी व नववीसाठी दरवर्षी परिक्षेचे आयोजन करण्यात येते. या परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. हि परिक्षा विद्यार्थीसाठी निट व जेईई परिक्षेची पूर्व तयारीच ठरते. या वर्षी या परिक्षेला वाशीम येथून विविध शाळेतून विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या परिक्षेत स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीम येथील इयत्ता सहावीतींल विद्यार्थी मोक्षदा चांदजकर, रिधीका मोरे, अंबिका वैरागडे, विराज कंगले, वेदांत मापारी, ज्ञानेश्वरी तडस, आयुष सुरटकर तर इयत्ता नववीतील विद्यार्थी विनीत बोदडे, प्रांजल ईढोळे, खुशी कव्हर हे परिक्षेत उत्तीर्ण झाले.

# प्रभाग क्रमांक १२ मध्ये शिवसेनेचा भव्य मेळावा

## रमेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शेकडो युवकांचा जाहीर पक्षप्रवेश

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

प्रभाग क्रमांक १२ मध्ये शिवसेनेच्या वतीने भव्य युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात शेकडो युवकांनी जाहीरपणे शिवसेनेत प्रवेश करून पक्षाला बळकटी दिली. संपर्क प्रमुख कॅप्टन अभिजीत अडसूळ, उपनेते गोपीकिशन बाजोरिया, जिल्हा प्रमुख अश्विन भाऊ नवले आणि शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत संपूर्ण शहरात शिवसेनेचा भगवा फडकविण्याचा निर्धार यावेळी युवकांनी व्यक्त केला. 'आपला माणूस, आपला प्रभाग' अशी जोरदार घोषणा देत युवकांनी शिवसेनेच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला. प्रभाग क्रमांक १२ मध्ये सर्वाधिक युवकांचा शिवसेनेत प्रवेश झाल्याने या प्रभागात शिवसेनेची ताकद अधिक भक्कम झाली असल्याचे चित्र दिसून आले.



शिवसेना ही नेहमीच सामाजिक कार्य, समाजसेवा तसेच गरजू, गरीब नागरिकांच्या मदतीसाठी पुढे असते. या परिसरात आजपर्यंत शिवसेनेने विविध उपक्रमांद्वारे नागरिकांना मदतीचा हात दिला असून पुढेही ही सेवा अधिक जोमाने सुरू राहील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' हा शिवसेनेचा मूळ मंत्र असून 'समाजसेवाच ईश्वरसेवा' या विचाराने शिवसेना घराघरांत पोहोचून सामान्य नागरिकांच्या कामासाठी सदैव तत्पर राहील, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास उपशहर प्रमुख गणेश घुगे, भूषण इंदूरिया, विशाल धोटे, प्रदीप काशी, विभाग प्रमुख चेतन जैन, विनोद अग्रवाल, राहुल मोदिराज, ज्येष्ठ शिवसैनिक कन्हैया शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच उमेश डोलारे, संतोष गवई, योगेश डोलारे, शंकर गायकवाड, संजय सपकाळ, कृष्णा गवई, आकाश गावंडे, गोकुळ इंदूरकर, संतोष वाहूरवाघ, नागेश गवई, भारत सपकाळ, अंकित पेसोळे, श्रवण सपकाळ, नितीन डोलारे, मंगल सपकाळ, अश्विन शिंदे, आकाश अहीर, अजय जंजाळ, प्रेम सपकाळ, राहुल तायडे, करण वाघमारे, मंगल भोसले, लखन नवकार, अनिकट येथील देवा मिश्रा, रितेश गवळी, शुभम खुडेकर, यश खांजोडे, जॉंटी हिवरले, छोटू हिवरले, आपुल सरनाईक, योगेश देशकर, अतुल उपाध्याय, शुभम उपाध्याय, आकाश वानखडे, सागर वानखडे, विशाल खुडेकर आदी युवकांचा विशेष पक्षप्रवेश झाला, अशी माहिती शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनी दिली.

# आता काहींना लागले 'स्वीकृत' पदाचे डोहाळे; पण निकष बदलले

***■ अमोल कल्याणकर ■***

***मालेगाव : नगर पंचायत निवडणुकीनंतर खऱ्या अर्थाने राजकीय हालचालींना वेग येतो, तो म्हणजे स्वीकृत नगरसेवक पदासाठी. १७ प्रभागातून १७ नगरसेवक निवडून आल्यानंतर नगरपचायत मध्ये दोन ते तीन स्वीकृत नगरसेवकांची वर्णी लागणार आहे. मात्र हे पद आता सन्मानाचे न राहता राजकीय समीकरणे, अंतर्गत सोदेबाजी आणि निष्ठेच्या कसोटीवर ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.***

निवडणुकीपूर्वी तिकीट न मिळालेल्या अनेक इच्छुकांना 'स्वीकृतमध्ये पाहू' असे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे सर्वच पक्षांत इच्छुकांची मोठी गर्दी झाली आहे. मात्र हे आश्वासन कितपत पाळले जाईल, याबाबत शंका व्यक्त होत आहे. कारण याबाबतचा मागील अनुभव अजूनही ताजा आहे. मागील निवडणुकीत अनेकांना शेवटच्या क्षणी यादीतून वगळण्यात आले होते.




प्रत्यक्षात मात्र मोजक्यांनाच संधी मिळाली. परिणामी अनेकजण वंचित राहिले आणि या नाराजीचे पडसाद पुढील अनेक वर्षे राजकीय वर्तुळात उमटत राहिले. ज्यांना त्यावेळी संधी मिळाली असली तरी, नव्याने शब्द दिलेल्यांचे भवितव्य अद्याप अनिश्चितच आहे.

नगरपच्यात निवडणुकीनंतर स्वीकृत नगरसेवक निवडीत आर्थिक बाबींचा प्रभाव असल्याची चर्चा गेल्यावेळी मोठ्या प्रमाणात झाली होती. सर्व समाजांना प्रतिनिधित्व देण्याच्या कारणास्तव निर्णय झाला असला, तरी प्रत्यक्षात अंतर्गत घडामोडी वेगळ्याच होत्या, अशी आजही चर्चा आहे. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर हालचाली झाल्याचे आरोप तेव्हाही झाले होते. निवडून येणारे नगरसेवक पक्षाचा आदेश कितपत पाळतील, याबाबतही संभ्रम आहे.

त्यामुळे स्वीकृत पदासाठीची स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पूर्वी स्वीकृत नगरसेवक निवडताना पक्षासाठी केलेले कार्य, समाजप्रतिनिधित्व, जनसेवा आणि निष्ठा या बाबी महत्त्वाच्या मानल्या जात होत्या. मात्र आता ही सर्व सूत्रे मागे पडत असून, राजकीय जमाखर्च आणि प्रभावी हालचाली निर्णायक ठरण्याची शक्यता वणीच्या राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

**सर्वच पक्षांत इच्छुकांची गर्दी :** भाजप, उबाठा, काँग्रेस व शिवसेना (शिंदे) या प्रमुख पक्षांत स्वीकृत नगरसेवक पदासाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा अवलंब केला जाईल, असे वातावरण आहे. अखेरीस कोणाच्या गळ्यात स्वीकृत नगरसेवक पदाची माळ पडणार, हे २९ तारखेला निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३ ■ गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## केळझर हादरले, बेपत्ता चिमुकल्याचा तलावात मृतदेह; गावावर शोककळा

### चार दिवसांच्या शोधाचा दुःखद अंत



**सेलू । जनमाध्यम** - सेलू तालुक्यातील केळझर गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. केळझर येथील आर्यन किशोर बावणे (वय ९) हा चिमुकला रविवारी (दि. १४) सायंकाळी सहा वाजतापासून बेपत्ता झाला होता. चार दिवस चाललेल्या शोधमोहीमेनंतर बुधवारी सायंकाळी गावालगतच्या मच्छी बीज केंद्राच्या तलावात त्याचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण गावात शोककळा पसरली.

आर्यन बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच सेलू पोलीस यंत्रणा सतर्क झाली होती. बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक प्रविण भोयर, पोलीस हवालदार श्रावण ठाकरे व पोलीस शिपाई मारोती किन्नाके यांना मच्छी बीज केंद्राच्या तलावात काहीतरी तरंगताना दिसले. जवळ जाऊन पाहणी केली असता तो मृतदेह आर्यनचाच असल्याचे स्पष्ट झाले.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार मनोज गभणे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विवेकानंद धनुले, प्रकाश पोहाणे, प्रशांत वंजारी, श्रावण पवार, नरेंद्र कांबळे, संदीप मेंढे, वैभव जगने, संजय पटले, कय्युम शेख, पोलीस पाटील प्रकाश खंडाळे तसेच आर्थिक गुन्हे शाखेचे देवेंद्र ठाकूर घटनास्थळी दाखल झाले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

गावकऱ्यांच्या मदतीने मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. पंचनामा करून रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांच्या रुग्णवाहिकेतून मृतदेह शवविच्छेदनासाठी सेलू ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

आर्यन हा केळझर येथील जिल्हा परिषद शाळेत चौथ्या वर्गात शिक्षण घेत होता. तो रविवारी रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने नातेवाईक, गावकरी यांच्याकडे शोधाशोध करण्यात आली. कुठेही पत्ता न लागल्याने त्याचे वडील किशोर बावणे यांनी मध्यरात्री सेलू पोलीस ठाण्यात बेपत्ताची तक्रार दाखल केली होती. तक्रार दाखल होताच पोलिसांनी शोधमोहीम तीव्र केली, मात्र अखेर बुधवारी सायंकाळी ही मोहीम दुर्दैवी ठरली.

पोस्टमार्टेम अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. लहान वयातच आर्यनचा असा दुर्दैवी अंत झाल्याने केळझर गावात हळहळ व्यक्त होत असून, प्रत्येक घरात शोककळा पसरली आहे.

## भरधाव ट्रकने सायकलस्वार विद्यार्थिनीला चिरडले; १४ वर्षीय मुलीचा मृत्यू

### -देऊरवाडा मार्गावर हृदयद्रावक घटना, ट्रक चालक फरार



**आर्वी जनमाध्यम :** शहरातील देऊरवाडा मार्गावरील धरमकाट्याजवळ सोमवारी (दि. १७ डिसेंबर रोजी ) सायंकाळी पाचच्या सुमारास भरधाव ट्रकने सायकलवरून शिकवणी वर्गाला जात असलेल्या विद्यार्थिनीला चिरडल्याची हृदयद्रावक घटना घडली. या भीषण अपघातात विभूती विकास डागा (वय १४, रा. पिपरी पुनर्वसन) हिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण आर्वी शहरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

विभूती ही दहावीच्या वर्गात शिक्षण घेत होती. नेहमीप्रमाणे ती सायकलवरून शिकवणी वर्गासाठी निघाली होती. देऊरवाडा मार्गाने आर्वीकडे येणाऱ्या भरधाव एम.पी. ०९ एच.जी. ९६६५ क्रमांकाच्या ट्रकने अचानक तिच्या सायकलला जोरदार धडक दिली. धडक इतकी जबर होती की विभूतीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचे दृश्य पाहून उपस्थितांचे काळीज पिळवटून गेले.

अपघातानंतर आरोपी ट्रकचालकाने कोणतीही मदत न करता वाहनासह पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रसंगावधान राखत नागरिकांनी ट्रकचा पाठलाग केला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात चालकाने ट्रक सोडून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातग्रस्त ट्रक ताब्यात घेण्यात आला असून फरार चालकाचा शोध सुरू आहे.

दरम्यान, निष्पाप विद्यार्थिनीच्या अपघाती मृत्यूने पिपरी पुनर्वसनसह आर्वी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. भरधाव वाहनांचा वाढता वेग, जड वाहतुकीचा शहरी मार्गांवरील वावर आणि अपुऱ्या वाहतूक नियंत्रणामुळेच असे अपघात घडत असल्याचा संताप नागरिक व्यक्त करीत आहेत. दोषी ट्रकचालकावर कठोर कारवाई करावी, तसेच या मार्गावर वेगमर्यादा व वाहतूक नियंत्रणाचे ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## नाव नाही, फोटो नाही, तरीही मतदार ? वर्धा प्रभाग ९ मधील यादी धक्कादायक प्रकार

### -मतदान तोंडावर पण यादी अपूर्ण : प्रशासनाची पोलखोल

**वर्धा । जनमाध्यम :** वर्धा शहरातील प्रभाग ९ मधील मतदार यादीत गंभीर गडबडी आढळल्याने निवडणूक प्रक्रियेला मोठा धक्का बसण्याची भीती निर्माण झाली आहे. वर्धा नगरपालिकेच्या प्रभाग ९ 'ब' आणि प्रभाग १९ 'ब' या नगरसेवक पदांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असले तरी मतदार यादीतील सावळा गोंधळामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

अपिल न्यायालयात दाखल झालेल्या आक्षेपांवर वेळीच निकाल न येण्याचे कारण पुढे करून निवडणूक आयोगाने काही भागातील निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. देवळी पालिकेची संपूर्ण निवडणूक, हिंगणघाट प्रभाग ५ 'अ' व 'ब', तसेच पुलगाव प्रभाग २ 'अ' व प्रभाग ५ 'अ' यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मात्र वर्धा प्रभाग ९ 'ब' व प्रभाग १९ 'ब' या निवडणुकांमध्ये मतदानाची प्रक्रिया



२० डिसेंबरला होणार आहे. मतमोजणी २१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सहा ठिकाणी पार पडणार आहे. परंतु प्रभाग ९ मधील मतदार यादीतील गडबडी अजूनही कायम आहे. उदाहरणार्थ, अनुक्रमांक ५७३ वर मतदान कार्ड क्रमांक एस. डब्ल्यू. डी. ८२६१०३४, वय ३४, लिंग पुरूष असा नमुद असून मतदाराचे नाव आणि छायाचित्र यादीत नाहीत. तसेच अनुक्रमांक ५७६ वर मतदाराचे नाव 'अभिषेक', वडिलांचे नाव 'योगेश', वय १९, लिंग पुरूष असे नमूद असून आडनाव गायब आहे. या त्रुटीमुळे नागरिक आणि पक्ष नेत्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वर्धा येथील निवडणूक अधिकारी गणेश खताळे यांना या गडबडीसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळले आणि मुख्याधिकारी यांचा नंबर पाठवून त्यांच्याकडे चौकशी करण्याचा सल्ला दिला. निवडणूक आयोगाने यावर तातडीने लक्ष न दिल्यास मतदान प्रक्रियेत गैरसोय होण्याची शक्यता असून नागरिक आणि राजकीय पक्षांनी याबाबत तोंड उघडून नाराजी व्यक्त केली आहे.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांचा धडक छापा

### सात जुगारी रंगेहात ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** अल्लीपूर पोलिसांनी मौजा कानगाव येथे धडक कारवाई करत जुगार अड्ड्यावर छापा टाकून जुगाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईत सात जणांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून पोलिसांनी एकूण २८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि.१६ रोजी अल्लीपूर पोलिस ठाण्याच्या पोलिस उपनिरीक्षक वर्षा तांदुळकर यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकाने कानगाव येथे गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. छाप्यात नारायण महादेव धोटे, राहुल राजेश मोगरे, राहुल रमेश पाटी (तिघे रा. कानगाव), भास्कर आत्माराम वाघमारे (रा. चानकी), प्रकाश दौलत वाघमारे (रा. खानगाव) आणि राजू शंकर वनकर (रा. पाथरी) यांना जुगार खेळताना पकडण्यात आले.

**-२८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

पोलिसांनी आरोपींकडून तीन मोबाईल फोन, रोख ६ हजार ५७० रुपये व जुगाराचे इतर साहित्य असा एकूण २८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध अल्लीपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अलिकडच्या काळात ग्रामीण भागात वाढत चाललेल्या अवैध जुगारावर पोलिसांचा वचक बसवण्यासाठी अशाच धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## वर्धा-हिंगणघाटला ई-बसेसची 'हरित' भेट; प्रवासी सेवेचा वेग वाढला



**वर्धा जनमाध्यम :** राज्य परिवहन महामंडळाच्या (रापम) वर्धा विभागाच्या ताफ्यात डझनभर (१२) अत्याधुनिक ई-बसेस दाखल झाल्याने जिल्ह्यातील सार्वजनिक प्रवासी वाहतुकीला नवी चालना मिळाली आहे. प्रदूषणमुक्त, शांत व आरामदायी प्रवासाचा अनुभव देणाऱ्या या ई-बसेसमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ व विश्वासार्ह होणार आहे. या बसेसच्या फेऱ्यांचे नियोजन वर्धा व हिंगणघाट आगारांमार्फत करण्यात येणार आहे.

वर्धा जिल्ह्यात रापमची वर्धा, पुलगाव, आर्वी, हिंगणघाट आणि तळेगाव अशी पाच आगारे असून, शहरी व ग्रामीण भागात दररोज मोठ्या प्रमाणावर बससेवा सुरू आहे. सध्या वर्धा विभागाकडे २२३ बसेस उपलब्ध असून, त्यावरून प्रवाशांना नियमित सेवा दिली जात आहे. त्यात १७ रोजी १२ नवीन ई-बसेसची भर पडल्याने सेवेची क्षमता वाढली असून वेळापत्रक अधिक परिणामकारक करण्यास मदत होणार आहे.

रापमचे विभाग नियंत्रण कार्यालय सेवाग्राम मार्गावरील औद्योगिक वसाहत परिसरात असून, याच ठिकाणी विभागीय कार्यशाळा कार्यरत आहे. येथेच नव्या ई-बसेस दाखल झाल्या आहेत. या ई-बसेस नागपूर, अमरावती व यवतमाळ मार्गावर पाठविण्यात येणार असून, अकोला फेरी सुरू करण्याचाही विचार असल्याची माहिती विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी दिली.

ई-बसेसच्या समावेशामुळे इंधन खर्चात बचत, देखभाल खर्चात घट आणि पर्यावरण रक्षणाला हातभार लागणार आहे. प्रवाशांना वातानुकूलित, सुरक्षित व कमी आवाजातील प्रवासाचा लाभ मिळणार असून, जिल्ह्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिकतेची जोड मिळाली आहे. वर्धा–हिंगणघाटसह संपूर्ण जिल्ह्यातील प्रवाशांसाठी ही ई-बसेस सुविधा, वेग आणि पर्यावरणपूरकतेचा नवा अध्याय ठरणार असल्याचे चित्र आहे.

## वाहनचालकांनी बनावट संकेतस्थळ व फसव्या मोबाईल ॲप पासून सावध राहण्याचे आवाहन




**वर्धा जनमाध्यम :** परिवहन विभागाच्या वाहन, सारथी तसेच ई-चालान या संगणकीय प्रणालीद्वारे वाहन नोंदणी, वाहन परवाना तसेच ई-चालान संबंधित कामकाज केले जाते. या सेवांशी संबंधित बनावट संकेतस्थळ, फसवे मोबाईल ॲप्स तसेच एसएमएस, व्हॉट्स ॲपद्वारे पाठविण्यात आलेल्या खोट्या लिंक्स मोठ्या प्रमाणात नागरिकांना फसवीत आहे, त्यामुळे असे बनावट संकेतस्थळ व फसव्या मोबाईल ॲपपासून वाहनचालकांनी सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

परिवहन विभागाच्या कामकाजाकरीता वाहन धारकांनी वाहन नोंदणी सेवासाठी https://vahan.parivahan.gov.in, तसेच वाहन परवाना सेवासाठी सारथी https://sarathi.parivahan.gov.in, परिवहन सेवासाठी https://www.parivahan.gov.in या लॉगीन वाहन नोंदणीकरीता तसेच ई-चलन पोर्टल करीता https://echallan.parivahan.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. सदर संकेतस्थळे gov.in ने समाप्त होतात. com, online, site, in अशा डोमेनवरील कोणत्याही वेबसाईट नागरिकांनी उघडू नये.

फसवणूक करणाऱ्यांकडून आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरीत दंड भरण्याची धमकी देण्यात येते व अनधिकृत लिंक पाठविण्यात येऊन त्वरीत दंड भरण्याचे संदेश प्राप्त होतात. डीएल व्हाहन चालविण्याचा परवाना संस्पेड होणार आहे. त्वरीत तपासणी करा असे संदेश बहुधा पाठविण्यात येते.

आरटीओ कार्यालय किंवा परिवहन विभागाकडून नागरिकांच्या मोबाईलमध्ये कधीही व्हॉट्स?पद्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही. तसेच RTO Services.apk, mParivahan_Update.apk, eChallan_Pay.apk अशा अनाधिकृत APK ॲप्स डाऊनलोड करु नयेत कारण याद्वारे ओटीपी, बँकिंग माहिती व मोबाईलमधील इतर संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांना कोणताही संशयास्पद संदेश, लिंक प्राप्त झाल्यास तात्काळ https://www.cybercrime.gov.in या पोर्टलवर किंवा सायबर फसवणूक हेल्पलाईन ९९३० या क्रमांकावर किंवा जवळच्या जिल्हा सायबर पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी कळविले आहे.

## रबी हंगामात वीज संकट टळणार; 'कॅपॅसिटर' बसवा, शेतकऱ्यांचा खर्च घटणार, मोटार सुरक्षित

### -ऑटोस्विच टाळा, सुरळीत वीजपुरवठा राखा : शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी महत्त्वाचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** रबी हंगामाची लगबग सुरू असताना सिंचनासाठी विजेवर अवलंबित्व वाढले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि अखंड व दर्जेदार वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने महत्त्वाचे आवाहन केले आहे. कृषिपंपांचे वारंवार होणारे बिघाड, मोटार जळणे तसेच रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) नादुरुस्त होण्याचे प्रकार रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी 'ऑटोस्विच'चा वापर टाळून कृषिपंपांना क्षमतेनुसार 'कॅपॅसिटर' बसवावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

वीजपुरवठा सुरू होताच शेतात जाण्याचा त्रास टाळण्यासाठी अनेक ठिकाणी 'ऑटोस्विच'चा वापर केला जातो. मात्र, वीज येताच परिसरातील सर्व पंप एकाच वेळी सुरू झाल्याने रोहित्रावर अचानक जादा भार पडतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या खराब होणे आणि संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढतात. ऐन रबी हंगामात हा खंडित वीजपुरवठा शेतकऱ्यांसाठी मोठ्या आर्थिक नुकसानीचे कारण ठरतो.



याउलट कृषिपंपाला योग्य क्षमतेचा कॅपॅसिटर बसवल्यास कमी दाबाची समस्या दूर होते. मोटार सुरक्षित राहते, केबल जळण्याचे प्रमाण कमी होते आणि वीज वापरात बचत होते. योग्य विद्युत दाब मिळाल्याने 'केव्हीए' (kVA) मागणी नियंत्रित राहते, ज्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होतो. रोहित्र जळण्याचे प्रमाण घटल्याने दुरुस्तीसाठी लागणारा वेळ व खर्चही वाचतो.

काही ठिकाणी कॅपॅसिटर असूनही ते बंद अवस्थेत किंवा चुकीच्या पद्धतीने (डायरेक्ट) जोडलेले आढळतात. अशा स्थितीत अपेक्षित तांत्रिक लाभ मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी कॅपॅसिटरची योग्य पद्धतीने जोडणी करून ते कार्यान्वित ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रबी हंगामात सिंचनासाठी कोणताही अडथळा येऊ नये, मोटारी सुरक्षित राहाव्यात आणि वीजखर्चात बचत व्हावी, यासाठी 'ऑटोस्विच' टाळून 'कॅपॅसिटर' बसवणे हेच शेतकऱ्यांच्या हिताचे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

## शेतकऱ्यांच्या मुळावर उठणाऱ्या प्रस्तावित बियाणे कायद्याला आव्हान

### -कृषी केंद्र चालकांवर अन्याय नको: शेतकरी हितासाठी खा. अमर काळेंचा केंद्रावर दबाव

**वर्धा / नवी दिल्ली जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेशी आणि भवितव्याशी थेट संबंध असलेल्या बियाण्यांच्या प्रश्नावर केंद्र सरकारने आणलेला प्रस्तावित बियाणे (कृषी) कायदा २०२५ सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या कायद्यातील तरतुदी शेतकऱ्यांच्या हिताऐवजी त्यांच्याच अडचणी वाढवणाऱ्या ठरतील, असा गंभीर आरोप होत असून खासदार अमर काळे यांनी याविरोधात आक्रमक भूमिका घेत केंद्रीय कृषी मंत्र्यांकडे ठोस मागणी केली आहे.

या प्रस्तावित कायद्यानुसार चुकीचे किंवा बोगस बियाणे आढळल्यास थेट कृषी केंद्र चालकांना दोषी धरून ५० हजारांपासून १० लाख रुपयांपर्यंत दंड व गुन्हा दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्यक्षात कृषी केंद्र चालक हे बियाण्यांचे उत्पादक नसून कंपन्यांकडून पुरवलेले कृषी विभागाने प्रमाणित केलेले पॅकबंद बियाणेच शेतकऱ्यांना विकतात. अशा परिस्थितीत कंपन्यांच्या किंवा तपास यंत्रणेच्या त्रुटींसाठी विक्रेत्यांवर कारवाई करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांनाच अडचणीत ढकलण्यासारखे आहे. कृषी केंद्र चालकांवर जर अशा कठोर तरतुदी लादल्या गेल्या, तर अनेक केंद्रे बंद पडण्याची भीती आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसणार असून त्यांना दर्जेदार बियाणे मिळणे कठीण होईल. आधीच अतिवृष्टी, दुष्काळ, कीड आणि बाजारभावाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हा कायदा आणखी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत कृषी केंद्र चालकांनी खासदार अमर काळे यांच्याकडे धाव घेतली.

शेतकऱ्यांच्या हिताला बाधा येऊ नये, यासाठी कायद्यात तातडीने दुरुस्ती करावी, अशी ठाम भूमिका घेत खासदार काळे यांनी केंद्रीय कृषी मंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली. केंद्रीय कृषी मंत्र्यांनीही या मुद्द्याचे गांभीर्य ओळखून दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. आता हा कायदा खरोखर शेतकरी हिताचा ठरतो की केवळ कागदावरच राहतो, याकडे संपूर्ण कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## वर्धा जिल्ह्यासाठी शासकीय कृषी महाविद्यालयाची जोरदार मागणी

### -आ.राजेश बकाने यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन; सकारात्मक प्रतिसाद

**देवळी जनमाध्यम :** राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालय सुरू करण्याचा घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यातही तातडीने शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यात यावे, अशी ठोस मागणी आमदार राजेश बकाने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शेतीप्रधान जिल्हा असलेल्या वर्ध्याच्या शैक्षणिक व कृषी विकासाच्या दृष्टीने ही मागणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

वर्धा जिल्ह्यात सुमारे १३ लाखांहून अधिक लोकसंख्या असून आठ तालुक्यांचा समावेश आहे. जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित असताना येथे सध्या केवळ एकच खाजगी कृषी महाविद्यालय कार्यरत आहे. वाढती विद्यार्थीसंख्या, ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थी तसेच शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेता हे महाविद्यालय अपुरे ठरत असल्याचे आ. बकाने यांनी निवेदनात नमूद केले आहे. परिणामी अनेक विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणासाठी इतर जिल्ह्यांचा मार्ग धरावा लागत असून त्यांना आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



ही बाब लक्षात घेऊन आ. बकाने यांनी आपल्या मतदारसंघातील सेलसुरा येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. कृषी संशोधन, नवतंत्रज्ञानाचा प्रसार, प्रशिक्षण उपक्रमांना चालना मिळून जिल्ह्याच्या कृषी विकासाला गती मिळेल. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होऊन तरुणांना संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही आ. बकाने यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाचे दार खुले करणे, कृषी क्षेत्र अधिक सक्षम करणे आणि राज्याच्या कृषी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे या व्यापक उद्देशाने या मागणीस मान्यता द्यावी, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. दरम्यान, या निवेदनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आ. राजेश बकाने यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी SHAMSUZZAMA KHAN ZAFAR KHAN असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील SHAMSHUZ ZAMA ZAFAR KHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :-
स्टेशन फैल ,वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी ASMAT BANU MOHAMMAD SADIQU असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील HASMAT BANU MOHAMMAD SADIQ हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :-
महादेवपुरा वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबार M१९७९१८० वरील माझे SHAMEEM BEGUM असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SHAMEEM ZAFAR KHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** स्टेशन फैल ,बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा युनेस्कोच्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची बाब -मुख्यमंत्री

## युनेस्कोतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरणाबद्दल राजदूत विशाल शर्मांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट



**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा युनेस्कोच्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची, ऐतिहासिक आणि जागतिक स्तरावर महत्वाची घटना आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवाधिकारांचे जागतिक प्रवक्ते म्हणून त्यांची ओळख आहे. शिक्षण हे यशाकडे नेणारे साधन आहे हा बाबासाहेबांचा संदेश जगभर पोहोचविण्याच्या उद्दात्त हेतूने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोला भेटस्वरूपात देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. युनेस्कोला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेटस्वरूपात अर्पण केल्याबद्दल युनेस्को, पॅरिस येथील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेत आभार मानले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची ही भारताच्या ८० वर्षांच्या सदस्यत्वातील पहिलीच घटना असल्याचे शर्मा यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने युनेस्कोमध्ये बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण होणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक बाब असून, या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन केले.

केंद्र शासनाच्या वतीने शर्मा यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने युनेस्कोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला युनेस्कोचे महासंचालक, ५० हून अधिक देशांचे राजदूत तसेच युनेस्को सचिवालयाचे सदस्य उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे संदेश यावेळी वाचून दाखविण्यात आले होते, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमास संबोधित केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बाबासाहेबांचा समतेचा संदेश आणि शिक्षणाचे महत्व जगभरातील तरूणांपर्यंत पोहोचविण्याचा हा राज्य व केंद्र शासनाचा प्रयत्न होता. याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराजांचे ११ किल्ले (तामिळनाडूतील एक) असे देशातील १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे ही राज्यासाठी अत्यंत गौरवास्पद बाब असून, हा नामांकन सोहळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी शिवनेरी किल्ल्यावर भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा शासनाचा मानस आहे.छत्रपतींचा समृद्ध वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा म्हणजेच लोककल्याणासाठीच राज्य या विचाराशी सुशासनाचा संदेश जोडण्याचा प्रयत्न करण्यात यावा. तसेच दीपावलीचा अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून समावेश करताना, दिखाव्यापेक्षा त्यामागील मूल्यांचा विचार करून सुशासनाची संकल्पना पुढे नेण्याची गरज आहे.किल्ले व वारसा आधारित विकासासाठी ५० हजारापेक्षा जास्त रोजगार तयार होईल आणि एक हजार कोटीच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडे असलेल्या प्रस्तावावर यावेळी चर्चा करण्यात आली.मुख्यमंत्री कार्यालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, राज्य पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गारगे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच सांस्कृतिक व पुरातत्त्व विभागातील अधिका-यांशीही राजदूत शर्मा यांनी चर्चा केली. चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शर्मा भेट देणार आहेत.

## मोदींना इथिओपियाचा सर्वोच्च सन्मान प्रदान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इथिओपियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशाचा सर्वोच्च सन्मान द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथिओपिया प्रदान केला आहे. हा



सन्मान देताना इथिओपियाने आपली जुनी परंपरा मोडली आहे. पंतप्रधान मोदी हे जगातील पहिले परदेशी राष्ट्रप्रमुख ठरले आहेत, ज्यांना इथिओपियाने आपल्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवले आहे. आतापर्यंत जगातील २५ देशांनी पंतप्रधान मोदी यांना आपापल्या देशांचा सर्वोच्च सन्मान दिला असून, मोदींपूर्वी कोणत्याही भारतीय पंतप्रधानांना इतके उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले नव्हते.हा सन्मान अदीस आंतरराष्ट्रीय परिषद केंद्रात आयोजित विशेष समारंभात पंतप्रधान मोदी यांना प्रदान करण्यात आला. नवी दिल्लीत जारी केलेल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे की, भारत-इथिओपिया भागीदारी मजबूत करण्यात दिलेल्या त्यांच्या अपवादात्मक योगदानाबद्दल तसेच जागतिक राजनेते म्हणून त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी हा सन्मान देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी जार्डन दौरा पूर्ण करून इथिओपियात दाखल झाले. या दौ-यादरम्यान त्यांनी इथिओपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली. पंतप्रधान मोदी यांनी पंतप्रधान अबी अहमद अली यांना आपला भाउ आणि मित्र असल्याचे संबोधले.इथिओपियाचा सर्वोच्च सन्मान स्वीकारताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आपल्या सर्वांच्या सान्निध्यात, इथिओपियाच्या या महान भूमीवर उपस्थित राहणे हे माझ्यासाठी अत्यंत सौभाग्याचे आहे. आज दुपारी मी इथिओपियात पोहोचलो. येथे पोहोचताच येथील जनतेने मला विलक्षण आपुलकी आणि आत्मीयतेचा अनुभव दिला. पंतप्रधान अली स्वत? मला विमानतळावर स्वागतासाठी आले होते. त्यांनी मला फ्रेंडशिप पार्क आणि विज्ञान संग्रहालयात नेले. तेथे नेतृत्वाशी विविध महत्त्वाच्या विषयांवर माझी सखोल चर्चा झाली.

## ट्रम्प सरकारची ७ देशांवर पूर्ण, १५ देशांवर आंशिक प्रवासबंदी

**वाशिंग्टन/ वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक सुरक्षेचा हवाला देत स्थलांतर धोरण अधिक कठोर केले आहे. मंगळवार, १६ डिसेंबर रोजी ट्रम्प प्रशासनाने आणखी सात देशांवर तसेच पॅलेस्टिनी



नागरिकांवर पूर्ण प्रवासबंदी (ट्रॅव्हल बॅन) लागू केली. याशिवाय, आणखी १५ देशांच्या नागरिकांच्या अमेरिकेत प्रवेशावर आंशिक निर्बंध लादण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अमेरिकाकडून प्रवासबंदी किंवा प्रवेश निर्बंधांचा सामना करणा-या देशांची एकूण संख्या ३९ वर पोहोचली आहे. व्हाइट हाउसच्या फॅक्ट-शीटनुसार, हे विस्तारित प्रवास निर्बंध आणि प्रवेशावरील मर्यादा १ जानेवारीपासून लागू होतील. प्रशासनाचे म्हणणे आहे की, कमकुवत व्हिसा तपास प्रणाली, व्हिसा ओव्हरस्टेचे उच्च प्रमाण आणि दहशतवादी कारवायांचा धोका लक्षात घेउन हा निर्णय घेण्यात आला आहे.नवीन घोषणेनुसार बुर्किना फासो, माली, नायजर, दक्षिण सुदान आणि सीरिया यांच्यावर पूर्ण प्रवासबंदी लादण्यात आली आहे. तसेच, पॅलेस्टिनी अथारिटीने जारी केलेली प्रवास कागदपत्रे असलेल्या पॅलेस्टिनी नागरिकांनाही प्रतिबंधित यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, लाओस आणि सिएरा लिओन या देशांवरही आता पूर्ण प्रवासबंदी लागू करण्यात आली असून, यापूर्वी या देशांवर आंशिक निर्बंध होते.

## नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात ईडीच्या आरोपपत्राची दखल घेण्यास न्यायालयाने नकार देणे हा सत्याचा विजय - खरगे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नॅशनल हेराल्ड मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) आरोपपत्राची दखल घेण्यास दिल्ली न्यायालयाने नकार दिल्यानंतर, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी हा न्याय आणि सत्याचा विजय असल्याचे म्हटले आहे.खरगे यांनी बुधवारी आपल्या दिल्लीतील निवासस्थानी पत्रकार परिषदेत न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले आणि भाजप सरकारवर केंद्रीय संस्थांचा गैरवापर केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, नॅशनल हेराल्ड प्रकरण हे राजकीय सूड आणि द्वेषातून रचलेले बनावट प्रकरण आहे, ज्याचा उद्देश काँग्रेस नेत्यांना, विशेषतः गांधी कुटुंबाला त्रास देणे आहे.खरगे म्हणाले की, नॅशनल हेरील्डची स्थापना १९३८ मध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी केली होती. भाजप सरकार सीबीआय आणि ईडीसारख्या संवैधानिक संस्थांचा वापर मनी लाँड्रिंगसारख्या गंभीर आरोपांशी जोडून बदनाम करत आहे. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, हे संपूर्ण प्रकरण केवळ राजकीय फायद्यासाठी रचले गेले आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरणात कोणतेही सत्य नाही. तरीही, चौकशी आणि कारवाईच्या नावाखाली वर्षानुवर्षे काँग्रेस नेत्यांना त्रास देण्यात आला.या प्रसंगी, ज्येष्ठ वकील



आणि काँग्रेस नेते अभिषेक मनु सिंघवी म्हणाले की, नॅशनल हेराल्ड प्रकरण केवळ द्वेषाने प्रेरित नाही तर कायदेशीरदृष्ट्या कमकुवत आणि बेपर्वा देखील आहे. २०१४ मध्ये सुब्रमण्यम स्वामी यांच्या खाजगी तक्रारीने हा खटला सुरू झाला आणि २०१४ ते २०२१ पर्यंत, सीबीआय आणि ईडीने त्यांच्या फाईल्समध्ये लेखी स्वरूपात कबूल केले की, कोणताही पूर्वनियोजित गुन्हा घडला नाही. या कारणास्तव, सात वर्षे कोणतीही एफआयआर दाखल करण्यात आली नाही.त्यांनी सांगितले की, असे असूनही, जून २०२१ मध्ये अचानक ईसीआयआर दाखल करण्यात आला, ज्यावरून स्पष्ट होते की, हा निर्णय राजकीय दबावाखाली घेण्यात आला होता. २०२१ ते २०२५ दरम्यान, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांची सुमारे ९० तास चौकशी करण्यात आली. असंख्य मालमत्ता जप्त करण्यात आल्या, खाती गोठवण्यात आली आणि भाड्याने मिळणारे उत्पन्न देखील थांबवण्यात आले, तरीही न्यायालयाने अखेर असे म्हटले कीस मनी लाँड्रिंगसाठी आवश्यक असलेला पूर्वनियोजित गुन्हा अस्तित्वात नाही. सिंघवी म्हणाले की, न्यायालयाचा हा आदेश एजन्सींच्या गैरवापराचा सर्वात मोठा पुरावा आहे. फौजदारी कायदा हा राजकीय शस्त्र म्हणून वापरण्यासाठी प्रेस रिलीज नाही. या प्रकरणात, एक पैसाही हस्तांतरित करण्यात आला नाही, किंवा कोणत्याही मालमत्तेची मालकी बदलली नाही. एजेएल अजूनही तिच्या सर्व स्थावर मालमत्तांचे मालक आहे आणि यंग इंडियन ही एक ना-नफा कंपनी आहे, जिथे कोणत्याही वैयक्तिक फायद्यासाठी, पगारासाठी किंवा नफयासाठी कोणतीही तरतूद नाही.

## एस जयशंकर यांनी इस्त्रायल पंतप्रधान नेतन्याहू यांची घेतली भेट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर सध्या इस्त्रायलच्या दौ-यावर आहेत. भारत आणि इस्त्रायल यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याच्या दिशेने हा दौरा एक महत्त्वाचे कूटनीतिक पाउल मानला जात आहे. या दौ-यादरम्यान बुधवारी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांची भेट घेतली आणि दोन्ही देशांमधील विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. जयशंकर यांनी सांगितले की भारत-इस्त्रायल रणनीतिक भागीदारी भविष्यात आणखी मजबूत होईल. आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छाही नेतन्याहूंना दिल्याचे नमूद केले.जयशंकर आणि नेतन्याहू यांच्यात तंत्रज्ञान, आर्थिक क्षेत्र, कौशल्य व प्रतिभा विकास, कनेक्टिव्हिटी आणि सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. जयशंकर यांच्याशी झालेल्या भेटीनंतर नेतन्याहू यांनीही सोशल मीडियावर पोस्ट करत, दोन्ही देशांमधील भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असे म्हटले.



याआधी मंगळवारी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जेरुसलेममध्ये इस्त्रायलचे अर्थव्यवस्था आणि उद्योग मंत्री निर बरकात यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही देशांतील गुंतवणूक, नवोपक्रम आणि व्यापारी सहकार्य पुढे नेण्यावर चर्चा झाली. जयशंकर यांनी विश्वास व्यक्तकेला की भारत-इस्त्रायल मुक्त व्यापार करार (एफटीए) लवकरच पूर्ण होईल, ज्यामुळे आर्थिक भागीदारीला नवी गती मिळेल.

यावेळी जयशंकर यांनी सिडनीतील बांडी बीच येथे हनुक्का उत्सवाच्या वेळी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. भारत आणि इस्त्रायल हे दोन्ही देश दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेची (झिरो टालरन्स) भूमिका घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या दहशतवादविरोधी लढ्याला सातत्याने पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी इस्त्रायलचे आभार मानले आणि दहशतवादाच्या प्रत्येक स्वरूपाविरोधात दोन्ही देश एकत्र उभे असल्याचे सांगितले.परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितले की गेल्या दशकात भारत-इस्त्रायल रणनीतिक भागीदारी लक्षणीयरीत्या मजबूत झाली आहे.

## काँग्रेसची टीका देश प्रेमातून नाही पाकिस्तान प्रेमातून -शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** देशावर दहशतवादी हल्ले होत असताना, भारतीय लष्कर दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करत असताना आणि संपूर्ण देश एकजुटीने उभा असताना काँग्रेसचे नेते मात्र पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कबर खोदण्याची भाषा करणा-यांची कबर देशाची जनता खोदेल, असा थेट, प्रहार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसवर केला.राहुल गांधी, पृथ्वीराज चव्हाण आणि पी. चिदंबरम यांच्या भूमिकेवर टीका करताना शिंदे म्हणाले की, लष्कराच्या कारवाईवर प्रश्न विचारणे म्हणजे थेट जवानांचे मनोबल



खच्चीकरण करणे आहे असे शिंदे म्हणाले. पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांचे तळ अचूकपणे उद्ध्वस्त करण्यात आले. ही कारवाई अत्यंत प्रिसाईज असून कोणतेही नागरी नुकसान झाले नाही. या कारवाईमुळे भारताची लष्करी ताकद आणि राजकीय इच्छाशक्ती जगासमोर पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे, असे शिंदे म्हणाले. या संपूर्ण मोहिमेत लष्करी जवानांच्या पाठीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी खंबीरपणे उभे राहिले. खून आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, हा संदेश मोदी सरकारने पाकिस्तानला आणि संपूर्ण जगाला दिला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.मात्र, या शौर्यपूर्ण कारवाईनंतर काँग्रेसच्या नेत्यांकडून करण्यात आलेली वक्तव्ये देशविघातक असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. ही टीका देशप्रेमातून नाही, तर पाकिस्तानप्रेमातून होत आहे. काँग्रेस नेत्यांची विधाने पाकिस्तानमध्ये हेडलाईन बनत आहेत, हे अत्यंत लाजिरवाणे आहे, असे ते म्हणाले.२६/११ च्या वेळी काँग्रेस सरकारने जर सडेतोड उत्तर दिले असते, तर आज देशाला पुन्हा पुन्हा अशी किंमत मोजावी लागली नसती, असा टोला त्यांनी लगावला. अब गोली का जवाब गोली से, असे सांगत शिंदे यांनी स्पष्ट केले की, पाकिस्तानविरोधातील ही कारवाई संपूर्ण देशाच्या आत्मसन्मानाशी जोडलेली आहे. देश, लष्कर आणि पंतप्रधानांविरोधात गरळ ओकणा-यांना जनता कधीही माफ करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. शेवटी, पहलगाममध्ये निष्पाप नागरिकांच्या हत्येचे जशास तसे उत्तर भारतीय लष्कराने दिल्याचे सांगत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लष्कराला सलामी दिली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे अभिनंदन केले.

## गुटखा उत्पादकांवर नवीन वर्षात मकोका लागणार- मंत्री झिरवाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या मकोका लावण्यासाठीच्या प्रस्तावात आवश्यक त्या दुरुस्त्या कायद्यात करण्यात येणार आहेत. त्यानंतर येत्या नवीन वर्षांत गुटखा उत्पादकांवर मकोका लागणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. मात्र कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येउन गुटखा व्यवसाय करणा-यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरुस्त्या कायद्यात करण्यात येउन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.त्यानुसार नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागले आहे. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण आणणार, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती प्रस्ताव आणण्यात येणार असल्याचेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.गुटखा बंदी कायदा कठोर करण्यासाठी व मकोका लावण्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करून सुधारित प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे लवकरात लवकर पाठविण्याचे निर्देश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिका-यांना दिले.

## मुंबईतले पहिले जेन झी पोस्ट ऑफिस आयआयटी मुंबई इथे उघडणार

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय टपाल विभाग मुंबईतले पहिले जेन झी पोस्ट ऑफिस(टपाल कार्यालय) आयआयटी मुंबई इथे उघडणार असून त्याचे उद्घाटन १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयआयटी मुंबईच्या परिसरात होणार आहे.हा उपक्रम टपाल विभागाच्या आधुनिकीकरण आणि युवा पिढीशी अधिक प्रभावीपणे जोडले जाण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. भारतीय टपाल सेवेच्या परिवर्तनकारी दृष्टिकोनाशी अनुरूप असलेले हे जेन झी टपाल कार्यालय विशेषतः तरुण नागरिक, विद्यार्थी आणि डिजिटल युगातील लोकांसाठी तयार केलेल्या टपाल सेवांसाठी एक नवीन आणि समकालीन दृष्टिकोन सादर करते. दिल्ली, केरळ, गुजरात, बिहार आणि आंध्र प्रदेशमध्ये अशाच प्रकारच्या टपाल कार्यालयांच्या यशस्वी प्रारंभानंतर, मुंबईतील हा शुभारंभ या नवोन्मेषी उपक्रमाचा देशभरात विस्तार करण्याच्या दिशेने एक मोठे पाउल आहे. महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह आणि भारतीय टपाल सेवेच्या (मुंबई विभाग) टपाल सेवा संचालक केया अरोरा यांच्या हस्ते, आयआयटी मुंबईच्या कुलसचिवांच्या सन्माननीय उपस्थितीत, तसेच भारतीय टपाल सेवेचे अधिकारी व कर्मचारी आणि आयआयटी मुंबईतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा होईल. एक आकर्षक, आधुनिक आणि




युवा-केंद्रित स्वरूप देउन रचना केलेले हे 'जेन झी पोस्ट ऑफिस' सार्वजनिक सेवा वितरणातील एका परिवर्तनकारी प्रगतीचे प्रतीक आहे. या जागेची रचना, भित्तिचित्रे आणि भिंतींवरील डिझाइन भारतीय टपाल सेवेच्या चमूने आयआयटी मुंबईच्या विद्यार्थ्यांसोबत समन्वय साधून संकल्पित आणि विकसित केले असून यात सर्जनशीलता, कार्यक्षमता आणि तंत्रज्ञान यांचा सुरेख संगम साधण्यात आला आहे.

**जेन झी टपाल कार्यालयाची प्रमुख वैशिष्ट्ये :** मोफत वाय-फाय सुविधा असलेली जागा; कॅफेटेरिया-शैलीतील बैठक व्यवस्था आणि एक छोटे वाचनालय; समर्पित संगीत कक्ष; निवडक टपाल तिकीट संग्रह संबंधित पूरक वस्तू; पार्सल आणि लाजिस्टिक्स सेवांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी 'पार्सल ज्ञान पोस्ट'; पूर्णपणे डिजिटल, क्यूआर-आधारित सेवा वितरण; आधार नोंदणी आणि अद्ययावत करण्याची सुविधा; टपाल कार्यालय बचत बँक (पीओएसबी ) योजनेचे मूल्यांकन आणि मार्गदर्शन

**विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती:** स्पीड पोस्ट सेवांवर १०% सवलत; मोठ्या प्रमाणात पार्सल पाठवणा-या ग्राहकांसाठी ५% सवलतटपाल कार्यालयाची एक गतिशील समुदाय केंद्र म्हणून ओळख निर्माण करून, परंपरा आणि नाविन्य यांचा मेळ घालणे, हा भारतीय टपाल सेवेचा उद्देश आहे, जेणेकरून टपाल सेवा पुढील पिढीसाठी कालानुरूप, आकर्षक आणि सुलभ राहतील.

## प्रशांत वीर आणि कार्तिक शर्मा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडे क्रिकेटपटू

**अबू धाबी/वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशचा अष्टपैलू क्रिकेटपटू प्रशांत वीर आणि राजस्थानचा यष्टीरक्षक-फलंदाज कार्तिक शर्मा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडे अनकॅप्ड क्रिकेटपटू ठरले आहेत. दोघांनाही आयपीएल २०२६ च्या लिलावात चेन्नई सुपर किंग्जने १४.२० कोटीमध्ये खरेदी केले. प्रशांत वीर आणि कार्तिक शर्मा यांची मूळ किंमत ३० लाख रुपये होती. त्यांनी वेगवान गोलंदाज आवेश खानचा विक्रम मोडला, ज्याला आयपीएल २०२२ च्या लिलावात लखनउ सुपर



जायंट्सने १० कोटींमध्ये विकत घेतले होते. चेन्नईमध्ये रवींद्र जडेजाच्या जागी प्रशांत वीरकडे पाहिले जात आहे. त्याच्यासाठी बोली लावणा-या मुंबई इंडियन्सने प्रथम, त्यानंतर राजस्थान रायल्सने बोली लावली. सनरायझर्स हैदराबादनेही यात सहभाग घेतला. पण चेन्नई सुपर किंग्जने या क्रिकेटपटूसाठी बोली लावणे सुरू ठेवले आणि सर्वांना मागे टाकले. शेवटी, त्यांनी त्याला १४.२० कोटीच्या बोलीने विकत घेतले.राजस्थानचा कार्तिक शर्मा हा डावखुरा फलंदाज आहे. त्याने गेल्या हंगामात रणजी आणि लिस्ट ए पदार्पणात शतके झळकावली. या हंगामात सय्यद मुश्ताक अली ट्राफीमध्येही कार्तिकने चांगली कामगिरी केली आहे.२० वर्षीय प्रशांतने आतापर्यंत दोन प्रथम श्रेणी आणि नउ टी-२० सामने खेळले आहेत, एकूण १२ विकेट्स घेतल्या आहेत.

## तुरूंगवास टाळण्यासाठी राजकीय नेत्यांचा रुग्णालयात आसरा

**मुंबई/प्रतिनिधी :** वादग्रस्त ठरलेले क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली आणि अटकवारंट निघाले. आता तुरुंगात जावे लागणार पाहताच त्यांची तब्येत बिघडली आणि रुग्णालयात दाखल झाले आहेत. तुरुंगात जाण्याची वेळ येताच किंवा तुरुंगात असल्याने बाहेर येण्यासाठी बिघडल्याने रुग्णालयात दाखल होणा-या राजकीय नेत्यांची, बड्या असामींची संख्या वाढतच आहे. त्यामुळे तुरुंगवास टाळण्यासाठी रुग्णालय हा त्यांच्यासाठी मोठाच आसरा ठरला आहे.

कोकाटे हे गेल्या आठवड्यापर्यंत ठणठणीत होते आणि विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनासही उपस्थित होते. मात्र सदनिका गैरव्यवहारप्रकरणी दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली आणि जिल्हा न्यायालयाने त्यांना तुरुंगात जाण्यास फर्मावल्यावर त्यांची तब्येत बिघडली आहे. या आदेशाला स्थगिती मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न असून ते रुग्णालयात दाखल झाले आहेत. तुरुंगात जाण्याचे टाळण्यासाठी किंवा तुरुंगातून बाहेर पडण्यासाठी तब्येतीचे कारण देण्याची नेत्यांची प्रथा जुनीच आहे.



बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव हे तुरुंगात होते आणि तुरुंगातून बाहेर पडण्यासाठी बरेच आजार असल्याचे कारण देत वैद्यकीय जामीन मिळविला होता. माजी मंत्री छगन भुजबळ हे दिल्लीतील महाराष्ट्रसदन गैरव्यवहार प्रकरणी तुरुंगात असताना आजारी पडले आणि त्यांना ब-याच प्रयत्नांनंतर वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळाला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री नवाब मलिक हे कुख्यात दाउद इब्राहिमशी आर्थिक हितसंबंध असल्याच्या कारणांवरुन तुरुंगात होते. मात्र अनेक आजार असून आणि त्यावर खासगी रुग्णालयातच उपचार होउ शकतील, असे कारण देत मलिक यांनी वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळविला आहे. गेले वर्षभराहून अधिक काळ आजारपणावर उपचारांसाठी जामीन मिळविलेले मलिक हे आता महापालिका निवडणुकीच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) प्रचाराची धुरा सांभाळत आहेत.बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड हा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा जवळचा सहकारी. त्याला अटक झाल्यावर लगेच अस्वस्थ वाटू लागले आणि तो रुग्णालयात दाखल झाला. त्याने दीर्घ काळ रुग्णालयातच मुक्काम ठोकला.

**रुग्णालयात सुखसोयी-** आरोपी किंवा कैद्याला तुरुंगात अनेक अडचणी आणि त्रास सहन करावा लागतो. तेथील जेवण चांगल्या दर्जाचे नसते. पंखे नाहीत, डास चावतात, अंथरुण अस्वच्छ, स्वच्छतागृहे खराब, पिण्याचे पाणीही धड नाही, कोठडीत अनेक कैदी किंवा आरोपींबरोबर रहावे लागते, त्यांचा त्रास होतो. हे सर्व टाळण्यासाठी आरोपी किंवा कैदी हे रुग्णालयांचा आसरा घेतात. शासकीय किंवा खासगी रुग्णालयात दाखल केल्यावर त्यांना तेथे स्वतंत्र वार्डमध्ये बेड व अन्य सेवासुविधा उपलब्ध होतात. किंवा वैद्यकीय कारणास्तव खासगी रुग्णालयात उपचारांसाठी जामीन मिळाल्यावर घरीही निवांत राहता येते. त्यामुळे राजकीय नेते असोत किंवा अन्य बडे प्रस्थ असलेली मंडळी आजारी असल्याचे कारण देत रुग्णालयांचा आसरा घेतात.

## संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# संक्रांत कोणावर ?

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्याने राज्यात 'महापालिकांचा महासंग्राम' सुरू झाला आहे. त्यात आता मकर संक्रांतीपर्यंत खंड पडणार नाही. या वर्षाची संक्रांत कोणावर आणि तीळगूळ कोणाला, ते संक्रांतीनंतर दोन दिवसांनी ईव्हीएम मशीनमधूनच उघड होईल. महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन नॉनस्टॉप सात दिवस चालवण्याचे सरकारने कामकाज सल्लागार समितीत संमत करून घेतलं, तेव्हाच १४ डिसेंबरनंतर कोणत्याही क्षणी महापालिकांच्या निवडणुका जाहीर होणार, हे स्पष्ट झाले होते. अन्यथा, नागपूरच्या मनमौजी थंडीत कोण कशाला रविवारीही कामकाज ठेवेल? सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २६ जानेवारीपूर्वी आटोपण्याचे आदेश दिले आहेत. नगर परिषदा आणि नगरपंचायतींचे मतदान झाले असले, तरी अद्याप मतमोजणी आणि निकाल जाहीर होणे शिल्लक आहे. त्याबाबतही न्यायालयाने आदेश दिले आहेत. पण, त्या आदेशांबाबतच प्रशासकीय यंत्रणेच्या मनात गोंधळ आहे. त्या गोंधळाचे निराकरण झाले, की ते निकाल लागतीलच. पण, तोपर्यंत सगळ्यांचे लक्ष महानगरपालिकांच्या निवडणुकांकडे लागले असेल. सर्वच राजकीय पक्षांसाठी शक्तिप्रदर्शनाची ही उत्तम संधी आहे. विद्युतवेगाने नागरिकरण सुरू असलेल्या महाराष्ट्रातल्या महानगरी मतदाराच्या मनात आपले स्थान नेमके काय आहे, हे साऱ्या देशाला दाखवून देण्याची संधी महाराष्ट्रातल्या विविध पक्षांच्या नेत्यांना यानिमित्ताने मिळाली आहे. त्यासाठी त्यांनी व्यूहरचना कधीचीच करून ठेवली आहे. आता साधनसामग्रीसह मैदानात उतरणं तेवढे बाकी आहे. नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत जो राजकीय गोंधळ दिसला, तसाच गोंधळ या निवडणुकांतही बघायला मिळणार आहे. महाविकास आघाडी राज्यातून संपल्यात जमा आहे. आघाडीला धरून ठेवणारी शरद पवार नावाची शक्तीच आघाडीतून बाहेर पडली आहे. त्यांनी महाविकास आघाडीतील आपल्या तुटल्या तुकड्यासोबत निवडणुकीत युती करण्याचे नक्की केले आहे. भारतीय जनता पक्षाचे सर्वोच्च चाणक्य अमित शहा यांनीही या जुळवाजुळवीला कालच दिल्लीत संमती दिली आहे. शरद पवार आणि अजित पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन तुकड्यांत अजित पवार यांचा तुकडा सध्या चांगलाच ताकदवान आहे. अजितदादा स्वतः उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना दिल्लीत अजून मंत्रीपद मिळाले नसले, तरी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना तेल आणि नैसर्गिक वायूशी संबंधित तालेवार समितीचे अध्यक्षपद मिळाले आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांचा दिल्लीच्या वर्तुळातला वावर सहजपणे होतो आहे. त्यामुळे या दोन पक्षांत जुळवून घेण्याची गरज सर्वाधिक शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला वाटायला हवी. पण, दिसते आहे ते वेगळेच. दुसऱ्या गटाबरोबर जुळवून घेण्याबाबत अजित पवार गटच जास्त उत्सुक दिसतो आहे. कारण, दोन तुकड्यांत हा गट ताकदवान असला, तरी महायुतीत प्रतिष्ठेने राहायचे, तर या निवडणुकीत जे बळ दाखवावे लागणार आहे, ते शरद पवार यांच्या तुकड्याच्या सहकार्याशिवाय शक्य नाही, हे त्यांना समजून चुकले आहे. तटकरे आणि पटेल यांनी म्हणूनच शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडून या सहकार्याला संमती मिळवली. शरद पवार गटाचे कार्यकर्ते राज्यात सध्या निर्नायकी अवस्थेत आहेत. खुद्द पवार यांना वय आणि आजारपण यामुळे अन्य नेत्यांच्या तडफेने राजकारण करणं केवळ अशक्य आहे. त्यांच्याशिवाय त्या पक्षात पक्षावर प्रभाव पाडेल, पक्षसंघटनेला एकत्र बांधून ठेऊ शकेल, असा दुसरा नेता नाही. हे खुद्द शरद पवार यांना सर्वात आधी लक्षात आलं असेल. त्यामुळे, पक्ष अगदीच 'शून्या'त जाण्यापेक्षा आपल्याच पुतण्याशी समझोता करून (स्वतःला वेगळे ठेऊन) पक्ष महायुतीच्या वाहत्या प्रवाहात सोडून देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला दिसतो. शरद पवार आणि शहा यांच्यातल्या एकेरी सामन्यात हा अंतिमतः शहा यांचाच विजय असल्याने तटकरे आणि पटेल यांना परवानगी मिळवणं अगदीच सोपं गेलं असणार. शेवटी, 'करून दाखवलेच' म्हणून त्यांनी शहा यांची शाबासकीही मिळवली असेल!पण, तरीही यात एक अडचण आहेच. नवाब मलिक. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोणत्याही परिस्थितीत नवाब मलिक यांचा चेहरा महायुतीत दिसायला नको आहे. भाजपला मुस्लीमबहुल मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला लढवायचं आहे. त्यामुळे, राष्ट्रवादीला त्यांना पूर्ण सोडायचंही नाही आहे. सना मलिक या राष्ट्रवादीच्या आमदार आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादी मुंबईत महायुतीशी अप्रत्यक्ष समन्वयाने पन्नासेक जागा लढेल. असाच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आणखी काही ठिकाणचा अपवाद करत राष्ट्रवादी महायुतीत असेल. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसह ! उबाठाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती नक्की केलीच आहे. पण, मुंबईच्या काँग्रेसला मनसे नको आहे. उबाठा आणि मनसे यांनी परस्परात जागा वाटपासह सर्वच गोष्टी नक्की केल्या आहेत. त्याची प्रचारनीती, घोषणा सगळेच ठरले आहे. काँग्रेसशिवाय. त्यामुळे, महायुतीतल्या उरल्यासुरल्या काँग्रेसवर आपोआपच 'एकला चलो'ची वेळ आली आहे. त्यांचे जे नेते या भाषेत इतरांना इशारे देत होते, त्यांना आता मोठी संधी आहे. काँग्रेसमध्ये किती जण या स्थितीत संतुष्ट असतील आणि 'दिल्ली'ची पक्षाच्या या स्थितीबद्दल काय प्रतिक्रिया असेल, ते तेच जाणोत. थोडक्यात काय, मैदानात पाऊल टाकण्याआधीच महायुती आणखी बळकट झाली आहे. त्यांच्यासमोर संपूर्ण महाराष्ट्रात एकच एक असा प्रतिस्पर्धीच कुठे नसणार, हे आताच स्पष्ट झालं आहे !

# विभागीय साहित्य संस्थांची स्वायत्तता धोक्यात

**महिनाभरातच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर या सर्व विभागीय साहित्य संस्थांपैकी सर्वाधिक, प्रत्येकी पाच आकडय़ाच्या वर सदस्य संख्या असणा-या संस्थांच्या निवडणुक प्रक्रियेला वेग आलेला असेल. तेव्हा या संस्थांचे स्वायत्त अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांचे नेतृत्व सक्षम, समर्थ आणि सजग आहे का, हा प्रश्न या क्षेत्रात विचारला जातो आहे.**



तीन महिन्यांपूर्वी मुंबई मराठी साहित्य संघाच्या निवडणुका पार पडल्या. त्या वेळी प्रथमच या निवडणुकीत उघड उघड एका पॅनेलने आपल्या वैचारिक, राजकीय निष्ठा लपवून न ठेवता स्वतःची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असणारी बांधीलकी जाहीरपणे मांडली होती. विभागीय साहित्य संस्था ताब्यात घेण्यासाठी एवढी उघड भूमिका संघ स्वयंसेवकांनी त्यांच्या संस्थेच्या नावे प्रथमच घेतलेली दिसली. त्यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने ताब्यात घेण्यासाठी गेली तीन वर्षे पेंद्रात व राज्यात त्यांच्याच विचारसरणीचे सरकार असल्याने निष्ठापूर्वक प्रयत्न केले. अगोदर हे प्रयत्न त्यांनी या देशाची साहित्य अकादमी ताब्यात घेण्यासाठी करून बघितले. त्या संस्थेत त्यांनी विविध भाषिक मंडळांतून शिरकाव केला असला तरी अद्याप त्यांना हवे तसे यश तेव्हा लाभले नाही. म्हणून परिवारातील व परिवार संलग्न, तथाकथित 'तटस्थ' लेखकांना अकादमीची पारितोषिके मिळावीत यासाठी शेवटी साहित्य अकादमी पुरस्कार पद्धतच बदलून टाकण्यात आली, मात्र त्यांनी यश मिळवले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या निवडणुकीत आपले पूर्ण पॅनेल उभे करून ती संस्था ताब्यात घेण्याचे त्यांचे प्रयत्न झालेच आहेत.

अर्थात अजून तरी साहित्य अकादमी, मराठवाडा साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ अशा संस्थांमध्ये निवडणुकांमधून तरी त्यांना अपेक्षित यश लाभलेले नाही. या संस्थांनी म्हणजे त्यांच्या बहुसंख्य सदस्यांनी अजून तरी या मंडळींपासून विभागीय साहित्य संस्था असो की साहित्य अकादमी, सुरक्षित राखल्या आहेत.याचा अर्थ हे फक्त उजवे नको आहेत म्हणून झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. डाव्यांनीदेखील असेच प्रयत्न त्यांचेच तेवढे पॅनेल, त्या विचारसरणीची नावे उघडपणे उभी केली असती तर हेच घडले असते अशी स्थिती या संस्थांमध्ये अद्याप तरी आहे.

विभागीय साहित्य संस्था असो की साहित्य अकादमीसारख्या स्वायत्त संस्था असोत, यात या अगोदर उजवीकडे, डावीकडे वैचारिक झुकाव असणारे अथवा प्रत्यक्ष स्वयंसेवक वा डाव्या पक्षांशी संबंध असणारे लोक कार्यकारी मंडळात नाहीत वा नव्हते असे नाही. होते, आहेतही. मात्र या संस्थांमध्ये ते व्यक्तिगत पातळीवर होते. उजव्या वा डाव्या पक्ष, संघटना यांच्या नावावर कधीच निवडून दिले गेले नव्हते. मात्र मुंबई मराठी साहित्य संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत स्वतःला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे म्हणून जाहीर करून लढलेल्या पॅनेलमधून निवडून आलेले हे त्या आधारावर प्रथमच निवडून दिले गेले आहेत. ते बहुमतात नसले तरी वास्तवाकडे डोळेझाक करून चालणार नाही. विभागीय साहित्य संस्थांच्या शंभर-दीडशे वर्षांच्या अस्तित्वाच्या काळात हे प्रथमच घडले आहे.

एकीकडे त्याच विचारसरणीचे म्हणवणारे महाराष्ट्र सरकार स्वतःच संबंधित क्षेत्राचा कितीही विरोध असला तरी व भाषा, साहित्य, संस्कृती ही क्षेत्रे सरकारने ताब्यात घेऊन स्वतःच चालवण्याची नसली तरीही या सरकारने ती ताब्यात घेण्याचा व चालवण्याचा रेटून प्रयत्न चालवला आहे.त्यासाठी सरकारने स्वतःच जनतेच्या, करदात्यांच्या कोटय़वधी रुपयांचा चुराडा करत तीन विश्व मराठी संमेलने आयोजित करून झाली. त्यांचे हिशेब, खर्चाचा तपशील माहिती अधिकारातदेखील देण्याचे नाकारून आता चौथे विश्व मराठी संमेलनदेखील नाशिकला सरकारच आयोजित करते आहे. दुसरीकडे वर्धा, अमळनेर, दिल्ली अशी लागोपाठ तीनही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनेही सत्ताधा-यांनी ताब्यात घेण्याची गडद सावट पडून गेली आहे. तिसरीकडे सरकारने सरकारच्या भाषा, साहित्य, संस्कृती विषयक संस्था, मंडळे ही जी कार्यात्मक स्वायत्त असलेली आणि महाराष्ट्रातील दीड-दोनशे प्रतिभावंत, विचारवंत, लेखक इ. मिळून चालवतात त्यांच्याकडून ती काढून घेऊन त्यांची सरकारी खातीच करण्याचा घाट घातलेलाच आहे. फक्त संबंधित क्षेत्रातील सजग कार्यकर्ते, चळवळी, समूह, यांच्या प्रखर विरोधामुळे तो तूर्तास तरी स्थगित तेवढा आहे. याचा अर्थ सरकारने तो कायमचा सोडून दिला आहे या भ्रमात कोणी राहू नये. चौथीकडे राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व विश्वकोश मंडळ या मंडळात सरळ सरळ सत्तारूढ राजकीय पक्षांचे प्रवक्ते, कार्यकर्ते यांना नेमण्यासाठी नसलेले उपाध्यक्ष पद सरकारने निर्माण केलेच आहे.

सत्तेचे भाषा, साहित्य, संस्कृती क्षेत्रावर हे जे आतून, बाहेरून उघड आक्रमण सध्या होत आहे तसे ते यापूर्वी या स्वरूपात कधीही नव्हते. त्यामुळे या संस्था कोणत्याही अशा स्वयंउद्घोषित उजव्या अथवा याची प्रतिक्रिया म्हणून उद्या डाव्या लोकशाहीवादी शक्तींनी उघडपणे त्यांच्याही नावाने या संस्थांच्या निवडणुका लढवण्याचे ठरवलेच तर त्यांच्याहीपासून कशा सुरक्षित आणि स्वायत्त राखायच्या हे आव्हान प्रथमच उभे ठाकले आहे.या संस्थांचे सर्व प्रकारचे लाभ हवे असणारे आणि घेऊन झालेले मान्यवर, तथाकथित मान्यवर, नवोदित, संभाव्य लाभार्थी आणि एरवी सुस्त, अलिप्त आणि निष्क्रियच असणारे या संस्थांचे विश्वस्त, कार्यकारी मंडळ सदस्य, आजीव आणि साधारण सदस्य हे अजूनही स्वतःला तसेच राखणार असतील तर सरकारच्याच काय पण या संस्थांचेदेखील सरकारीकरण, विशिष्ट विचारसरणीकरण, राजकीयीकरण होण्याचे व सत्तानुकूल अशाच त्या चालवल्या जाण्याचे दिवस दूर असणार नाहीत.

येत्या महिन्याभरातच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि विदर्भ साहित्य संघ नागपूर या सर्व विभागीय साहित्य संस्थांपैकी सर्वाधिक, प्रत्येकी पाच आकडय़ाच्या वर सदस्य संख्या असणा-या संस्थांच्या निवडणुक प्रक्रियेला वेग आलेला असेल. तेव्हा या संस्थांचे स्वायत्त अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांचे नेतृत्व सक्षम, समर्थ आणि सजग आहे का? हा प्रश्न या क्षेत्रात विचारला जातो आहे.

नसेल तर या संस्था तशी दृष्टी असणा-या व कोणत्याही विशिष्ट पक्षांच्या दावणीला अथवा सरकारच्या दावणीला बांधू दिल्या जाणार नाहीत अशी खात्री व प्रतिमा असलेल्या निर्भीड सक्षम आणि समर्पित लेखकांच्या हाती कशा सोपवल्या जातील याचा विचार आताच केला जाणे गरजेचे आहे, अन्यथा साप निघून गेल्यावर भुई थोपटत बसणे निरर्थक ठरेल. (साभार-म.टा.)

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

## न्यायमूर्ती स्वामीनाथन यांच्यावरील महाभियोग...

सध्या मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. आर. स्वामीनाथन् यांना पदावरून हटवण्यासाठी त्यांच्या विरोधात महाभियोग चालवण्याकरिता काँग्रेससह विरोधी पक्षांचे नेते एकवटले आहेत. न्यायमूर्ती स्वामीनाथन् यांनी कोणता गंभीर गुन्हा केला? त्यांनी भ्रष्टाचार केला की कुणाशी गैरवर्तन केले? तर त्यांनी यातील काहीही केलेले नाही. त्यांनी केवळ सत्याची बाजू मांडली हाच त्यांचा 'गुन्हा'... घटना अशी की, तमिळनाडूतील मदुराई जिल्ह्यातील पुरातन सुब्रमण्य मंदिरात कार्तिकेय दीपम् उत्सवाच्या वेळी तेथील टेकडीवर असलेल्या दीपस्तंभावर दीप लावण्याची परंपरा आहे. मंदिराच्या बाजूला सिकंदर बादशाह दर्गा आहे.तेथील काही मुस्लीम समाजातील लोकांनी दीपप्रज्वलनाला विरोध केला आणि उच्च न्यायालयाचे द्वार ठोठावले. या प्रकरणात स्वामीनाथन् यांनी स्पष्टपणे सांगितले की,'टेकडीवरील दीपस्तंभावर दीप प्रज्वलित केल्यामुळे मुसलमानांच्या अधिकारांचे कोणतेही हनन होणार नाही. मात्र या परंपरेचे पालन झाले नाही, तर हिंदूंच्या अधिकारांचे हनन होऊ शकते.' तसेच, ही टेकडी हिंदूंची आहे; या भूमीवर स्वतःचा अधिकार अबाधित राखण्यासाठी मंदिराने येथे दीप प्रज्वलित करणे आवश्यक आहे, असे वक्तव्यही त्यांनी केले. यानंतर तेथील हिंदुद्वेष्ट्या द्रमुक सरकारने उच्च न्यायालयाचा निकाल अमान्य केला. एवढेच नव्हे, तर कायदा व सुव्यवस्थेचे कारण पुढे करत या दीपस्तंभावर दीपप्रज्वलन होऊ दिले नाही. एवढे करूनही समाधान झाले नाही; तर ज्यांनी घटनात्मक अधिकार, नागरी स्वातंत्र्य, कारागृहात पुरवण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये सुधारणा करणे आदी महत्त्वपूर्ण खटल्यांवर निकाल दिले आहेत. ज्यांनी मागील ७ वर्षांमध्ये ६४ सहस्र ७९८ खटले निकालात काढले आहेत. असे स्वच्छ चारित्र्य आणि महान कर्तृत्व असलेल्या न्यायमूर्ती स्वामीनाथन् यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याचा आटापिटा करण्यात येत आहे. कोणत्याही न्यायाधीशाने सत्याच्या आणि हिंदूंच्या बाजूने निकाल देऊ नये, यासाठी त्यांच्या मनात दहशत निर्माण करण्याचे हे षडयंत्र आहे, असे या प्रकरणातून स्पष्टपणे दिसून येते.

**ॲड. वैशाली परांजपे**
**नागपूर**

## महाराष्ट्राला विरोधी पक्षनेते कधी?

महाराष्ट्रात विधानसभेत २८८ पैकी २३५ आमदार महायुतीचे असताना नुकताच महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषद अशा दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षनेत्याविना अधिवेशनाचे सूप वाजले. राज्याला विरोधी पक्षनेता नाही ही दुर्दैव नाही काय? ही ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल पाच दशकांच्या राजवटीत असली पहिल्यांदाच घटना घडली. विरोधी पक्षनेता म्हणजे जनतेचा बुलंद आवाज असतो त्यामूळे सरकारच्या बेलगाम कारभारावर अंकुश कोण ठेवणार?जनतेचे प्रश्न पोटतिडकीने मांडणे आणि सरकारच्या बेलगाम कारभारावर अंकुश ठेवणे हे विरोधी पक्षाचे काम असते मग महायुती सरकारला विरोधी पक्षनेत्याचे वावडे कशासाठी आहे.।

**राजू जाधव**

## पक्षनिष्ठा वाऱ्यावर .....

नगरपरिषदच्या निवडणुका पार पडल्या आहेत व आता निकालाची प्रतीक्षा आहे.हे निकाल २१ डिसेंबरला निवडणुकीचे निकाल बाहेर पडतील आता महाराष्ट्रातील महानगर पालिकांच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत.उमेदवारांची लगबग सुरु आहे.दरम्यानच्या काळात अनेक इच्छुक एक पक्षातून करून दुसऱ्या पक्षात प्रवेश घेत आहेत व जनतेसमोर उभे राहत आहेत.यात पक्षनिष्ठा वाऱ्यावर सोडून हे उमेदवार जनतेसमोर जात आहेत.तीन चार दशकापूर्वी पक्षनिष्ठा महत्वाची होती. आज त्याला महत्व उरले नाही.एन डी पाटील,एस. एम.जोशीं, शेकाप पक्षाचे गणपतराव देशमुख अशी अनेक नावे पुढे येतात. गणपतराव देशमुख हे शे का पक्षाचे सांगोल्याचे आमदार होते. सुमारे ५४ वर्षे त्यांनी हे आमदार पद भूषविले. एकूण ११ वेळा ते निवडून गेले पण त्यांनी कधी पक्ष बदलला नाही.अशी निष्ठा आज क्वचितच दिसते.देशात अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश होत आहेत हे बदल केवळ सत्तेसाठी होत आहेत.हरियाणातून या पक्षबदलाची प्रक्रिया सत्तेसाठी सुरु झाली.आता जनतेनेच सावध राहिले पाहिजे व अशा पक्षबदलून बाजूला केले पाहिजे.यातच खरे पाहता मतदारांची ताकद दिसेल व अशा पक्ष बदलूना धडा मिळेल.

**शांताराम वाघ**

## नवोदित खेळाडूंवर कोट्यवधींची उधळण

अबुधाबीच्या एतिहाद एरिनामध्ये नुकत्याच पार पडलेल्या टाटा आयपीएल २०२६ मिनी लिलावात दहा संघांच्या फ्रेंचायजींनी देशी परदेशी मिळून एकूण ७७ खेळाडूंची खरेदी केली. या लिलावाचे वैशिष्ट्य म्हणजे ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन याच्यावर सर्वात मोठी बोली लागली आणि त्याला कोलकाता नाइट रायडर्सने २५.२० कोटी रुपयांना आपल्या संघात घेतले. तो आजवरच्या 'आयपीएल' इतिहासात सर्वात मोठी बोली लागलेला परदेशी खेळाडू ठरला. तर चेन्नई सुपर किंग्स या संघाने राजस्थानचा १९ वर्षीय यष्टिरक्षक फलंदाज कार्तिक शर्मा आणि उत्तर प्रदेशचा २० वर्षीय अष्टपैलू खेळाडू प्रशांत वीर या दोन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण न केलेल्या नवोदित आणि अपरिचित खेळाडूंना प्रत्येकी १४.२० कोटी रुपयांच्या रकमेसह आपल्या संघात सामावून घेतले. नवोदित खेळाडूंसाठीची आजवरची ही विक्रमी रक्कम ठरली. या लिलावाने अकिब नबी दार (८.४० कोटी, दिल्ली कॅपिटल्स), मंगेश यादव (५.२० कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु), तेजस्वी सिंह दहिया (३ कोटी, कोलकाता नाइट रायडर्स), अक्षत रघुवंशी (२.२० कोटी, लखनऊ सुपर जायंट्स), सलील अरोरा (१.५० कोटी, सनरायजर्स हैदराबाद) या नवोदित खेळाडूंनाही कोट्याधीश बनवले. या मिनी लिलावात अनेक खेळाडू करोडपती झाले. अशा परिस्थितीत २२ मार्च ते २५ मे २०२६ दरम्यान रंगणारा २०२६ चा आयपीएलचा १९ वा हंगामही सालाबादप्रमाणे रंगतदार होणार यात शंका नाही.

**प्रदीप मोरे**

# सावकारी पाश आणि शेतकऱ्याचा नाश !



सावकारीवर चाप बसवण्यासाठी 'महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' कायदा आणला आहे. जो बेकायदेशीर सावकारांना आळा घालतो आणि या कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद आहे. तसेच या कायद्यात वेळोवेळी सुधारणा करून कारवाईची व्याप्ती वाढवली जात आहे.तरी देखील बेकायदेशीर सावकारी सुरू असून अनेक सावकारांनी बेकायदेशीपणे अनेकांची संपत्ती,शेती हडपून घेतली आहे.एवढेच नव्हे तर सावकार दामदुप्पट रक्कम वसूल करत असून कर्जदाराला शेती व किडनी विकण्याची वेळ येत आहे.

चंद्रपूरच्या शेतकऱ्याने कंबोडियाला जाऊन किडनी विकल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे.सावकाराचे एक लाखाचे कर्ज ७४ लाखांवर गेले.चंद्रपूर जिल्ह्यातून माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घडल्याची समोर आली.कर्जाची परतफेड करण्यासाठी शेतकऱ्याने आठ लाख रुपयात किडनी विकल्याची धक्कादायक घटना नागभीड तालुक्यातील मुंठुर गावात घडली. प्रकारामुळे महाराष्ट्र हादरला असून पुरोगामी राज्यात कर्ज फेडण्यासाठी किडनी विकावी लागत असल्याने असंतोष व्यक्त केला जात आहे.

सावकाराच्या जाचाला कंटाळून किडनी विकणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील मिंथुर येथील शेतकरी रोशन कुडे यांच्या वडिलांनी त्यांचा मुलगा सावकारी पाशात कसा फसत गेली,याची विस्तृत हृदयद्रावक व्यथा एबीपी माझाच्या कॅमेरासमोर मांडली आहे.करोना काळात डबघाईला आलेला दुधाचा व्यवसाय आणि त्यानंतर आलेल्या लंपी आजारामुळे रोशन कुडे सावकाराकडून घेतलेले अवघे एक लाख रुपयांचे कर्ज फेडू शकले नाही. मात्र दुसरीकडे सावकार त्याला पद्धतशीर आपल्या जाळ्यात अडकवत राहिले. व्याजावर व्याज चढवत लाखो रुपयांची रक्कम त्याच्याकडून लाटली आणि अखेर त्याला किडनी विकण्यास भाग पाडले, अशी व्यथा शिवदास कुडे यांनी मांडली आहे.

कायदा असून देखील सावकारांची बेकायदेशीर वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे.सावकाराचे कर्ज चुकवून देखील सावकार दामदुप्पट वसुली करत असल्याने अनेकांनी आत्महत्या देखील केलेल्या आहेत.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की बेकायदेशीर सरकारने चाप कधी बसणार?पोलीस आणि प्रशासनाच्या पातळीवर तक्रारींचे आवाहन केले जात आहे, मात्र हा विळखा अजूनही कायम आहे आणि त्यावर कठोर अंमलबजावणी व लोकांमध्ये जागरूकता गरजेची आहे, असे दिसते.

बेकायदेशीर सावकारीला चाप पूर्णपणे बसवण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहून तक्रारी करणे, पोलिसांची मदत घेणे आणि कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे, कारण सावकारी आजही सुरूच आहे.२०१४ मध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम लागू झाला, ज्यामुळे अनधिकृत सावकारी करणाऱ्यांवर कारवाई होते. या कायद्यात सुधारणा करून आता १५ वर्षांपर्यंतच्या जुन्या प्रकरणांमध्येही कारवाई करण्याची तरतूद आणली जात आहे, जेणेकरून जुन्या पिळवणुकीलाही चाप बसेल.या कायद्यात दंड आणि शिक्षेची तरतूद आहे, जसे की दामदुप्पट व्याज वसूल केल्यास दंड आणि ५ वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते.

अवैध सावकारांना पायबंद घालण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायद्याच्या तरतुदीनुसार विनापरवाना सावकारी करणाऱ्यास पाच वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा किंवा ५० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. असे असूनही अनेक ठिकाणी चोरीचे सावकारी सुरू आहे.राज्यात अवैध सावकारांचा विळखा वाढत असून, लोककल्याणाचे ठेकेदार आपणच आहोत, असे स्वयंघोषित म्हणविणारे गावगुंड सावकारांचे प्रस्थ वाढत आहे.शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला महागाईचा फटका बसत आहे. मुला-मुलींचे शिक्षण, लग्न, शेतीसाठी अथवा छोट्या-मोठ्या व्यवसायासाठी सर्वसामान्यांना कर्ज घ्यावे लागते. मात्र, बँका अपुऱ्या कागदपत्रांचे कारण पुढे करून सोईस्कर कर्जपुरवठा करण्याचे टाळत असल्याने आपसूकच आर्थिक चणचण पाचवीलाच पुजलेल्या शेतकऱ्यांना अशावेळी ओळखीच्या व्यक्तीकडून व्याजाने रकमेची उचल करावी लागते.सावकारीला चाप बसवण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे आणि ती अधिक प्रभावी करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे, पण नागरिकांनी सक्रिय होऊन तक्रारी करणे आवश्यक आहे.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल** वर्धा
मो. ९५६१५९४३०६

# ईटीएस मोजणी करून दोन महिन्यात अहवाल सादर करण्याचे विधानसभा उपाध्यक्षाचे आदेश

## मात्र पुसद येथे ईगल कंपनीने गौणखनिज उत्खनन केलेल्या चौकशीचे काय ?, उपविभागीय अधिकारी यांच्याकडे २०२२ पासून तक्रार धुळखात पडून!

## जिल्हाखणिकर्म विभागाकडून ४२ हजार ब्रासची गौणखणीज परवानगी ;जि.प.बांधकाम विभाग अभियंत्यांचा मोजणी उत्खनन अहवाल १ लाख ३५ हजार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - यवतमाळ वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे प्रकल्पातील गौण खनिज गैरप्रकारप्रकरणी ईटीएस मोजणी करून दोन महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान ११ डिसेंबर रोजी आयोजित बैठकीत बनसोडे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आदेश दिले. वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पातील कोट्यवधी रुपयांचा गौण खनिनज घोटाळा चांगलाच गाजत आहे. सदर प्रकरणातील जबाबदार अधिका-यांची बैठक विधानसभा उपाध्यक्षांनी नागपूर अधिवेशन दरम्यान बोलविली होती. ईटीएस मोजणीचे आदेश दिले असताना टाळाटाळ करण्यात येत असल्यामुळे अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. एवढेच नव्हे तर येत्या दोन महिन्यात ईटीएस मोजणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले. अहवाल सादर न केल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले.

परंतु पुसद तालुक्यातील सन २०२२मध्ये काही चार ते पाच सामाजिक कार्यकर्त्यांनी पुसद शहरातील सिमेंट रोड तसेच पुसद-माहूर रोड, पुसद-दारव्हा- शेंबाळपिंपरी डांबरीकरण रोड बनविण्याचा कंत्राट ईगल इन्फ्रा कंट्रक्शन कंपनी उल्हासनगर/पनवेल यांनी इंद्रजीत कंट्रक्शन कंपनीच्या भागीदारीत सदरील ९० किलोमीटरचे पक्के रस्ते निर्मितीचे कंत्राट मिळवले होते. यासाठी लाखो ब्रास गौण खनिज उत्खनन करून शासनाची रॉयल्टी व महसूल बुडविला होता याबाबत तक्रार करण्यात आली होती. सदर कंपनीने मौजा भाटंबा येथील शेत सर्वे नंबर ४१ बाबूलाल परसराम शेरे यांच्या मालकीची जमीन ४:०५ हेक्टर आर म्हणजे १० एकर ही जमीन तीन वर्षासाठी भाडेतत्त्वावर घेऊन ती जमीन आकर्षक करून घेतली आणि या जमिनीवर काही भागात क्रेशर प्लॉन्ट उभारणी केला. या कंपनीचे संचालक श्रीराम खूबचंदानी रा.मुंबई यांनी ही जमीन आकर्षक असूनही खरेदी करतेवेळी दुय्यम निबंधक कार्यालयाच्या दस्तऐवजावर जाणीवपूर्वक खरेदीखत चुकविण्याचे हेतूने कृषक जमीन दाखवून नाममात्र कर भरून खरेदी केली. सदर ईगल इन्फ्रा कंट्रक्शन कंपनीच्या प्लांट शेजारी असलेले शेत सर्वे नंबर ३७ नामे-राजू शेरे व इतर यांच्या नावे असलेली ३:४६ हे.आर जमीन ही ईगल इन्फ्रा कंट्रक्शन कंपनीने घेऊन या ठिकाणी उत्खनन सुरू केले होते. याबाबत पुसद येथील चार/पाच सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार यांनी सदर शेत सर्वे नंबर३७ मध्ये झालेल्या गौण खनिज उत्खननाची तक्रार दिनांक २२ ऑगस्ट २०२२ रोजी उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी पुसद यांना देऊन तसेच विभागीय आयुक्त अमरावती व जिल्हाधिकारी यवतमाळ यांनाही तक्रारीची प्रत पाठवून चौकशीची मागणी केली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे उपविभागीय अधिकारी पुसद यांना पत्र क्रमांक/अकृषक/कावि ९२४/२०२२दि.३०/०९/२०२२ यानुसार सदर विषयाच्या अनुषंगाने चौकशी करून नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल



कार्यालयास सादर करावा असे पत्र सुद्धा देण्यात आले होते. तसेच या गौणखनिज उत्खननाबाबत अनेक दैनिक वृत्तपत्रात दिनांक २०ऑगस्ट तसेच २१ व २३ऑगस्ट २०२२ रोजी बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या याची दखल घेत उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग पुसद यांना मोजणी संदर्भात झालेल्या उत्खननाचा अहवाल सादर करण्यासाठी पत्रव्यवहार करून तात्काळ अहवाल मागविण्यात आला, या अनुषंगाने जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता विनोद चव्हाण यांनी मोजमाप करून १ लाख ३५ हजार उत्खनन झाल्याचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांना सादर करण्यात आलेला आहे. परंतु २०२२ पासून केलेल्या तक्रारीचा चौकशी अहवाल हा आज २०२५ संपत आलेला आहे परंतु या झालेल्या उत्खननाची चौकशी गुलदस्त्यात ठेवून कोणत्याही प्रकारची ईगल इन्फ्रा कंट्रक्शन कंपनीला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७)(८) नुसार दंडात्मक कारवाई करण्याचा आदेश अद्याप पर्यंत करण्यात आलेला नाही किंवा कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही. एकीकडे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पुसद, उमरखेड, यवतमाळ उपविभागात झालेल्या रेल्वेच्या उत्खननाची तात्काळ एटीएस चौकशी सादर करण्याचे आदेश करतात, परंतु पुसद तालुक्यात झालेल्या ईगल इन्फ्रा कंट्रक्शन कंपनीने उत्खनन केलेल्या चौकशीचे काय असा प्रश्न पुसद तालुक्यातील नागरिक उपस्थित करीत आहे. इगल कंपनीला सदर काम हे १५०० ते १८०० कोटी रुपयाचे शासनाने देण्यात आल्याचे समजते परंतु शासनाला गौणखनिज रॉयल्टी भरताना मात्र ह्या कंपन्या दिशाभूल करून लाखो ब्रास उत्खनन करून करोडो रुपये शासनाचा रॉयल्टी बुडवत आहेत हा करोडो रुपये महसूल शासनाच्या तिजोरीत अद्याप पर्यंत वसूल करून जमा होणे अपेक्षित होते परंतु याकडे महसूल अधिकारी दुर्लक्ष करतांना दिसून येत आहे, त्यामुळे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पुसद तालुक्यातील ईगल कंपनीने अतिरिक्त केलेल्या उत्खननाच्या चौकशीचे आदेश देऊन तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा महसूल अधिकारी यांना दंड वसूल करण्याचे निर्देशित करण्यात यावे, किंवा सदर कंपनीची पुसद तालुक्यात असलेली स्थावर मालमत्ता ही जप्त करण्यात यावी अशी तक्रारकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून मागणी होत आहे.

## • वेचक



### महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल कडून प्रशांत गावंडे यांना अवार्ड ऑफ एक्सलन्स देऊन सन्मानित

पुसद - जागतिक फार्मासिस्ट दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद (Maharashtra State Pharmacy Council) यांनी महाराष्ट्रमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे फार्मासिस्ट, फार्मसी कॉलेज, असोसिएशन, याची निवड दरवर्षी करण्यात येते. यावेळी पुसद येथील जय संतोषी मेडिकल अँड स्टोअर्स चे संचालक तथा विविध सामाजिक कार्यात भाग घेणारे प्रशांत निळकंठराव गावंडे यांची वैयक्तिक फार्मासिस्ट म्हणून अमरावती विभागातून प्रथम क्रमांकाची निवड करून त्यांना यावर्षीचा "अवार्ड ऑफ एक्सलन्स" देऊन मान्यवरांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. औषध साक्षरता ग्रामीण भागात राबवून औषधी विषयी जनजागृती करण्याचे त्यांचे मोठे काम आहे, खास करून जिल्हा परिषदेतल्या प्रत्येक शाळेत जाऊन ते औषध साक्षरता मोठ्या प्रमाणात राबवत असतात. यासोबत पर्यावरणवादी, शैक्षणिक सामाजिक असंख्य उपक्रमाची त्यांच्या नावाची मोठी नोंद आहे. जिल्हा परिषदेची शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ते अहोरात्र काम करतात, सातपुडा एज्युकेशन, व सातपुडा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी च्या अध्यक्षा डॉ. स्वातीताई वाकेकर, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद DIC प्रमुख गणेश बंगळे, यवतमाळ जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष पंकज नानवाणी, सचिव संजय बुरले, सातपुडा इन्स्टिट्यूट फार्मसी चे प्राचार्य डॉ. शैलेश भरड , DIC अवार्ड कॉर्डिनेटर भूषण माळी यांच्या हस्ते श्री संत गजानन महाराज नगरी शेगाव येथील सातपुडा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेज या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते प्रशांत गावंडे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या अगोदर सुद्धा प्रशांत गावंडे यांना राज्याचे अन्न व औषधी प्रशासनाचे तत्कालीन सनदी अधिकारी ,आयुक्त महेश झगडे यांच्या हस्ते "फार्मा गौरव पुरस्कार" देऊन गौरवण्यात आले, सलाम मुंबई फाउंडेशन , सेवाभावी संस्था, विविध संघटने द्वारा प्रशांत गावंडे यांना विविध पुरस्कार मिळण्याची नोंद आहे, सर्व क्षेत्रात सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असतो, कोल्हापूर सांगली येथील पूरग्रस्त साठी त्यांनी सात दिवस कॅम्प लावून पूरग्रस्त भागात मोठी सेवा दिली हे प्रामुख्याने नमूद करण्यात येते, स्व. जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी द्वारे ते ग्रामीण ,अतिदुर्गम ,शहरी भागात विविध उपक्रम करतात, पुरस्कार समारंभी विविध क्षेत्रातील मान्यवर फार्मसी कॉलेज चे प्राचार्य प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते.

### आंबेडकरी साहित्यिक रामराव कांबळे यांचे"बाबासाहेब आम्ही बेईमान झालोत!"या पुस्तकाचे प्रकाशन



महागाव : १२ डिसेंबर रोजी भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने वाटोद तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे संयोजक- भदंत महाकाशप यांनी एक दिवशीय धम्मपरिषद आयोजित केली होती. या धम्म परिषदेचे अध्यक्ष- भंते प्रज्ञापाल ,प्रमुख मार्गदर्शक भदंत डॉ. हर्षा बोधी महाथेरो औरंगाबाद व भिकू संघ, विद्रोहाचा ज्वालामुखी पँथर दीपक भाई केदार यांचे हस्ते आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कवी साहित्यिक रामराव कांबळे यांचे "बाबासाहेब आम्ही बेईमान झालोत" या अतिशय वास्तविक आणि वाचनीय असलेल्या पुस्तकांचे त्यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. या अगोदर देखील रामराव कांबळे यांचे -स्वतंत्र भारताचे गुलाम,हत्यारा कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. रामराव कांबळे यांनी खरोखर अतिशय तळमळीने हे पुस्तक लिहिले असून युगप्रवर्तक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हा बहुजन समाज जर बेईमान झाला नसता तर भारत केव्हाच जगामध्ये एक नंबरचा महासत्ता बनला असता असे भदंत डॉक्टर हर्षा बोधी महाथेरो यांनी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला कलावंत कुमारी खुशबू अरविंद मिसळे, ( मी रमाई सादर कर्ती) नंदू वानखेडे कमांडर समता सैनिक दल, आणि त्यांची टीम,सामाजिक कार्यकर्ते नाना भवरे, देवराव हरणे, विजयकुमार कांबळे, रमेश सांगडे पत्रकार बंधू तसेच हजारो महिला आणि बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन आयुष्यमान संजय कांबळे यांनी केले.

# निम्न पैनगंगा धरणविरोधी संघर्ष समिती मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : सन १९९७ साली महाराष्ट्र शासनाने निम्न पैनगंगा प्रकल्पाला मान्यता दिली. या प्रकल्पामुळे विदर्भ व मराठवाड्यातील एकूण ९५ गावे बुडीत क्षेत्रात जाणार असून सुमारे दीड लाख नागरिक विस्थापित होण्याची भीती आहे. या प्रकल्पात सुमारे ५० हजार एकर सुपीक शेती, तसेच अडीच हजार एकर समृद्ध जंगल नष्ट होणार आहे. विशेष म्हणजे बुडीत क्षेत्रातील ९५ गावांपैकी ४४ गावे आदिवासी क्षेत्रात येत असल्याने ग्रामसभेची परवानगी आवश्यक असताना पाटबंधारे विभाग पोलिस बंदोबस्तात युद्धपातळीवर काम सुरू असल्याचा आरोप धरणविरोधी संघर्ष समितीने केला आहे.

या भागातील नागरिकांची शेती हेच मुख्य उपजीविकेचे साधन असून प्रकल्पामुळे ते हिरावले जात आहे. पुनर्वसनानंतर शेतीऐवजी मजुरीवर अवलंबून राहावे लागणार असल्याने उपजीविकेचा प्रश्न गंभीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक २९ नोव्हेंबर रोजी प्रकल्पाचे काम सुरू असताना बुडीत क्षेत्रातील सुमारे पाच हजार महिला-पुरुष शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम बंद पाडले. त्यानंतर पोलिसांनी पाच ते सहाशे शेतकऱ्यांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले. दहा दिवस अटकपूर्व जामिनासाठी प्रतीक्षा केल्यानंतर न्यायालयातून जामीन मिळाला मात्र त्यानंतर पुन्हा विदर्भ व मराठवाडा या दोन्ही बाजूंनी पोलिस बंदोबस्तात काम सुरू करण्यात आले आहे. पोलिस संरक्षणात धरणाचे काम सुरू असलेला हा देशातील पहिला प्रकल्प असावा, असा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. गेल्या २८ वर्षांपासून धरणविरोधी संघर्ष समितीने या प्रकल्पाला कडवा विरोध करत एकदाही प्रत्यक्ष काम होऊ दिले नसल्याचे सांगण्यात आले. मात्र सत्ताधारी वा विरोधी कोणत्याही लोकप्रतिनिधीने विधिमंडळ अधिवेशनात या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याची खंत समितीने व्यक्त केली आहे. ६०० शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल होऊनही कोणत्याही लोकप्रतिनिधीने सहकार्य न केल्याचा आरोपही करण्यात आला. या पार्श्वभूमीवर धरणविरोधी संघर्ष समितीने मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची मदतीच्या अपेक्षेने गुरुवारी सकाळी दहा वाजता अंतरवाली सराटी येथे भेट घेण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाविरोधात औरंगाबाद व नागपूर खंडपीठात याचिका दाखल असून, येत्या दोन दिवसांत सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल केली जाणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलनाला पाठबळ मिळावे व धरणविरोधी आंदोलनाला व्यापक सहकार्य लाभावे, हा या भेटीमागचा मुख्य उद्देश असल्याची माहिती संघर्ष समितीचे प्रसिद्धी प्रमुख व संघटक सचिव मुबारक तंवर यांनी दिली.

# महागाव तालुका मराठी पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी रजतकुमार खाडे यांची बिनविरोध निवड !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - महागांव तालुका मराठी पत्रकार संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून संघटनेच्या पुढील कार्याचा रोडमॅप ठरवण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक सतिश मंगल कार्यालय, महागांव येथे पार पडली.

या बैठकीत मार्गदर्शक म्हणून निलेश पाटील नरवाडे, मंचकराव गोरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनेच्या मजबुतीकरणासह पत्रकार बांधवांच्या हक्कांसाठी लढा अधिक जोमाने देण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त झाला.

नवीन कार्यकारिणी नवनियुक्त अध्यक्ष रजतकुमार खाडे, उपाध्यक्ष सदानंद जाधव, सचिव श्रीकांत राऊत यांची सर्वानुमत्ते निवड करण्यासाठी पारदर्शक प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला. पत्रकारितेच्या क्षेत्रातील अनुभव, कार्यतत्परता आणि संघटनेप्रति निष्ठा या निकषांवर निवड करण्यात आल्याचे मार्गदर्शक निलेश पाटील



नरवाडे व मंचकराव गोरे यांनी सांगितले. या निवड प्रक्रियेला उपस्थित असलेल्या सर्व पत्रकारांनी आनंद व्यक्त करत नव्या कार्यकारिणीचे स्वागत केले.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर रजतकुमार खाडे यांनी सर्वांचे आभार मानत, “पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांसाठी आम्ही नेहमीच पुढे असू. समाजहित आणि पत्रकारहित जपण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे,” असा विश्वास व्यक्त केला. उपाध्यक्ष सदानंद जाधव व सचिव श्रीकांत राऊत यांनीही पत्रकार संघटनेला नवे बळ मिळाल्याचे सांगत आगामी काळात एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी महागांव तालुका मराठी पत्रकार संघटनेचे मार्गदर्शक निलेश नरवाडे, मंचकराव गोरे, सदस्य शिवानंद राठोड, सचिन उबाळे, सय्यद मुस्सद्दीर, संदीप कदम, सचिन ठाकरे, कशिश धुळधुळे, ताहा मिर्झा उपस्थित होते.

### पत्रकार संघटनेच्या बळकटीचा नवीन अध्याय !

महागांव तालुका परिसरात घडणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि लोकहिताच्या प्रश्नांवर सत्य, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता करण्यास संघटना कटिबद्ध असल्याचे सर्व पदाधिकाऱ्यांनी संयुक्तपणे सांगितले.

नव्या कार्यकारिणीमुळे तालुक्यातील पत्रकारांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विविध सामाजिक व पत्रकार संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अमोलकचंद महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांचा गौरव

# अनिल गोठे यांना ५१ हजार रुपयांचा सन्मान

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या अमोलकचंद महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी अनिल सदाशिवराव गोठे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विद्या प्रसारक मंडळ, यवतमाळ व महाविद्यालय व्यवस्थापन मंडळाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या हस्ते रोख ५१ हजार रुपये देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

अनिल गोठे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात महाविद्यालयाच्या विविध विभागांमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. क्रीडा विभागाची उभारणी व देखभाल, महाविद्यालयीन इमारतींची दुरुस्ती, ग्रंथालयाच्या भौतिक सुविधांचा विकास, उद्यानाची निगा तसेच संशोधन प्रयोगशाळेतील आवश्यक सुविधा



उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी तळमळीने काम केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत प्राचार्य, प्राध्यापकांसोबतच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यांच्या निष्ठावान सेवेवरच शैक्षणिक संस्थांची कार्यक्षमता अवलंबून असते.

अनिल गोठे यांनी आपल्या कार्यातून ही बाब प्रत्यक्षात सिद्ध केली असल्याचे प्रतिपादन डॉ. विजय दर्डा यांनी यावेळी केले. अशा कर्मचाऱ्यांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून संस्थेच्या मूल्यसंस्कृतीचे प्रतीक असल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला विद्या प्रसारक मंडळाचे सचिव चार्टर्ड अकाउंटंट प्रकाश चोपडा, उपाध्यक्ष प्रवीण जानी, डॉ. ललितकुमार निमोदिया, प्राचार्य डॉ. आर. बी. भांडवलकर, प्राचार्य डॉ. विजेश मुणोत यांच्यासह मंडळाचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना अनिल गोठे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जबाबदारीने व समर्पित भावनेने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

## रोजगाराच्या आमिषाने हजारो महिलांची कोट्यवधींची फसवणूक

# ‘माझा उद्योग फाउंडेशन’च्या नावाखाली मोठा घोटाळा उघड


**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महिलांना रोजगार, पद व आकर्षक पगार देण्याचे आमिष दाखवून विदर्भातील हजारो महिलांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार यवतमाळमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी कुसुम काशीनाथ देवतळे (वय 63, रा. राधानगरी, वडगाव आर्णी रोड, यवतमाळ) यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून पवन साहेबराव वानखडे (वय अंदाजे 45, रा. नागपूर, पूर्ण पत्ता अज्ञात) याच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम 420, 34 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, आरोपी पवन वानखडे हा ‘माझा उद्योग फाउंडेशन’ या संस्थेचा संचालक असल्याचे भासवून महिलांना उद्योग उभारणी, नोकरी, विविध पदे व 20 ते 50 हजार रुपयांपर्यंत पगार देण्याचे खोटे आश्वासन देत होता. UGL, TCCC, DC, ZM, RM अशी बनावट पदे देऊन महिलांचे मोठे नेटवर्क तयार करण्यात आले. प्रत्येक महिलेकडून प्रत्येकी 1,000 रुपये याप्रमाणे बेकायदेशीर वसुली करण्यात आली. या फसवणुकीत यवतमाळ जिल्ह्यातील सुमारे 4,000 महिला, वणी येथील 5,000 महिला तसेच उमरखेड येथील अंदाजे 1,500 महिलांचा समावेश असल्याचा आरोप आहे. काही महिलांनी रोख रक्कम दिली तर काहींनी ऑनलाईन व्यवहारातून पैसे जमा केले. मात्र, एकाही महिलेला आजपर्यंत पगार किंवा मानधनाचा एक रुपयाही मिळालेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपीने अनेक महिलांकडून कागदपत्रे घेऊन त्यांच्या नावावर कर्ज उचलले असून, त्या कर्जाची रक्कम स्वतःच्या खात्यात जमा केल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार गेल्या 5 ते 6 वर्षांपासून, म्हणजे 1 जानेवारी 2021 ते 28 जून 2024 या कालावधीत सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करावी व फसवणूक झालेल्या सर्व महिलांना त्यांच्याकडून घेतलेली रक्कम परत मिळवून द्यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. या गुन्ह्याचा तपास अवधुतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक उल्हास पराडे करीत असून, पुढील तपासात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

# राळेगाव शहरात मोकाट जनावरांची दहशत ; कोंडवाडा बंद असल्याने नागरिक त्रस्त

## नगरपंचायत राळेगावच्या निष्क्रियतेवर जनतेचा संताप



**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव : राळेगाव नगरपंचायत ही नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेच्या प्रकाशझोतात राहिली आहे. कधी मर्जीतील ठेकेदारांना ठेके देण्यावरून, तर कधी नगरसेविकांच्या पतींच्या हस्तक्षेपामुळे नगरपंचायतवर टीका होताना दिसते. मात्र, सध्या शहरातील सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांना भेडसावणारी मोकाट जनावरांची गंभीर समस्या नगरपंचायत प्रशासनाकडून दुर्लक्षित राहिल्याचे चित्र आहे.

शहरातील कोंडवाडा बंद असल्यामुळे राळेगाव शहरात मोकाट जनावरांचे कळप दिवसरात्र मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. ही जनावरे थेट शेतकऱ्यांच्या शेतात घुसून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करत आहेत. तसेच पोट भरल्यानंतर हीच जनावरे शहरातील मुख्य रस्त्यांवर बसून राहतात. यामुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून अनेकदा अपघात घडत आहेत. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, नगरपंचायत कोंडवाडा सुरू करून मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त का करत नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात टाकल्यास संबंधित मालकांवर आर्थिक दंड होईल व भविष्यात ते आपल्या जनावरांची जबाबदारी घेतील, अशी नागरिकांची ठाम भूमिका आहे. नगरपंचायत प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा जनतेचा रोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### कोंडवाडा लवकरच सुरू करणार : मुख्य अधिकारी

या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने नगरपंचायत राळेगाव कार्यालयाशी संपर्क साधला असता, “जुन्या कोंडवाड्याला गेट नसल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. येत्या दोन-चार दिवसांत गेटचे काम पूर्ण करून कोंडवाडा नव्याने सुरू करण्यात येईल. तसेच मोकाट जनावरांवर कठोर कारवाई केली जाईल,” अशी ग्वाही मुख्य अधिकारी, नगरपंचायत राळेगाव यांनी दिली.

# अवैध वीटभट्ट्यांवर कारवाईची मागणी


वडकी : राळेगाव तालुक्यातील वाढोणा तसेच वडकी परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वीटभट्ट्या सुरू असून, त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी नरेश मोरेश्वर मुन यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. वडकी परिसरात वाढोणा, दहेगाव, देवधरी या ठिकाणी मातीच्या लाल मातीच्या वीटभट्ट्या अवैधरित्या सुरू असून, या वीटभट्ट्या सुरू असलेली जागा अद्याप अकृषक केलेल्या नाहीत. त्यामुळे शासनाचा कर बुडत आहे. तसेच भट्टीचालक हे मातीचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करतात. परिणामी शासनाला लाखो रुपयांचा चुना लागत आहे. पर्यावरण विभागाची परवानगी नसतानाही सुरू असलेल्या भट्ट्यांवर कारवाई करावी, असे निवेदनात नमूद आहे.

# तालुक्यातील डेहनी भागात मोठा पोलीस बंदोबस्त पाहून नागरिकात विविध चर्चेला उधाण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - तालुक्यातील डेहनी भागात विदर्भ पाटबंधारे विभागाने संपादित केलेली जमीन शासनाला परत द्यावी याकरिता प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तात जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन पेरू नये अशा सूचना देण्यात आल्या.

प्राप्त माहितीनुसार ही अंदाजे साडेतीनशे एकर जमीन वन विभागाच्या स्वाधीन केली जाणार असल्याची माहिती मिळाली. चंद्रपूर जिल्ह्यातील आसोला, मेंढा प्रकल्पा करिता वन विभागाची जमीन घेतली त्या जमिनीच्या मोबदल्यात बेंबळा प्रकल्पात संपादित केलेली जमीन वन विभागाला देण्यात येणार असल्याची माहिती मिळाली यासाठी मंगळवार ला दुपारी यवतमाळ वरून आलेला मोठा पोलीस बंदोबस्त डेहनी गावात दाखल झाला व शेतकऱ्यांना बोलावून आपण ही जमीन पेरू नये असे प्रकल्पाच्या



अधिकाऱ्यांकडून सांगितले गेले सदर जमिनीवर वन विभाग वृक्ष लागवड करणार असल्याची माहिती मिळाली याशिवाय या जमिनीवर सोलर प्लांट बसविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले या जमिनीचा शेतकऱ्यांना विदर्भ पाटबंधारे विभागाकडून आधीच मोबदला मिळाला असून तेव्हापासून शेतकरी ही जमीन कसत आहे आता मात्र शासनाने या जमिनी परत घेण्याचे ठरविले आहे डेहनि सारख्या लहानशा गावात एवढ्या मोठ्या संख्येने असलेला पोलीस ताफा पाहून गावकरी विविध चर्चा करताना आढळून आले.

# शहरातील ओला व सुका कचरा नियोजनाबाबत बैठक

**अमरावती/का.प्र.**
शहरामध्ये हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालय, लॉन्स, केटरिंग व्यवसाय इत्यादी तसेच हॉस्पिटल, नर्सिंग होम, मॅटरनिटी होम व ओपीडी दवाखान्यांमधून मोठ्या प्रमाणात बायोमेडिकल वेस्ट व इतर ओला व सुका कचरा निर्माण होत असून त्याची विल्हेवाट बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट नियमानुसार व घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार तसेच स्वच्छ भारत अभियान (SBM) २.० नियमानुसार विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.परंतु सदर कचऱ्याची विल्हेवाट नियमानुसार न लावता इतरत्र टाकण्यात येत असल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. यामुळे सार्वजनिक स्वच्छता व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे.या पार्श्वभूमीवर नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन नियम तसेच स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत शहरातील सर्व आस्थापनांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, याबाबत महानगरपालिका अमरावती मध्ये हॉटेल वेस्ट मॅनेजमेंट व बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीमध्ये शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालय, लॉन्स, बीअर बार, केटरिंग व्यवसाय, होस्टेल, कॅन्टीन, हॉकर्स व हातगाडी व्यवसायिक जे खाद्य पदार्थ विकतात यांच्यामार्फत निर्माण होणाऱ्या हॉटेल वेस्टबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या सर्व बल्क वेस्ट जनरेटर / आस्थापनांनी त्यांच्या आस्थापनांमधून निघणारा कचरा ओला व सुका कचरा वेगवेगळा करून वर्गीकृत स्वरूपात ठेवणे बंधनकारक राहील. हॉटेल वेस्ट/किचन वेस्ट या करिता वेगळे कंटेनर तर पत्रावळी, प्लास्टिक ग्लास, डिस्पोजेबल साहित्य इत्यादी सुका कचरा वेगळ्या कंटेनरमध्ये साठविणे आवश्यक आहे.

मंगल कार्यालये व लॉन्समध्ये कार्यक्रमानंतर उरलेले चांगले अन्न इतरत्र न फेकता,सेवाभावी अन्न वितरण संस्थांमार्फत गरजू नागरिकांना वितरित करण्याचे निर्देश देण्यात आले. यासाठी पुढे येणाऱ्या सेवाभावी अन्न वितरण स्थांची नोंद मनपामध्ये घेण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार त्या संस्थांना मनपातर्फे कोल्ड चेन (फ्रीज) उपलब्ध करून देण्यात येणार आहे.कचरा इतरत्र टाकल्यास संबंधित आस्थापनांवर नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, अस निर्देश दिले.

बैठकीमध्ये शहरातील हॉस्पिटल्स, नर्सिंग होम्स, मॅटरनिटी होम्स, पॅथॉलॉजी लॅब्स व खाजगी ओपीडी दवाखान्यांमधून निर्माण होणाऱ्या बायोमेडिकल वेस्टबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.सर्व हॉस्पिटल्स, नर्सिंग होम्स, मॅटरनिटी होम्स, पॅथॉलॉजी लॅब्स व ओपीडी दवाखान्यांनी मनपामध्ये नोंदणी करणे अनिवार्य असून, आस्थापनांमधून निघणारा बायोमेडिकल वेस्ट केवळ मनपा नियुक्त 'मे. ग्लोबल इकोसिओ सिस्टीम' या अधिकृत एजन्सीकडेच देणे बंधनकारक राहील. बैठकीस आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे,वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, आयएमए अध्यक्ष, हॉटेल व रेस्टॉरंट प्रतिनिधी, अध्यक्ष, अमरावती रेस्टॉरंट अँड लॉजिंग असोसिएशन, सचिव,हॉटेल सुपरवायझर, विजय बुरे, राजेश राठोड,कुंदन हडले, राजीव डिके, श्रीकांत डवरे, प्रसाद कुलकर्णी,बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन प्रतिनिधी मे. ग्लोबल इकोसिओ सिस्टीम व्यवस्थापक उपस्थित होते.

## संत्रा उत्पादक नुकसान भरपाईपासून वंचित

**कुऱ्हा/वार्ताहर**
यावर्षी झालेल्या अतिवृष्टी, पावसामुळे झालेल्या वऱ्हा मौजा व परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई वंचित आहे. तेव्हा संबंधीत विभागाने या परिसरातील शेतकऱ्यांना त्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा करावी अशी वंचित असलेल्या शेतकऱ्यांची एकमुखी मागणी आहे.

सततच्या अतिपावसामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी बराच खर्च करून यावर्षी फार मोठ्या प्रमाणात फळ गळ झाल्यामुळे यावर्षी शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून शासनाने नुकसान भरपाई देण्याचे जाहीर केले असता या वऱ्हा मौजा व परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची पाहणी केली असता अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्या मध्ये रक्कम जमा झाली नाही.तेव्हा संबंधीत विभागाने नुकसाना पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करावी अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

## असंघटीत कामगारांच्या विकासासाठी योजना राबवाव्यात-जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**
कामगार विभागातर्फे असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी कार्य करण्यात येत आहे. येत्या काळात कामगार आणि त्यांच्या कुटुंबांसाठी विकासाच्या योजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात असंघटीत कामगार, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, बाल कामगार कृतीदल समिती व बालकामगार सल्लागार समन्वय समिती, वेठिबगार दक्षता समिती, माथाडी व असंघटीत



कामगार यांच्याबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, सहायक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे, सरकारी कामगार अधिकारी श्रीकांत झंवर, कुलदिन भोलाने आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, असंघटीत क्षेत्रात काम करणारा वर्ग हा कमी उत्पन्न असलेला घटक आहे. त्यामुळे त्याला सामाजिक सुरक्षा जास्त प्रमाणात देण्यात यावी. त्यांच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने घरासंदर्भात योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. कामगारांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांमध्ये प्रामुख्याने निवृत्तीनंतर किंवा काम सोडल्यानंतर लाभ द्यावयाचे आहेत. मात्र कामगारांचे कौशल्य विकसित करण्यावरही भर देण्यात यावा. बाल व किशोरवयीन कामगार हे प्रामुख्याने विटभट्टीवर आढळून येतात. आतापर्यंत यात २८ जणांबाबत कारवाई करण्यात आली आहे. मेळघाटातील कामगार हे प्रामुख्याने अकोला जिल्ह्यात स्थलांतरीत होतात. त्यामुळे अमरावती आणि अकोला जिल्ह्यांनी संयुक्तपणे कारवाई करावी. कारवाईपश्चात गुन्हा दाखल झाल्यानंतरही या प्रकरणाचा कामगार विभागाने पाठपुरावा करावी. जिल्ह्यात छोटे टेक्सटाईल उद्योगामध्येही बालकामगार असण्याची शक्यता आहे. याठिकाणीही पडताळणी करण्यात यावी, असेही निर्देश येरेकर यांनी दिले.

## अमरावती विभाग शिक्षक प्रारुप मतदार यादीची लिंक जाहीर

**अमरावती/का.प्र.**
निवडणूक आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता आधारित अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. मतदार नोंदणी कार्यक्रमाच्या अनुषंगाने शिक्षक मतदारसंघाच्या प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी ३ डिसेंबर २०२५ रोजी केलेली आहे. विभागीय आयुक्त कार्यालय तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी, विभागातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात आली आहे.

आयोगाने पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांसाठी मतदारांना त्यांचे नाव शोधण्याकरीता https://ceoelection.maharashtra.gov.in/ConstituencyRolls/TandGElectoralRollsSimple.aspx या लिंकचा वापर करण्याबाबत सांगितले आहे. याची सर्व संबंधित मतदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन अपर आयुक्त (सा.प्र.) संजय जाधव यांनी पत्राद्वारे केले आहे.

## महापालिकेत एकाचवेळी ११ अधिकाऱ्यांना पदोन्नतीची 'लॉटरी'

**अमरावती/का.प्र.**
महापालिकेत सोमवारी एकीकडे आचारसंहितेची लगबग सुरू असतानाच दुसरीकडे तब्बल ११ अधिकाऱ्यांची पदोन्नती करण्यात आली. अर्थात आचारसंहिता लागण्याच्या अगदी काही वेळापूर्वीच ही पदोन्नती करण्यात आल्याची माहिती आहे.

यामध्ये आठ साहाय्यक अभियंत्यांसह दोन साहाय्यक वैद्यकीय अधिकारी व एका लघुलेखकांचा समावेश आहे. साहाय्यक अभियंता दिनेश हंबर्डे, शैलेश बोरकर, नितीन भटकर, नितीन बोबडे, प्रमोद इंगोले, हेमंत महाजन, आशिष अवसरे व विवेक देशमुख पदोन्नती उपअभियंता यांनी (स्वायत्त) या पदावर करण्यात आली, तसेच साहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव व डॉ. विजय मोटघरे यांची पदोन्नती वैद्यकीय अधिकारी (गट अ) पदावर झाली आहे.

याशिवाय लघुलेखक (निम्नश्रेणी) संदीप वडुरकर यांची पदोन्नती लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदावर करण्यात आली असून, प्रशासक सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेत झालेल्या आमसभेत या पदोन्नतीला मंजुरी देण्यात आली.

## खेळामधून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण व सहकार्याची भावना-दिलीप बाबू इंगोले

### नांदगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**
विद्यार्थ्यांना खेळाविषयी क्रीडा शिक्षकांनी अथक प्रयत्न करावे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची वृत्ती क्रीडा विषयक जनजागृती खेळामुळे प्राप्त होते.विद्यार्थ्यांनी बौद्धिक व शरीर संपत्ती कमाविणे अत्यंत आवश्यक आहे व तरुण मोबाईल व्यस्त आहेत. खेळामुळे शारीरिक व मानसिक सुदृढता निर्माण करून राष्ट्र मजबूत करणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन दिलीप बाबू इंगोले यांनी केले.

डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे हारार्पण व दीप प्रज्वलन करून व संस्थेचा ध्वज फडकवून क्रीडा ज्योत प्रज्वलित केली.उद्घाटक मनोगत व्यक्त करताना म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य केशवराव गावंडे हे होते तर प्रमुख उपस्थिती प्रतापराव हाडोळे, अशोकराव देशमुख,नितीन चवाळे,संदीप इंगोले, मधुकर रोडे उपस्थित



होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रदीप ठाकरे यांनी केले. याप्रसंगी नितीन चव्हाळे,संदीप इंगोले यांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात माणूस बनण्याचा प्रयत्न करावा असा संदेश त्यांनी दिला. समारोपीय मनोगत व आभार मधुकर रोडे यांनी संचालन जगदीश गोवर्धन यांनी केले.याप्रसंगी एकूण १४ शाळा सहभागी झाल्या. विजय वटाणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त संस्थेच्या वतीने दिलीप इंगोले यांनी सत्कार केला.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता जयंती उत्सव प्रमुख मनीषा कदम सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात 'सुरक्षा, संस्कृति आणि शौर्य' यांचा जागर

**अमरावती/का.प्र.**
दिल्ली येथील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा केवळ उत्सव नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागृतीचा उदघोष करणार हा एक उत्सव आहे. अयोध्येत प्रभुश्रीरामाची पुनर्स्थापनेनंतर कालचक्र पालटल्याचे आणि भारतीय संस्कृतीचा पुन:श्च उदय होऊ लागल्याचे दिसू लागले आहे. देश आज सांस्कृतिक पालटाची स्थिती अनुभवत आहे. सनातन धर्म हा कुणाच्याही विरोधात नाही; मात्र सनातन प्रवाहाच्या आड येणाऱ्यांना सहन केले



जाणार नाही, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी केले. ते नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त बोलत होते.

अनेक राज्यांमध्ये सरकार केवळ हिंदूंची मंदिरेच का ताब्यात घेते ? सरकारला मशिदी, चर्चेस यांतील गैरव्यवस्थापन दिसत नाही का ? शासन मंदिर मुक्तीचा कायदा कधी आणणार?, तसेच आपण सर्वच हिंदूविरोधी कायदे संपवण्याची मागणी लावून धरली पाहिजे ! केवळ काशी विश्व नाथ आणि श्रीकृष्ण जन्मभूमीच नाही, तर देशातील अतिक्रमण केलेले प्रत्येक हिंदू मंदिर मुक्त होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार आपण केला पाहिजे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले.

या महोत्सवात अमरावती येथील पूज्य रामाश्रयी सुश्री रामप्रियाश्री (माई) जी यांचीही वंदनीय उपस्थिती लाभली.या महोत्सवाबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना पूज्य रामप्रियाश्रीजी म्हणाल्या,धर्मरक्षणासाठी भारत मंडपम येथे अनेक संकल्प घेण्यात आले जसे की,एखाद्या महापुरुषाला श्रद्धांजली देण्याचा सर्वात सुंदर मार्ग म्हणजे ज्यासाठी त्यांनी बलिदान दिले, त्या स्वप्नपूर्तीसाठी स्वतः कार्यरत होणे.प्रत्येक गावातील मंदिर हे त्या गावातील धर्मप्रशिक्षणाचे केंद्र बनले पाहिजे.

या महोत्सवात अमरावतीहून पू. माई यांच्यासह भ.प. ज्योती धनाडे उपस्थित होत्या. संगीता राठी (संचालिका, राठी'ज एज्युकेशन हब), आशीष मारुडकर (सचिव, पिंगळादेवी संस्थान), शंतनू अंबुलकर आदी अमरावतीतील धर्मनिष्ठ नागरिकांनीही प्रत्यक्ष उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घेतला.

## निधनवार्ता

### नाना बनसोड

**कुऱ्हा-**वऱ्हा येथील



प्रगतीशिल शेतकरी तथा जय अम्बे दुर्गा मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नाट्य कला संचाचे विनोदी कलावंत असे नानासाहेब नागोराव बनसोड यांचे वयाच्या ४६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,आई, दोन भाऊ असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व.नानासाहेब बनसोड त्यांच्या अंत्यविधी करिता सर्व स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

### शंकरराव घोटकर

**कुऱ्हा-**तिवसा तालुक्यातील वाऱ्हा येथील माजी उपसरपंच विनोद शंकरराव



घाटेकर यांचे वडील वयोवृद्ध जेष्ठ नागरिक शंकरराव जयरामजी घोटकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, स्नुषा, जावाई, नातू नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. शंकरराव घोटकर यांच्या अंत्यविधी करिता सर्व स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

## संक्षिप्त

### नंदू कुळकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**अमरावती-**भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील दीर्घकाळ सेवा करणारे शिक्षकेतर कर्मचारी कै.नंदू कुळकर्णी यांचे निधन झाले. कै. श्री.नंदू कुळकर्णी सेवाभाव, निष्ठा व प्रामाणिकपणा हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते. महाविद्यालयाच्या व संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील.याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेण्यात आली. दिवंगत आत्म्यास शांती लाभो व त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करण्यात आली. भारतीय विद्या मंदिर परिवारातर्फे व वैद्य परिवारातर्फे कै. नंदू कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### श्री अंबादेवी धर्मदाय आयुर्वेद रुग्णालयामध्ये शिबीर

**अमरावती-**श्री अंबादेवी संस्थान धर्मदाय आयुर्वेद रुग्णालय, किर्तन सभागृह परिसर, अंबागेटजवळ, अमरावती येथे २०, २१ व २२ डिसेंबर, २०२५ या तीन दिवसांचे वैद्यकीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे.शिबिरामध्ये वैद्य देवयानी तायडे ह्या मानदुखी, पाठदुखी, डोकेदुखी, गुडघेदुखी, आमवात-संधीवात, टाचेचे दुखणे इत्यादी आजारांवर मोफत अग्नीकर्म व विध्दकर्म क्रियेद्वारे उपचार करतील. शिबिराचे नोंदणी शुल्क रु.५०/- असून शिबिरामध्ये वरील सर्व आजारांवर अल्प दरामध्ये औषधे देखील उपलब्ध करुन देण्यात येतील.२० व २२ डिसेंबर रोजी शिर्बिराची वेळ सकाळी ०९ ते १२ व संध्याकाळी ०५ ते ०८ अशी असून रविवार दि.२१ डिसेंबर रोजी फक्त सकाळी ०९ ते दुपारी १.०० अशी राहील. तरी, गरजू रुग्णांनी या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन श्री अंबादेवी संस्थान धर्मदाय आयुर्वेद रुग्णालयातर्फे करण्यात येत आहे.

### पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये क्रीडा महोत्सव



**अमरावती-**जिल्हा क्रीडा अधिकारी मा. अनिल इंगळे, उपायुक्त अमरावती महानगरपालिका डॉ. नरेंद्र वानखडे , शाळेचे प्राचार्य श्री सचिन दुर्गे व उपप्राचार्या सोनल निस्ताने यांच्या उपस्थितीत मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व क्रीडा मशाल पेटवत उद्घाटन करण्यात आले.क्रीडा महोत्सवात विविध मैदानी खेळ विद्यार्थी खेळणार असून ज्यामध्ये रनिंग रेस, पोटॅटो रेस, लिंबू चमचा, सॅक रेस, बलून रेस, बास्केटबॉल, गोळा फेक, रस्सीखेच, लेझीम योगा असे विविध खेळांचे समावेश आहे. वर्ग नर्सरी ते दहावीचे चे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.संचालन वर्ग आठवीचे विद्यार्थी आयुशी जयस्वाल, अनिमेष मोहोड, भूमी श्रीरामे, आर्यन अंबाडकर तसेच क्रीडा स्पर्धेच्या क्षेत्राची संचालन प्रवीण मेंढे सर यांनी केले व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### सदस्यता मोहीम व संविधान जनजागृता

**अमरावती-** संविधान बांधिलकी महोत्सव २०२६ अंतर्गत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा येथे साप्ताहिक बैठक घेऊन संविधान जागर व सदस्यता नोंदणी मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमामार्फत नागरिकांमध्ये भारतीय संविधानातील मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकनिष्ठ समाजनिर्मितीबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी २० नागरिकांनी सदस्यता नोंदवून चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रफुल मंदा श्रीधर यांच्या उपस्थितीत बडनेरा शहर शाखेचे कार्याध्यक्ष दिलीप लाडे यांच्या निवासस्थानी पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रफुल मंदा श्रीधर यांनी भारतीय संविधानाचे सामाजिक महत्त्व, संविधानिक मूल्यांची जपणूक, वैज्ञानिक विचारांचा प्रसार तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यपद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. विवेक, समता, बंधुता व सामाजिक न्याय या संविधानिक मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी संघटित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले कार्यक्रमाला वैज्ञानिक शिक्षण प्रवाह विभागाचे कार्यवाह बाळासाहेब मेश्राम,किशोर तायडे यांच्यासह बडनेरा शाखेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये मा. बाळू मेश्राम, चेतन आगलावे, दामू काळखैर, गोपाल वानखडे, सुरेखा तायडे, कुंदाताई मेश्राम, सारिका राहुल, कल्पना कोटांगळे, चंद्रप्रकाश अडकणे, प्रकाश राहुल, सरिता लाडे, पुष्पा जाधव, कुमुद मेश्राम, अनुपमा गोंडाणे, रहेमत शहा, विजय डवरे, वर्षा पकडे, मोनाली सदावर्ते, मनाली पहुरकर, रजनी सवाई आदींसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.संचालन दिलीप लाडे यांनी आभार प्रदर्शन बाळासाहेब मेश्राम यांनी केले.

## बेलोरा येथे श्री संत मारुती महाराज पुण्यतिथी महोत्सव प्रारंभ

**बेलोरा/वार्ताहर**
श्री समर्थ मारुती महाराज कृपेने श्री संत मारुती महाराज पुण्यतिथी महोत्सवास मंगलमय वातावरणात सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाचे आयोजन सोमवार १५ ते २२ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे.

यामध्ये श्रीमद ज्ञानेश्वरी पारायण विजय महाराज सुश्राव्य वाणीतून तसेच हभप रमेश यांच्या ओजस्वी ज्ञानेश्वरी आयोजन केलेले डिसेंबर २५ रोजी



भागवत कथा व कथा प्रवक्ते हभप ठाकूर यांच्या भागवत कथा महाराज आवारे वाणीमधून पारायणाचे आहे. रविवार २१ श्री मारुती महाराजांच्या प्रतिमेचे व ग्रंथ पूजन, पालखीची मिरवणूक संपूर्ण गावामधून निघणार आहे, तसेच सोमवार २२ डिसेंबर रोजी शिवा महाराज बारबुद्धे यांच्या हस्ते काल्याचे कीर्तन, दुपारी एक वाजता दहीहंडी व त्यानंतर महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री मारुती महाराज संस्थान, बेलोरा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# महाविकास आघाडी मनपा निवडणूक

## एकत्रितपणे लढल्यास निवडणुकीत काट्याची लढाई

**अमरावती/का.प्र.**

काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत बाजी मारली, पण विधानसभेत पराभव पत्करावा लागला, राजकारणात कधी, कशी समीकरणे बदलतील आणि राजकीय चित्र कसे पालटेल, हे सांगता येत नाही. आता महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महापालिकेत पुन्हा भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोरात तयारी केली आहे. महायुतीतील चारही पक्ष एकत्र बसून जागावाटपाचे सूत्र ठरवतील, असा आशावाद बावनकुळे यांनी व्यक्त केला खरा, पण त्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके आणि युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्यातील वादाच्या अडथळ्याची शर्यत पार करावी लागणार आहे. महाविकास आघाडी एकत्रितपणे लढल्यास निवडणुकीत काट्याची लढाई होऊ शकते. महापालिकेची ही



निवडणूक जिल्ह्याची राजकीय दिशा ठरवण्यात निर्णायक ठरणार आहे.

महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपने ८७ जागांपैकी आणि बडनेरा या दोन्ही विधानसभा ४५ जागा जिंकून काँग्रेसकडून सत्ता खेचून घेतली होती. पण, अमरावती मतदारसंघांमध्ये महायुतीचे घटक खोडके आणि राणा यांच्यात सलोखा निर्माण होणार का, हा कळीचा प्रश्न आहे. हा होऊ नये, अशी इच्छा मनाशी बाळगणारे भाजपमध्ये अनेक आहेत. पण, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपुढे त्यांचे काहीच चालू शकणार नाही. आगामी काही दिवसांत महायुतीचे चित्र स्पष्ट होऊ शकेल. त्यामुळेच यावेळी स्वबळाचा सूर उमटला. अमरावतीत महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढण्याचे संकेत बावनकुळे यांनी दिले आहे. भाजपने मुस्लीमबहुल भागातील बारा ते तेरा जागा वगळता इतर सर्व ठिकाणी लक्ष केंद्रित केले आहे. भाजपकडे इच्छुकांची मोठी फौज आहे. तब्बल ६४१ जणांनी उमेदवारी मागितली आहे. उमेदवारी मिळणार नाही असे संकेत मिळताच इच्छुकांचे थवे कोणत्या पक्षाच्या फांदीवर जाऊन बसतील, याचा नेम नाही. त्यामुळे इतर पक्षांनी अत्यंत सावध पवित्रा घेतला आहे.

महायुतीत भाजप, शिवसेना शिंदे गटासोबतच राष्ट्रवादी अजित पवार गट आणि आमदार रवी राणांचा युवा स्वाभिमान पक्ष देखील निवडणुकीच्या आखाड्यात डाव आजमावण्यास तयार आहे.

पण, आमदार खोडके आणि आमदार राणा यांच्यातील वादावर तोडगा कसा निघणार, हा प्रश्न आहे.

राणा महायुतीत असतील, तर कुठल्याही परिस्थितीत आम्ही भाजपसोबत राहणार नाही, अशी घोषणा खोडकेंनी केली आहे.

# मनपा निवडणुकीत काँग्रेसची ‘एकला चलो रे’ची भूमिका

## बसपा, युवा स्वाभिमान व अपक्ष ठरणार निर्णायक

**अमरावती/का.प्र.**

तब्बल पावणे चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून सत्तेसाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. यावेळी ही निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याचे संकेत आहेत.

महापालिका निवडणूक भारतीय जनता पक्षासाठी महत्त्वाची आहे, तेवढीच ती राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)साठीही प्रतिष्ठेची ठरणार आहे. दुसरीकडे, काँग्रेसलाही सत्ता स्थापन करून पुन्हा बळ दाखवायचे आहे. त्यामुळे या निवडणुकीत भाजप आपली सत्ता कायम ठेवते की, आमदार खोडके दाम्पत्याची राजकीय जादू चालते. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सन २०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपने ४५ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवत महापालिकेवर सत्ता स्थापन केली होती. त्यावेळी शहरातील राजकीय समीकरणे पूर्णपणे वेगळी होती. तेव्हा शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित होत्या. काँग्रेस, शिवसेना, युवा स्वाभिमान यांच्यात चांगलीच चुरस पाहायला मिळाली होती.



२०१७ मध्ये भाजपला ४५, काँग्रेसला १५, शिवसेनेला ७, युवा स्वाभिमानला ३ जागा मिळाल्या होत्या, तर तेव्हाच्या एकत्रित असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला खातेही उघडता आले नव्हते. २०१७ मध्ये खोडके दाम्पत्य राष्ट्रवादी काँग्रेसबाहेर होते, तर डॉ. सुनील देशमुख भाजपसोबत होते. आमदार असल्याने त्यांच्या गटाचे काही नगरसेवक सभागृहात होते. मात्र, सध्याची राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे (अजित पवार गट) दोन आमदार आहेत.

अजित पवार उपमुख्यमंत्री असल्यामुळे सत्तेचा प्रभाव देखील या गटाच्या पाठीशी आहे. विशेष म्हणजे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाने भाजपसोबत युती न करता ही निवडणूक स्वतंत्र लढविण्याचा निर्णय घेतला आहे. तर दुसरीकडे मात्र आमदार रवी राणा यांनी सुद्धा भाजप सोबत युती करू मात्र खोडके सोबत नाही, अशी भूमिका घेतली. त्यामुळे भाजपासोबत युवा स्वाभिमान अशी युती होण्याची शक्यता आहे. सोबतच शिंदे गटानेसुद्धा भाजप सोबत युती करण्याकरिता चर्चा केली. त्यामुळे महायुती म्हणून हे तीन गट एकत्रित येऊ शकतात. दुसरीकडे, डॉ. सुनील देशमुख यांच्यासोबत त्यांच्याशी संबंधित नगरसेवकही काँग्रेसमध्ये परतले आहेत.

२०१७ मध्ये काँग्रेसचे १५ नगरसेवक होते. होऊ घातलेल्या निवडणुकीत ८७जागा पैकी काँग्रेस किती जागांवर विजय मिळवते, हे देखील पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

**शिवसेनेत फूट, रणनीती अजूनही अनिश्चित**

शिवसेनेच्या बाबतीत २०१७ मध्ये पक्ष एकसंघ असल्यामुळे सात जागांवर विजय मिळवता आला होता. मात्र यावेळी शिवसेना शिंदे गट आणि उद्धव ठाकरे (उबाठा) गट अशा दोन गटांत विभागली आहे.

शिंदे गट सत्तेत असून त्यांनी महायुती अंतर्गत चर्चा सुरू केली असली, तरी ते महायुतीत लढणार की स्वतंत्रपणे निवडणूक लढणार, याबाबत अजूनही स्पष्टता नाही. एकीकडे उबाठा गटाने ८७ प्रभागांमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याची तयारी सुरू केल्याचे संकेत मिळत आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडी सन्मानाने अस्तित्वात आली तर ही निवडणूक एकत्रितपणे लढवली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**बसपा, एमआयएम, युवा स्वाभिमान व अपक्षांकडे लक्ष**

महापालिकेत बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना रिपब्लिकन पक्ष, तसेच इतर लहान राजकीय पक्ष आणि उमेदवारही स्वतंत्रपणे मैदाना उतरण्याच्या तयारीत आहेत त्यामुळे यावेळी खरी लढत ही महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जरी असली तरी बसपा एमआयएम व स्वाभीमान यांचे किती नगरसेवक होतात, याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

### शेतकऱ्यांना वैयक्तिक शेततळे योजनेकरिता

# शासनाकडून १५ कोटींचा निधी मंजूर

**अमरावती/का.प्र.**

शेतकऱ्यांनी मागील चार वर्षापासून विविध कृषी अनुदानाच्या योजनांचा लाभ मिळण्यास विलंब लागत असल्याने अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी नुकत्याच झालेल्या राज्यविधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडून शासनाचे लक्ष वेधले. या लक्षवेधीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन राज्यातील दुष्काळीक्षेत्र तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतील वैयक्तिक



शेततळे योजना घटकाकरिता शासनाकडून १५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी म्हणून शासनाने वर्ष २०१९ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना राबविण्यास सुरुवात केली.

वर्ष २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पनेत योजनेकरिता ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून सूक्ष्म सिंचनाबरोबरच पुरक अनुदान घटकासाठी ४०० कोटी व वैयक्तिक घटकासाठी १०० कोटी अनुदान अशा कार्यक्रमास दिनांक २४ एप्रिल २०२५ च्या रोजी शासन निर्णय जारी करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. योजनेच्या लाभासाठी राज्यातील शेतकऱ्यांनी कृषी आयुक्तालयाच्या मार्फत अर्ज सुद्धा सादर केले. मात्र चार महिने होऊन सुद्धा अनुदान वितरित न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

यासंदर्भात आ.खोडके यांनी नुकत्याच झालेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडून शेतकऱ्यांना कृषी अनुदान योजनेचा निधी वितरित करण्यासंदर्भात मागणी केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सांगितले आहे कि, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता कृषी विभागांतर्गत विविध योजनांकरीता अर्थसंकल्पित तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या असून लवकरच निधी वितरणास सुरुवात होणार आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना अनुदान देय रक्कम महा- डीबीडी प्रणालीद्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार असल्याचे सुद्धा मंत्री महोदयांनी सांगितले होते.

# अमरावती महापालिका निवडणूक प्रभागनिहाय अंतिम मतदार संख्या

| प्रभाग | पुरुष | महिला | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | १६९०९ | १६३९२ | —- | ३३३०१ |
| २. | १३२७५ | १३४२५ | १ | २६७०१ |
| ३. | १७९३६ | १७०३९ | २ | ३४९७७ |
| ४. | १८८४१ | १८५६३ | ३ | ३७४०७ |
| ५. | १२७०४ | १२६२१ | ३ | २५३२८ |
| ६. | १४३१६ | १४१५८ | १ | २८४७५ |
| ७. | १३६१२ | १४२१८ | १ | २७८३२ |
| ८. | १२५९७ | १२९२८ | १ | २५४३६ |
| ९. | १०८१० | १०८४० | ५ | २१६५५ |
| १०. | १७५२८ | १७५७३ | ३ | ३५१०४ |
| ११. | १५९१२ | १६५९० | ३ | ३२५०५ |
| १२. | १४४४८ | १४८१५ | ३ | २९२६६ |
| १३. | १३७९७ | १३७१२ | १ | २७५१० |
| १४. | १६४७४ | १६६३८ | ३ | ३३११५ |
| १५. | १५८२७ | १५३५१ | — | ३११७८ |
| १६. | १७४८० | १७१३८ | १ | ३४६१९ |
| १७. | १७४३३ | १७१३५ | ३ | ३४५७१ |
| १८. | १४०५९ | १४५६४ | २ | २८६२५ |
| १९. | १६५४७ | १६०६९ | ३ | ३२६१९ |
| २०. | १७८३१ | १७५२४ | ६ | ३५३६१ |
| २१. | १६४६६ | १६३०३ | १८ | ३२७८७ |
| २२. | १४४६५ | १४३३९ | ४ | २८८०८ |
| एकुण | ३३९१७७ | ३३७९३५ | ६८ | ६७७१८० |

# उमेदवारांचे हार्टबिट वाढले; चर्चांना उधाण

**चांदूरबाजार/वार्ताहर**

स्थानिक नगर परिषदेसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. निवडणूक कार्यक्रम पत्रिकेनुसार, ३ डिसेंबरला निवडणुकीचा निकाल घोषित होणे अपेक्षित होते. परंतू न्यायालयाचे आदेशनुसार राज्य निवडणूक आयोगाने, मतदान झालेल्या नगर परिषदांचा निकाल २० दिवस पुढे ढकलला. परिणामी नगर परिषदेचा निवडणूक निकाल, २१ डिसेंबरला लागणार आहे. निकाल घोषित व्हायला आता, अवघे दोनच दिवस उरले आहेत. त्यामुळे स्थानिक नगर परिषदेच्या, अध्यक्ष व सदस्य पदांच्या उमेदवारांचे हार्टबिट वाढले आहे.

मतगननेनंतर निवडणुकीचा निकाल काय लागायचा तो लागेल. मात्र शहरातील नागरीकांनमध्ये,

कोण निवडून येणार च्या चर्चांना उधाण आले आहे. अशातच उमेदवारांचे उत्साही कार्यकर्ते, आपला उमेदवार कसा निवडून येतो. याचे गणित नागरिकांमध्ये मांडत आहे. शहरातील नागरिकांना मात्र कोणत्याच उमेदवारांच्या, कार्यकर्त्यांनी मांडलेल्या गणितात स्वारस्थ दिसून येत नाही. कारण सर्वच कार्यकर्त्यांनी सर्वच उमेदवारांच्या बाबतीत मांडलेली आकडेवारी, झालेल्या मतदानाच्याच नव्हे तर एकूण मतदानाच्या ही पलिकडे जात आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आकडेवारीवर नागरिक विश्वास ठेवायला तयार नाहीत.

स्थानिक नगर परिषदेच्या निकालाकडे, स्थानिक नागरिकांचेच नव्हें तर तालुक्याचे ही लक्ष लागले आहे.

यावेळची निवडणूक ही सदस्य पदापेक्षा, अध्यक्ष पदासाठी सर्वांसाठी महत्वाची आहे.

या निवडणुकीत दोन राष्ट्रीय पक्ष व एक स्थानिक राज्य पक्ष यांच्यात, अध्यक्षपदासाठी तुंबळ लढत झाल्याचा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. त्यामुळे कोण निवडून येणार.


याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम दिसून येतो. परिणामी नगर परिषदेच्या निवडणुक निकाला बाबत, नागरिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी दिली माहिती

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आले.

यावेळी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक बाबत पत्रकारांशी संवाद साधला.



अमरावती सार्वत्रिक निवडणूक करीता ७ निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प, महानगरपालिका, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.१,२,५, नविन तहसिल कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती संबंधीत प्रभागक्र.३,४,७, मध्य झोन क्र.२ राजापेठ, महानगरपालिका, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.११,१२, १८, पुर्व झोन क्र.३ दस्तुरनगर, महानगरपालिका, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.८,९,१०, महानगरपालिका शिक्षण विभाग, अंबापेठ, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.६,१३,१७, पश्चिम झोन क्र.५ जुने तहसिल कार्यालय, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.१४,१५,१६, दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, महानगर पालिका, अमरावती संबंधीत प्रभाग क्र.१९,२०, २१,२२ आहेत.

अंतिम मतदार यादीनूसार अमरावती महानगरपालिकेसाठी एकूण मतदार ६,७७,१८० असून त्यापैकी स्त्री-३,३७,९३५, पुरुष ३,३९,१७७ व इतर ६८ असे मतदार आहेत. तसेच मतदार यादीतील नांव शोधण्याकरीता Search Engine मा. राज्य निवडणूक आयोगाने mahasecv oterli st.in या संकेतस्थळावर (website) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या संकेतस्थळवर भेट देऊन मतदार आपले नांव कोणत्या प्रभागात समाविष्ट आहे याची माहिती घेऊ शकतात. तसेच मा. राज्य निवडणूक आयोगानी दिलेल्या निर्देशानुसार निवडणूक दि. १५जानेवारी २०२६ ला असून निवडणूकीची मतमोजणी दि. १६जानेवारी२०२६ रोजी स्पोर्ट कॉम्प्लेक्स, नवसारी अमरावती येथे होणार आहे.

या पत्रकार परिषदेत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, सर्व पत्रकार बंधु उपस्थित होते.

# पतंग उडवताना वीज यंत्रणेपासून राहा सावध!

**अमरावती/का.प्र.**

पतंग उडविण्याचा आनंद घ्या, परंतू पतंग उडवितांना आणि कटलेल्या पतंगाचा पाठलाग करतांना उच्च व लघु दाबाच्या वीजवाहिन्या, फिडर व वीज यंत्रणा पासून सावधगिरी बाळगावी व विद्युत सुरक्षिततेचे नियम पाळावे, असे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

शहरी तसेच ग्रामीण भागात वीज वितरणच्या लघु व उच्च दाबाच्या वाहिन्यांचे जाळे पसरलेले आहे. अनेकदा पतंग उडवितांना किंवा कटलेले पतंग विजेच्या तारांवर किंवा खांबावर अडकल्याने ते काढण्यासाठी काठ्या, लोखंडी सळी किंवा गिरगोटचा वापर करण्यात येतो. अश्यावेळी जिवंत विद्युत तारेला स्पर्श होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच अनेकदा अडकलेल्या पतंगाचा मांजा खाली जमिनीवर लोंबकळत असतो. हा मांजा ओढून पतंग काढण्याच्या प्रयत्नात विजेचा भीषण अपघात होऊ शकतो. तसेच मांजा ओढताना एका तारेवर दुसऱ्या तारेचे घर्षण होवून शॉर्टसर्किटमुळे प्राणांतिक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही



महावितरणचे आवाहन

. त्यामुळे नागरिक व लहान मुलांनी वीज वाहिन्या, वीज यंत्रणा असलेल्या परिसराऐवजी सुरक्षित आणि मोकळ्या मैदानात पतंगोत्सव साजरा करावा.

पालकांनी याबाबत दक्ष राहून लहान मुलांना सुरक्षितपणे पतंग-उडविण्याबाबत मार्गदर्शन करावे.

वीज प्रवाह असलेल्या यंत्रणेपासून दूर राहूनच पतंगोत्सव साजरा करण्याबाबत आग्रही रहावे. पतंगामुळे अनेक दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत, शिवाय घाटंजी येथील घटना ताजी आहे. वीज प्रवाहात आल्याने तेरा वर्षीय मुलाला आपला एक हात कायमचा गमवावा लागला. त्यामुळे सावधगिरी हीच सुरक्षा आहे.

**धातूमिश्रीत मांजा धोकादायक-** बाजारामध्ये धातुमिश्रित मांजा मिळतो या मांजावर धातुमिश्रित रसायनाचे कोटिंग केलेले असल्यामुळे त्यातून वीज प्रवाह संचार करू शकतो. असा मांजा विद्युत तारेला अडकताच विद्युत यंत्रणेमध्ये विघाड होऊन संबंधित भागातील वीज पुरवठा खंडित होऊ शकतो. तसेच या मांजामुळे अपघाताची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही.

■ गुरुवार, १८ डिसेंबर २०२५
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# २५० कोटींचा निधी मातीतच जाणार काय ?

## महामार्गाच्या कामात काळी माती, पांढरी माती व गाळाचा वापर; नागरिकांचा संतप्त सवाल

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

*वणी–रंभापूर–अकोट–हिवरखेड या सुमारे २५० कोटी रुपयांच्या बजेटच्या महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असून, रस्त्याच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेल्या मुरूमऐवजी काळी माती, पांढरी माती व गाळाचा सर्रास वापर केला जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे '२५० कोटींचा निधी मातीतच जाणार काय?' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.*



वारखेड–हिवरखेड ते अडगाव या रस्त्यावरील कामाच्या ठिकाणी नागरिकांनी थेट संबंधित कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधींना पाचारण करत निकृष्ट कामाबाबत जाब विचारला. यावेळी वापरण्यात येत असलेली माती मुरूम नसल्याचे स्पष्ट दिसत असतानाही, कंपनी प्रतिनिधींनी 'ही माती नसून लॅब टेस्ट केलेला मुरूम आहे' असे हास्यास्पद उत्तर दिल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला.

महामार्गावर केवळ थातूर–मातूर स्वरूपाचा देखावा असून कोणत्याही ठोस सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. काम सुरू करण्यापूर्वी हजारो मोठ्या वृक्षांची कत्तल करण्यात आली; मात्र त्या बदल्यात नवीन वृक्षलागवड झाल्याचे कुठेही दिसत नाही. याबाबत विचारणा केली असता, 'आमच्या कंत्राटात वृक्षलागवडीचा उल्लेख नाही,' असे सांगत कंपनीने जबाबदारी झटकली.

या प्रकरणी आवाज उठवताना अडगावचे माजी जि.प. सदस्य गोपाल कोल्हे, खंडाळ्याचे माजी सरपंच सतीश देवळे, उपसरपंच मोहन अवचार, परिमल जाधव, विशाल तायडे, सुरेश आप्पा मोदे, तसेच हिवरखेड येथील व्यापारी आनंद बोहरा, अविनाश बोहरा, जितेंद्र माधानी, संजय टावरी, मकसूद अली, संदीप गांधी, पत्रकार धिरज बजाज, सूरज चौबे, शेख जमीर मिस्त्री यांच्यासह विविध गावांतील नागरिक व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनतेचा संयम सुटण्याच्या मार्गावर असून, कंत्राटदार, थर्ड पार्टी आणि एमएसआरडीसीचे अधिकारी पुढे काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, याप्रकरणी एमएसआरडीसीच्या अधिकारी सौ. वंजारी यांच्याशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करूनही त्यांनी फोन न उचलल्याने संपर्क होऊ शकला नाही.

**शिवसेना स्टाईलने समजावले जाईल :** मुरूमऐवजी माती टाकल्याचा प्रकार समोर आल्यानंतर बुधवारी शिवसेना (शिंदे गट) अकोला व अकोटच्या कार्यकर्त्यांनी हिवरखेड येथे घेराव घातला. कंत्राटदार व थर्ड पार्टीच्या प्रतिनिधींना जाब विचारत, माती काढून नियमानुसार मुरूम टाकूनच काम करा, अन्यथा काम होऊ देणार नाही, असा थेट इशारा देण्यात आला. यावेळी अकोला उपजिल्हाप्रमुख गोपाल म्हैसणे, फिरोज पठाण, पप्पू चौधरी, सागर कुटे, महेश बघेरे, गोटू अग्रवाल, तसेच अकोटचे मनीष राऊत, अमोल बोरकर, शुभम गावंडे, विक्की घनबहादूर आदी उपस्थित होते. कागदपत्रांसह अकोला येथील कार्यालयात येऊन स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा 'शिवसेना स्टाईलने' आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला.

'रस्त्याच्या कामात टाकलेली माती परत काढून उच्च दर्जाचा मुरूम वापरूनच काम करावे, अन्यथा नागरिकांसह मोठे आंदोलन उभारू.'
**गोपाल कोल्हे**
(माजी जि.प. सदस्य, अडगाव)

...............

'सध्या माती टाकण्याचे काम थांबवले असून, शनिवारी स्वतः साइटवर पाहणी करून निर्णय घेणार आहे. पोपटखेड येथील चांगल्या प्रतीचा मुरूम वापरण्याचा प्रयत्न करू.'
**मनोज पाटील**
(कंत्राटदार प्रतिनिधी, कलथीया इंजिनियरिंग अँड कन्स्ट्रक्शन)

'मुरूमऐवजी माती टाकल्याचे स्पष्ट असूनही काम सुरूच आहे. हे जनतेसोबत थेट फसवणूक आहे.'
**- सतीश देवळे**
(माजी सरपंच, खंडाळा)

...............

'तक्रारीनंतर मातीचे नमुने पुन्हा तपासणीसाठी पाठवले असून, नियमानुसार मुरूम वापरण्याच्या सूचना दिल्या आहेत.'
**विजय अडचूले**
(टेक्निकल ॲडव्हायझर, थर्ड पार्टी)

## प्रभाग १ ३ मधून केशव शाम हेडा यांना भाजप तिकीट मिळणार का?

### स्थानिक नागरिकांची मागणी; निष्ठावान कार्यकर्त्याच्या नावाची चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १३ मधून भाजपकडून कोणाला उमेदवारी दिली जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर केशव शाम हेडा या निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्त्याच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून, पक्षाने त्यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

केशव शाम हेडा हे २०१३ पासून भाजपचे बूथ प्रमुख म्हणून कार्यरत असून २०१५ पासून शक्ती केंद्र प्रमुख म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. पक्षाने दिलेल्या विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या आहेत. युवा मोर्चा अध्यक्ष, मंडळ सरचिटणीस (दोन वेळा) अशी महत्त्वाची पदे सांभाळत त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले आहे.



प्रभाग क्रमांक १३ मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी जनतेशी थेट संपर्क ठेवत काम केले आहे. विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या काळात बूथनिहाय नियोजन, मतदार संपर्क, प्रचार व संघटन यासाठी त्यांनी विशेष मेहनत घेतली. यामुळे प्रभागात पक्षाचा जनाधार वाढविण्यात त्यांचा मोलाचा वाटा असल्याचे स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.मागील दहा वर्षांपासून सिव्हिल लाईन चौकात श्रीरामनवमी जन्मोत्सवाचे भव्य आयोजन सातत्याने सुरू असून, या उपक्रमातून अनेक युवक मंडळाशी जोडले गेले आहेत. यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महाशिवरात्री यांसारखे सामाजिक व धार्मिक कार्यक्रम नियमितपणे साजरे केले जात आहेत. विशेषतः महाशिवरात्री उत्सवाच्या आयोजनातून समाजात एकतेचा व संस्कृतीचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

याशिवाय मतदान नोंदणी कॅम्प, युवकांसाठी विशेष संमेलने, रक्तदान शिबिरे तसेच विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आले आहेत. या सर्व कामांमुळे केशव हेडा हे सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेले, तरुण व हाडाचा कार्यकर्ता म्हणून ओळखले जात आहेत. तर यावेळी काम करणारा, अनुभवी आणि जनतेशी थेट जोडलेला चेहरा पक्षाने पुढे आणावा. स्थानिक स्वराज्य निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते, त्यामुळे इतकी वर्षे सत्य, निष्ठा आणि समर्पणाने काम करणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाने संधी द्यावी, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. भाजप नेतृत्व प्रभाग क्रमांक १३ मधून केशव शाम हेडा यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उमेदवारी देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाला विदर्भात नवी धार

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

पत्रकारितेच्या स्वातंत्र्य, मूल्ये आणि ग्रामीण–शहरी पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाला विदर्भात नवी बळकटी मिळाली आहे. तेल्हारा तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार राजेश पाटील खारोडे यांची महासंघाच्या विदर्भ विभागीय संघटक व संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख यांनी जाहीर केली.

राजेश पाटील खारोडे हे गेल्या अनेक वर्षांपासून निर्भीड, प्रामाणिक आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा आदर्श जपत कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांचे प्रश्न, शेतकरी, कामगार, उपेक्षित घटकांचे दुःख, प्रशासनातील त्रुटी तसेच सामाजिक अन्याय यांना त्यांनी आपल्या लेखणीद्वारे सातत्याने वाचा फोडली आहे. पत्रकारितेसोबतच सामाजिक कार्याची जोड देत त्यांनी विविध उपक्रमांतून लोकहिताची भूमिका ठामपणे मांडली आहे.

### राजेश पाटील खारोडे यांची विभागीय संघटक व संपर्कप्रमुखपदी निवड



त्यांच्या निवडीमुळे लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाच्या विदर्भातील संघटनात्मक बांधणीला नवी दिशा व वेग मिळणार असल्याची भावना पत्रकार व सामाजिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. विदर्भातील पत्रकारांचे प्रश्न, हक्क, सुरक्षितता, सन्मान आणि व्यावसायिक स्वातंत्र्य यांसाठी संघटितपणे आवाज बुलंद करण्याची जबाबदारी राजेश पाटील खारोडे समर्थपणे पार पाडतील, असा विश्वास महासंघाच्या नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

या नियुक्तीचे वृत्त समजताच विदर्भभरातून -विशेषत: अकोला जिल्हा व तेल्हारा तालुक्यातून पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि वाचकवर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी ही निवड प्रामाणिक पत्रकारितेच्या कार्याची दखल असल्याची भावना व्यक्त केली आहे.

अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे लोक स्वातंत्र पत्रकार महासंघाची चळवळ अधिक व्यापक, प्रभावी व संघर्षशील बनेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## आलेगावमध्ये बेरोजगारांसाठी कौशल्य प्रशिक्षण; निलेश कापकर यांचा सामाजिक उपक्रम



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या पुढाकारातून बेरोजगार युवक-युवती व शेतमजूर महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आला. 'कामं बोलतंय कामं' या उक्तीप्रमाणे कापकर यांचे सामाजिक कार्य प्रभावीपणे सुरू आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठ येथे विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देऊन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना सरकारी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

ग्रामीण भागातील बेरोजगारांनी रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करू नये, शहरात होणारी आर्थिक, मानसिक व शारीरिक पिळवणूक टाळावी, यासाठी स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या संकल्पनेतून ग्रामीण भागाची आर्थिक सक्षमता वाढेल, असा विश्वास कापकर यांनी व्यक्त केला. पुढील पाच वर्षांत किमान एक हजार बेरोजगारांना आलेगाव परिसरातच रोजगार देण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षणात धम्मपाल इंगळे, उमा तेलगोटे, वैशाली तेलगोटे, रमाबाई तेलगोटे, संघमित्रा भोजने व कविता तेलगोटे सहभागी झाले होते.

## धाडसत्रात जप्त मिळकतींबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून ७ फेब्रुवारी २०२४ रोजी अवैध सावकारीसंदर्भात धाडसत्र राबविण्यात आले. विनापरवाना सावकारी करणा-यांविरुद्ध कार्यवाही करताना ताबेगहाण मालमत्ता ताब्यात घेण्यात आली. या मिळकतींबाबत संबंधितांनी दावा दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या धाडसत्रामधील मनोहर अडितमल कृपलानी, दिनेश मनोहर कृपलानी (रा. पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला) व संतोष श्रीराम अहिर (पायल बंगल्यामागे, संदेशनगर, वाशिम बायपास, ता. जि. अकोला) याठिकाणी कुणा संबंधित व्यक्तींची मालमत्ता कर्जाचे तारण म्हणून त्यास ताबेगहाण ठेवण्यात आली. असल्यास संबंधित कर्जदार किंवा त्यांच्या वारसांनी लेखी दावा आवश्यक पुराव्यासह दाखल करावा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, 'सहकार संकूल' आदर्श कॉलनी, अकोला येथे दि. २९ डिसेंबर २०२५रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपावेतो कार्यालयीन दिवशी मालमत्तेची, कागदपत्रांची पाहणी करावी व दि. ३० डिसेंबर २०२५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत मालमत्तेबाबत दावे सादर करावेत.

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१५३/२०२५ प्रोसेस नं.१९७८३/२०२५
चौ.ता. १५/०१/२०२६ दिनांक : ०३/१२/२०२५

**अर्जदार :** १. प्रशांत पुरूषोत्तम राजूरकर रा. लक्ष्मी नगर, डॉ. लव्हाळे यांचे घराजवळ, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. पुजा अमित विंभाडे लग्नानंतरचे नाव पुजा पुरूषोत्तम राजुरकर लग्नापुर्वीचे नाव रा. म. नं. १०, वार्ड नं. ३४, जय स्तंभ, बुरहानपुर, मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. पुरूषोत्तम लक्ष्मण राजूरकर २. अनिता पुरूषोत्तम राजूरकर
**पत्ता :-** रा. डॉ. लव्हाळे यांचे घरासमोर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पुरूषोत्तम लक्ष्मण राजूरकर यांचे दि. ०२/०८/२०१८ रोजी शायकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे व तसेच मयत अनिता पुरूषोत्तम राजूरकर यांचे दि. २३/०७/२०२३ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०३ रेसह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२०२/२०२५ प्रोसेस नं.२००४१/२०२५
चौ.ता. २२/०१/२०२६ दिनांक : ०५/१२/२०२५

**अर्जदार :** १. अर्चना नंदकिशोर मांडवे २. नंदकिशोर गोवींद मांडवे ३. नंदिनी नंदकिशोर मांडवे सर्व रा. गजानन मंदिर जवळ, गिरी नगर, आरटीओ रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्ञानेश नंदकिशोर मांडवे
**पत्ता :-** रा. गजानन मंदिर जवळ, गिरी नगर, आरटीओ रोड, अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्ञानेश नंदकिशोर मांडवे यांचे दि. ११/०६/२०२५ रोजी राहत्या घरी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि. एम. पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

एम. दिवाणी किरकोळ अर्ज / ३०९ / २०२५
अनुसया रमेश मोरे वि. डिगांबर रामभाऊ कात्रे
पुढिल तारिख : २३-०१-२०२६

**अर्जदार :** १. अनुसया रमेश मोरे वय अं. ६२ वर्ष धंदा शेत मजुरी २. गोकर्णा लक्ष्मण मोरे वय अं. ४९ वर्ष धंदा शेत मजुरी दोघे रा.धनगरपुरा बोरगांव, बोरगांव मंजु, अकोला ता. जि. अकोला ३. मनकर्णा वासुदेव खाडे वय अं. ४९ वर्ष धंदा शेत मजुरी रा. द्वारा वासुदेव खाडे ता. बार्शीटाकळी रूस्तमबाद आळंदा अकोला ४. सविता कैलास गोटे वय अं.४७ वर्ष धंदा शेत मजुरी रा. वाकी, धोतर्डी, अकोला, अकोला ५. अर्जुन रामभाऊ कात्रे वय अं. ५३ वर्ष धंदा शेत मजुरी रा. व्याळा ता. बाळापुर, व्याळा, अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १ डिगांबर रामभाऊ कात्रे वय अं. ५९ वर्ष धंदा शेत मजुरी वसंता रामभाऊ कात्रे (मयत) २. सुमन वसंता कात्रे वय अं. ५६ वर्ष धंदा शेत मजुरी ३. दिनेश वसंता कात्रे वय अं. ३० वर्ष धंदा मजुरी ४. गणेश वसंता कात्रे वय अं. २७ वर्ष धंदा मजुरी सर्व रा. व्याळा ता. बाळापुर जि. अकोला.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत रामभाऊ सिताराम कात्रे हे दिनांक १८.०७.२०२५ रोजी व्याळा ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. मयत वसंता रामभाऊ कात्रे हे ०६ वर्षापुर्वी मरण पावेल. वरील नमुद अर्जदार क्रं.१ ते ५ व गैरअर्जदार क्रं.१ ते ४यांना मयत रामभाऊ सिताराम कात्रे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २३.०१.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.करीता आज दिनांक १२.१२.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्र. ३६४०/२०२५ दि. १६/१२/२०२५

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम सन १९५० यांचे कलम ~~१९/ २२/२२अ/ ३८~~ / Misc/50 (अ) सन २०२५ चा अर्ज क्र २०१/२०२५ कलम- Misc
**सार्वजनिक न्यास -** श्री.रामचंद्र संस्थान पळसो बढे खु. ता. जि. अकोला. A-1119
**अर्जदार -** श्री. सुभाष लक्ष्मणरावजी धोत्रे रा. पळसो, कासमपुर ता. जि. अकोला.
याने श्री. रामचंद्र संस्थान पळसो बढे खु. ता. जि. अकोला.
A-1119 अकोला यांच्या संबधात कलम १९/२२ – (अ) ३८ /५० अ (1) Misc/22 (3) अन्वये भरलेला नमुना
**श्री / सौ. १) श्री. महंत लालदास गुरू मथुरादास रा.गांधी चौक, अमरावती.**

ज्याअर्थी खाली सही करणार याजकडून वरील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थे संबंधात कलम १९/२२/२२अ ३८/५० (अ) (1), 41-B/Misc अन्वये नोंद दाखल करण्यासाठी चौकशी करण्यांत येणार आहे.

ज्याअर्थी तुम्हास ही नोटिस देण्यांत येत आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकिलामार्फत खाली सही करणार यांचेसमोर वर दिलेल्या पत्त्यावर तारीख २४ माहे १२ सन २०२५- रोजी सकाळी / दुपारि ११ वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रशनांची उत्तरे दयावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहु चौकशी होईल.तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यांत येईल अशी तुम्हास नोटिस देण्यात येत आहे. आज दिनांक १५ माहे १२ सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२६५/२०२५ प्रोसेस नं.२०५१८/२०२५
चौ.ता. २३/०१/२०२६ दिनांक : १५/१२/२०२५

**अर्जदार :** १. लताबाई मधुकर गढीकर रा. नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. सुनिता गिरीष पांडे रा. पिवळतकर लेआउट, मोठी उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला. ३. अलका प्रफुल वडाळकर रा. मु. तेलीपुरा बाभळी, दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती ४. अमोल मधुकर गढीकर रा. नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ५. पुरूषोत्तम मधुकरराव गढीकर रा. नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ६. पुष्पा उमेशराव कळसकर रा. बडनेरा रोड, हनुमान मंदिर जवळ, रविनगर, एचव्हीपीएम, अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर नामदेव गढीकर
**पत्ता :-** रा. नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर नामदेव गढीकर यांचे दि. ०४/०७/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३ / ०१ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२६९/२०२५ प्रोसेस नं.२०४५०/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ दिनांक : १२/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीराम मधुकर काळे रा. मु. पो. सांगळुद बु, ता. जि. अकोला. २. प्रेमलता नागोराव ठाकरे लग्नाआधीचे नाव - प्रेमलता मधुकर काळे रा. मु. पो. तोंडगांव, व्हीटीसी तोंडगांव, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण मधुकर काळे
**पत्ता :-** रा. मु. पो. सांगळुद बु, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण मधुकर काळे यांचे दि.२८/०४/२०२५ रोजी सांगळुद बु, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९ / ०१ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२७०/२०२५ प्रोसेस नं.२०४५१/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ दिनांक : १२/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीराम मधुकर काळे रा. मु. पो. सांगळुद बु, ता. जि. अकोला. २. प्रेमलता नागोराव ठाकरे लग्नाआधीचे नाव - प्रेमलता मधुकर काळे रा. मु. पो. तोंडगांव, व्हीटीसी तोंडगांव, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण मधुकर काळे
**पत्ता :-** रा. मु. पो. सांगळुद बु, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण मधुकर काळे यांचे दि. २८/०४/ २०२५ रोजी सांगळुद बु, ता. जि. अकोला येथे निधन झाले.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत लक्ष्मण मधुकर काळे यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बॅक बांच मोठी उमरी पल्हाडे लेआउट विठ्ठल नगर अकोला येथे अकाउंट नं. ६६२१३०९३८१३ या क्रमांकाचे खाते असून त्यात रु ७००००/- जमा आहेत. तसेच कॅनडा बॅक ब्रांच संतोषी माता मंदिर जवळ, दामले वाडी अकोला येथे अकाउंट नं. ५११०२२५००२३२२७ या क्रमांकाचे खाते असून त्यात रू २४०००/- जमा आहेत. सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९ / ०१ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१२ /२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## चायनीज-नायलॉन मांजावर पोलिसांचा कडक इशारा

# मुलाने वापर केला तर पालकांवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**वर्धा/जनमाध्यम**

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर जिवघेण्या चायनीज व नायलॉन मांजामुळे होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत वर्धा जिल्हा पोलिस प्रशासन पूर्णतः सतर्क झाले असून, कायद्याची धार अधिक तीव्र करण्यात आली आहे. चायनीज अथवा नायलॉन मांजामुळे एखाद्या निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाला किंवा तो गंभीर जखमी झाला आणि संबंधित मांजा अल्पवयीन मुलाने वापरल्याचे निष्पन्न झाले, तर त्या मुलासोबतच त्याच्या पालकांवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा थेट आणि कठोर इशारा पोलिसांनी दिला आहे. या भूमिकेमुळे पालक व विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.


नायलॉन व चायनीज मांजा हा केवळ बेकायदेशीर नसून तो थेट मानव, पशु आणि पक्ष्यांच्या जीवावर उठलेला धोका आहे. त्यामुळे अशा मांजाची विक्री, साठवणूक किंवा वापर करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी तपास मोहिमा सुरू असून संशयित ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजा जप्त करण्यात येत आहे.यावर्षीही मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आहे. मात्र, बंदी असतानाही काही विक्रेते आणि दलाल अवैध मार्गाने नायलॉन व चायनीज मांजाची विक्री करत असल्याचे चित्र समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आधीच आक्रमक भूमिका घेत कारवाई सुरू केली आहे. मकरसंक्रांतीला अजून वेळ असतानाच पोलिसांनी दाखवलेली ही तत्परता नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची मानली जात आहे.पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहर किंवा ग्रामीण भागात कुठेही चायनीज किंवा नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे, अथवा कोणी त्याचा वापर करत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित पोलीस



ठाण्याला माहिती द्यावी. नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसारच अनेक ठिकाणी कारवाई करून लाखो रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला आहे.नायलॉन मांजा अत्यंत तीक्ष्ण आणि न तुटणारा असल्याने तो दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच पक्षी व प्राणी यांच्यासाठी प्राणघातक ठरत आहे. मागील वर्षी नागपूर शहरातच नायलॉन मांजामुळे ४०० हून अधिक मानवी अपघात घडले, तर ७०० पेक्षा अधिक पशु-पक्ष्यांचे बळी गेले. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता ही संख्या आणखी भयावह असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. देशातील इतर राज्यांतही नायलॉन मांजामुळे गळा चिरून मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत.पतंगबाजी हा सणाचा आनंद असला, तरी निष्काळजीपणामुळे तो क्षणात शोकांतिकेत बदलू शकतो. विजेच्या तारांना पतंग अडकल्यास स्पार्क होऊन मोठा अपघात होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे नायलॉन मांजाला 'जिवघेणा मांजा' असे संबोधले जाते.या पार्श्वभूमीवर पालकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. आपल्या मुलांनी चायनीज किंवा नायलॉन मांजा वापरू नये, यासाठी पालकांनी काटेकोर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. मुलांना त्याचे दुष्परिणाम समजावून सांगून केवळ सूत किंवा कॉटनच्या धाग्यानेच पतंग उडवण्याची सवय लावावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.सरकार व पोलिस प्रशासन कारवाईसाठी सज्ज आहेच; मात्र नागरिकांनीही आपले सामाजिक कर्तव्य ओळखून जिवघेण्या मांजाचा बहिष्कार करणे गरजेचे आहे. पतंगोत्सवाचा आनंद घ्या, पण तो कुणाच्या जीवावर बेतू देऊ नका, हाच प्रशासनाचा ठाम संदेश आहे.

# अल्लीपूर परिसरात कपाशीवर बोंडअळीचा प्रादुर्भाव

## शेतकरी आर्थिक संकटात



**अल्लीपूर/जनमाध्यम**

परिसरातील शेतकऱ्यांनी यंदा मोठ्या आशेने आपल्या शेतात कपाशीची लागवड केली होती. मात्र यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे पीक पूर्णतः हातातून गेले. त्यामुळे किमान कपाशीच्या उत्पादनातून तरी दोन पैसे मिळतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. परंतु आता कपाशीवरही बोंडअळीचे गंभीर संकट ओढावल्याने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे.

सध्या अनेक शेतांमध्ये कपाशीचे बोंड निघण्यास सुरुवात झाली असतानाच बोंडअळीने अचानक हल्ला चढवला आहे. काही शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून कपाशीची बोंडे सडत आहेत. परिणामी कापूस उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी तर संपूर्ण पीक उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.आधीच अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच सोयाबीन आणि कपाशीला अपेक्षित दर मिळाले नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. कर्ज, उत्पादन खर्च आणि घरखर्च यांचा मेळ घालणे शेतकऱ्यांना कठीण होत आहे. पूर्ण पीक हाती येण्याआधीच बोंडअळीने घातलेला घाला शेतकऱ्यांसाठी मोठा धक्का ठरत आहे.या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

बोंडअळीमुळे झालेल्या नुकसानीसाठी योग्य नुकसानभरपाई जाहीर करावी, अन्यथा शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडे शासनाने संवेदनशीलतेने लक्ष देण्याची गरज असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### पेट्रोलपंप कर्मचाऱ्यास चौघांनी बेदम मारहाण

**वर्धा**-जाम येथील पेट्रोलपंपावर डिझेल भरल्यानंतर पैसे देण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पेट्रोलपंप कर्मचाऱ्यास बेदम मारहाण केल्याची घटना रविवारी (दि. १४) रात्री दहा वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत विजय पटेल (वय २३) हा कर्मचारी जखमी झाला आहे.प्राप्त माहितीनुसार, आरोपींनी वाहनात डिझेल भरल्यानंतर पैशाच्या कारणावरून वाद घातला. वादाचे रूपांतर शिवीगाळ व मारहाणीत झाले. चौघा आरोपींनी विजय पटेल याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत गंभीर दुखापत केली. घटनेनंतर जखमी कर्मचाऱ्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.या प्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार सूरज उर्फ गोलू साटोने (३१), मयूर करपे (२७), चेतन धोटे (१९) आणि अमन चव्हाण (२०), सर्व रा. जाम, यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### गस्तीवर असलेल्या पोलिसांकडून एकास अटक

**वर्धा** - तळेगाव (श्यामजी पंत) पोलिसांची चमू रात्रीच्या



गस्तीवर असताना उड्डाण पुलाखालील ऑटो स्टॅण्ड परिसरात संशयास्पद हालचाली करणारी व्यक्ती आढळून आली. अंधारात लपून बसलेली ही व्यक्ती पोलिसांच्या निदर्शनास आली.पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव प्रवीण उईके (वय ३२) असल्याचे सांगितले. समाधानकारक उत्तरे न देता संशयास्पद वर्तन केल्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.या प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे. परिसरात वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर पोलिसांनी गस्त वाढवली आहे.

### पानटपरीतून प्रतिबंधित तंबाखूची विक्री

**आष्टी**-पानटपरीतून प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची विक्री



केल्याप्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई आष्टी बसस्थानक परिसरात करण्यात आली.बसस्थानक परिसरात असलेल्या पानटपरीवर पोलिसांनी छापा टाकला असता तेथे प्रतिबंधित तंबाखूची विक्री सुरू असल्याचे आढळून आले. तपासादरम्यान जमील मोहम्मद खान पठाण याच्या पानटपरीसह रशीद खान मोहम्मद खान, शेरखा उसेन खान पठाण, इरफान खान बिसमिल्ला खान, अमोल वासुदेव घोटकर व गौरव बालसिंग मांडवे यांच्या पानटपरीचीही तपासणी करण्यात आली.या कारवाईत पानटपरीतून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचे निदर्शनास आले.या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू असून, परिसरातील इतर पानटपऱ्यांवरही अशाच प्रकारची धडक मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रतिबंधित तंबाखू विक्रीवर आळा घालण्यासाठी प्रशासन अधिक कठोर पावले उचलणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांच्या नशिबी दुष्काळात तेरावा महिना

# वन्य प्राण्यांचा उच्छाद; शासन-वनविभागाची डोळेझाक

## शेती उद्ध्वस्त, अपघातात जखमींनाही मदत बंद

**वडनेर/जनमाध्यम**

निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच होरपळणाऱ्या शेतकऱ्यांवर आता वन्य प्राण्यांचे भीषण संकट कोसळले असून शेती अक्षरशः उद्ध्वस्त होत चालली आहे. रोही, रानडुक्कर आणि वानर यांच्या हैदोसामुळे शेतकरी वैतागला असून दुष्काळात तेरावा महिना अशी अवस्था निर्माण झाली आहे. मात्र, या गंभीर प्रश्नाकडे शासन व वनविभाग सोयीस्करपणे कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांमुळे यंदा उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. अशा परिस्थितीत तुर, हरभरा, कपाशी, भाजीपाला तसेच वेलवर्गीय पिकांवर वन्य प्राण्यांनी अक्षरशः ताव मारला आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीचे मोलमाप क्षणात उद्ध्वस्त होत असून नुकसान भरपाईच्या नावाखाली शासनाकडून मिळणारी मदत केवळ तुटपुंजी ठरत आहे.वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी स्वतःच्या खिशातून हजारो रुपये खर्च करून तारेचे कुंपण, झटका मशीन, लोखंडी व लाकडी अँगल, जाळ्या तसेच साड्यांच्या सहाय्याने कुंपण उभारत आहेत. काही शेतकरी उंच मचान उभारून रात्रंदिवस जीव मुठीत धरून शेतात पहारा देत आहेत. तरीही वन्य प्राण्यांचा उपद्रव कमी होत नसल्याने शेतकरी अक्षरशः हतबल झाला आहे.याहून धक्कादायक बाब म्हणजे रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना वन्य प्राण्यांनी धडक दिल्यास पूर्वी वनविभागाकडून जखमींना आर्थिक मदत मिळत होती. मात्र,



ही मदत आता अचानक बंद करण्यात आली आहे. परिणामी अपघातात जखमी झालेले गोरगरीब, रोजंदारीवर काम करणारे मजूर उपचाराविना तडफडत आहेत. महिनोन्?महिने कामावर जाता न आल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत आहे. ही परिस्थिती निर्माण करणारा जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

### शासकीय मदत केवळ कागदावर

वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीच्या तुलनेत शासनाकडून दिली जाणारी मदत अत्यंत तोकडी असून किचकट नियमांमुळे अनेक शेतकरी या मदतीपासून वंचित राहत आहेत. नुकसान भरपाई वाढवणे, प्रक्रिया सुलभ करणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, हे शासनाचे कर्तव्य असताना केवळ आश्वासनांची पोकळी निर्माण करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे.गाडेगाव येथील शेतकरी व माजी सरपंच शालिकराव ताकसांडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शेताच्या भोवती कायमस्वरूपी तारेचे कुंपण केल्यास वन्य प्राण्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. शासनाने तारेचे कुंपण किंवा जाळी बसवण्यासाठी ९० टक्के अनुदान द्यावे. तसेच वन्य प्राण्यांच्या धडकेत जखमी झालेल्यांना पूर्वीप्रमाणे आर्थिक मदत तातडीने सुरू करावी, अशी त्यांनी ठाम मागणी केली.हिंगणघाट पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल गायकवाड यांनीही शासनाने वेळकाढूपणा थांबवून ठोस, कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा दिला आहे.वन्य प्राण्यांचा बंदोबस्त, शेतकऱ्यांना न्याय आणि अपघातग्रस्तांना मदत याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर शेतकऱ्यांचा संताप उफाळून येण्याची दाट शक्यता आहे.

# तरुणांनी सैन्यदलात सहभागी होऊन राष्ट्रसेवेला वहावे : बिपिन मोघे

## विजय दिनानिमित्त एन.एस.एस. व रोव्हर-रेंजर तर्फे पोस्टर स्पर्धेचे आयोजन

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

देशाच्या रक्षणासाठी सैनिकांचे बलिदान अतुलनीय आहे. तरुणांनी सैन्यदलात सहभागी होऊन राष्ट्रसेवेला वाहावे, असे आवाहन माजी सैनिक बिपिन मोघे यांनी विजय दिनाच्या पार्श्वभूमीवर स्व. रमाबाई वझुरकर नगर कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) आणि रोव्हर–रेंजर्स स्काऊटिंग पथक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य विलास येखंडे होते, तर एन.एस.एस. सहाय्यक विभागीय समन्वयक व रोव्हर लीडर प्रा. रवींद्र गुजरकर हे मुख्य मंचावर उपस्थित होते. प्राचार्य येखंडे यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले, 'विजय दिन हा १९७१ साली अदम्य धैर्याने लढणाऱ्या शूर वीरांच्या त्याग, शौर्य आणि पराक्रमाची



साक्ष देणारा दिवस आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रवींद्र गुजरकर यांनी केले. त्यांनी विजय दिनाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करत भारतीय सैन्याच्या शौर्य, त्याग, शिस्त व देशभक्तीवर प्रकाश टाकला. शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक बळ, काटेकोर शिस्त आणि देशप्रेम आत्मसात केल्यास सैन्यदलात उज्ज्वल करिअर घडवता येते, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाची सुरुवात 'शहीदोकी चीता ओ पर खडी हुई स्वतंत्रता' या देशभक्ती गीताने व भारतमातेच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या प्रसंगी '१९७१ ची वीरगाथा' या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत पूजा बुरुटे हिनी प्रथम क्रमांक, तेजस्विनी ढोबळे व सुजीत सोनटक्के यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. समृद्धी टेंबरे व समीक्षा कोराम यांनी प्रोत्साहन पुरस्कार प्राप्त केला.पोस्टर स्पर्धेचे परीक्षण प्रा. उत्तम देवतळे, डॉ. सतीश थेरे, शिक्षकेतर कर्मचारी शरयू लिचडे व श्रीमती रूपाली देवस्थळे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन वेदिका बावणे, मनोगत अंतरा परिमल, आदिती हेडाऊ, मयुरी हिवरकर, चांदनी लहरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौंदर्या दुर्गे हिनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैष्णवी साखरकर, धनश्री बावणे, अंजली चाफले, जानवी निकोडे, दुर्गेश कनोजे, मनीष बावणे यांनी अथक परिश्रम घेतले.या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षकवृंद, एन.एस.एस. स्वयंसेवक व रोव्हर–रेंजर्स विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत झाली असून सैन्यदलाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

## दुभाजकांवरील झाडे वाळली; शहर सौंदर्यीकरणाची वाट लागली

**वर्धा**-शहराच्या सौंदर्यीकरणासाठी नगरपालिकेकडून प्रमुख मार्गांवरील दुभाजकांवर फुलांची झाडे मोठ्या आशेने लावण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात टवटवीत फुले, हिरवळ आणि स्वच्छतेमुळे शहराला वेगळेच रूप प्राप्त झाले होते. मात्र, काही महिन्यांतच या उपक्रमाकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.आज घडीला बहुतांश दुभाजकांवरील फुलझाडे पूर्णतः वाळलेली असून काही ठिकाणी तर झाडांचे सांगाडेच उरले आहेत. नियमित पाणीपुरवठा, निगा आणि देखभाल नसल्याने शहराच्या सौंदर्यीकरणाचा हा प्रकल्प कागदोपत्रीच मर्यादित राहिल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. वाळलेल्या झाडांमुळे दुभाजकांवर कचरा साचत असून प्लास्टिक, पानटपरीतील कचरा व इतर घाण यामुळे परिसर विदारक दिसत आहे.पूर्वी शहरातून प्रवास करताना दुभाजकांवरील रंगीबेरंगी फुले पाहून नागरिकांना प्रसन्न वाटायचे. आज मात्र त्याच मार्गांवरून जाताना उदास चित्र दिसते. शहराचे सौंदर्य वाढवण्याचा उद्देश असताना दुर्लक्षामुळे शहराची प्रतिमा मलीन होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. नगरपालिकेने केवळ झाडे लावून थांबू नये, स्वच्छता याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अन्यथा शहर सौंदर्यीकरणाच्या नावाखाली खर्च केलेला निधी वाया गेल्याचा आरोप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## भरधाव दुचाकीची धडक

**वर्धा**-काम आटोपून दुचाकीने घरी परतत असताना भरधाव दुचाकीने जबर धडक दिल्याने एक जण जखमी झाल्याची घटना दयालनगर परिसरात घडली. अमर ईसराणी हे एमएच-३२/एयू-१२९६ क्रमांकाच्या दुचाकीने जात असताना एमएच-३२/बीए-६२९८ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात अमर ईसराणी हे जखमी झाले.

# सामाजिक जीवनात अध्यात्माची जोड मानवाला धैर्यवान बनवते-भागवताचार्य सुशीलाताई वाघ

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक जीवनात अध्यात्माची जोड मानवाला धैर्यवान व सहनशील बनवते. मनुष्याने नेहमी सद्गुणांचा अवलंब करून सकारात्मक विचारांची कास धरली पाहिजे, असे मौलिक मार्गदर्शन भागवताचार्य सुशीलाताई वाघ यांनी श्रीमद् भागवत कथा सप्ताहात केले.

स्थानिक रुक्मिणी नगर येथे स्व. कृष्णाजी कुहिटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताह एस. टी. कॉलनी, जाजोडिया ले-आऊट, सिंधी मेघे परिसरात पार पडला. या कथाकाळात मार्गदर्शन करताना वाघ म्हणाल्या की, आजची युवा पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत असून समाज सुशिक्षित झाला असला तरी सुसंस्कृत होण्याची नितांत गरज आहे. चांगले संस्कार रुजविणे, आई-वडिलांची सेवा करणे व नैतिक मूल्यांचे पालन करणे हे प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.मनुष्याने सत्पात्री दान करावे,



सद्कर्म करीत राहावे तसेच अध्यात्माच्या माध्यमातून जीवनात संयम, स्थैर्य व धैर्य निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले. सामाजिक जीवनात अध्यात्माची जोड मानवाला सहनशील बनवते, त्यामुळे नेहमी सकारात्मक विचार ठेवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विविध दाखले व दृष्टांतांच्या माध्यमातून त्यांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकून घेतली.या भागवत कथेसाठी सिंथेसायझर वादक व गायक शोभा गिरी, तबला वादक विजय गिरी, विणेकरी पुरुषोत्तम आगरे, गायक पुरुषोत्तम खामणकर तसेच टाळ वादक गजामेजी यांनी सुरेल साथ दिली. सप्ताहादरम्यान भजन, कीर्तन, रामधून, ग्रामस्वच्छता, हरिपाठ व नामसंकीर्तन असे विविध धार्मिक उपक्रम पार पडले.कार्यक्रमाच्या दरम्यान विविध मान्यवर कीर्तनकारांचे कीर्तन झाले. काल्याचे कीर्तन व दहीहंडी कार्यक्रमही भक्तिभावात पार पडला. कार्यक्रमाचा समारोप महाप्रसादाने झाला. या भागवत कथेला वर्धेकर भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती. आयोजनासाठी निखिल कुहिटे व त्यांच्या परिवाराने अथक परिश्रम घेतले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक २३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शा.वि.ज्ञा.वि.संस्थेत प्रथम व द्वितीय पदवी वितरण समारंभ

**अमरावती :** शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (स्वायत्त),अमरावती येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती,शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या ४० व्या दीक्षांत समारंभानुसार व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या ४१ व्या दीक्षांत समारंभा नुसार गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेच्या मुख्य सभागृहामध्ये दुपारी साडेबारा वाजता स्वायत्त संस्थेचा प्रथम पदवी वितरण समारंभ (२०२२-२३)(पदव्युत्तर) आणि द्वितीय पदवी वितरण समारंभ(२०२३-२४)(पदवी व पदव्युत्तर वर्ग) आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.अविनाश आवलगावकर, कुलगुरू,मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर जिल्हा-अमरावती व समारंभाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक डॉ.सतीश माळोदे यांची उपस्थिती लाभणार आहे.प्रथम पदवी वितरण समारंभ शैक्षणिक सत्र २०२२-२३मध्ये मानव्य विद्याशाखा,विज्ञान विद्याशाखा आणि गृहविज्ञान विद्याशाखा मधील १९ विभागांतर्गत एकूण ५७ गुणवत्ताधारकांचा प्रथम,द्वितीय व तृतीय गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

---

## अमरावती महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६
## निवडणूक कार्यक्रम

**जा.क्र./अमनपा/आयुक्त/नि.वि./४८८/२०२५, दि. १८/१२/२०२५**

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरू अथवा पूर्ण करण्याचा दिनाक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि. ०१ जुलै, २०२५ (मंगळवार) |
| १. | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३) दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २) (गुरुवार दि. २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देषनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| २. | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३) (गुरुवार दि. २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि. २८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देषनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ३. | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ४. | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५. | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ६. | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ७. | अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ८. | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| ९. | मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) (सकाळी १०.०० वाजल्यापासून) |
| १०. | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि. १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

**सौम्या शर्मा - चांडक (भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**महानगरपालिका, अमरावती**

---

## निवडणूकीकरीता स्थापन करण्यात आलेले झोन व निवडणुक निर्णय अधिकारी यांची माहिती.

| झोन क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी | कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्रीमती श्रध्दा बबन उदावंत, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) | उत्तर झोन क्र. १ रामपुरी कॅम्प, महानगरपालिका, अमरावती |
| २. | श्री. अनिल भटकर, उपविभागीय अधिकारी, अमरावती | **S.D.O.** कक्ष, नविन तहसिल कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती |
| ३. | श्रीमती दुर्गा देवरे, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) (अवप्र-२) | मध्य झोन क्र. २, राजापेठ, महानगरपालिका, अमरावती |
| ४. | श्री. प्रसन्नजीत चव्हाण, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) (अवप्र-४) | पुर्व झोन क्र. ३, दस्तुर नगर, महानगरपालिका, अमरावती |
| ५. | श्री. विवेकानंद काळकर, वन जमावबंदी अधिकारी, अमरावती | महानगरपालिका शिक्षण विभाग, अंबापेठ, अमरावती |
| ६. | श्री. संतोष काकडे, निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती | जुने तहसिल कार्यालय, शाम चौक, अमरावती |
| ७. | श्री. दादासाहेब सुखदेव दराडे, उपविभागीय अधिकारी (महसुल), अमरावती | दक्षिण झोन क्र. ४ बडनेरा, महानगरपालिका, अमरावती |
| आचार संहिता कक्ष | श्री. राम लंके, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, अमरावती | बाजार व परवाना कार्यालय, मध्य झोन क्र. २ राजापेठ, अमरावती |

**सौम्या शर्मा - चांडक (भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**महानगरपालिका, अमरावती**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि. श्री. आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २७७१/२०२५
श्रीमती शंकुतला अधिक नऊ विरुध्द निरंक
पुढील तारीख १२.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Shakuntala Nanaji Gadling ,** Age 78 yrs., Occu.- Household
2) **Pramod Nanaji Gadling ,** Age 49 yrs., Occu.- Agriculturist
3) **Ravindra Nanaji Gadling ,** Age 55 yrs., Occu.- Agriculturist
No. 1 to 3 R/o. Pimpri Yadgire, Tq. & Dist.Amravati
4) **Alka Vijay Sardar,** Age 51 yrs., Occu.- Household
R/o. Room No.61, Plot No. 40, New Collector Compound Near Saibaba Temple, Malvani Gate 7, Malad (West) Mumbai
5) **Maya Khandu Jadhav,** Age 47 yrs., Occu.- Household
R/o. H.No. 431/876, Lane No.12, Near Vishranti Chowk, Jaibhavani Nagar, Mukundwadi, Aurangabad, Tq. & Dist. Aurangabad
6) **Vandana Pravin Gadling,** Age 53 yrs., Occu.- Household
7) **Sagar Pravin Gadling,** Age 30 yrs., Occu.- Education
8) **Swapnil Pravin Gadling,** Age 28 yrs., Occu.- Education
No.6 to 8 Pimpri Yadgire, Tq. & Dist.Amravati
9) **Ashiwini Sanjay Mokhade,** Age 32 yrs., Occu.- Household
R/o. Anjangaon Bari, Tq. & Dist. Amravati
10) **Priyanka Vilasrao Gadling/ Priyanka Devanand Chatur ,** Age 31 yrs., Occu.- Household
R/o. Vijaypath, Juni Vasti, Badnera, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत नाना दगडू गडलिंग हे दि.०७.१२.२०२०** रोजी प्रिंपी यादगिरे ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शंकुतला अधिक नऊ विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा श्रीमती शंकुतला अधिक नऊ विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १५.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशान्वये, **सहायक अधीक्षक,** दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## जाहीर सार्वजनिक सूचना

सार्वजनिक जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेला मधुरशिश कॉलनी, मौजे शेगाव येथील मंजूर ले-आऊटमधील प्लॉट हा खरेदी–विक्री व्यवहाराने हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

ले-आऊट व प्लॉटचा तपशील : मधुरशिश कॉलनी, मौजे शेगाव, मंजूर ले-आऊटमधील सर्व्हे नं. ४३/३/A, प्लॉट नं. 2A, क्षेत्रफळ : २३०७ चौ.फुट (२१४.३७ चौ.मीटर) प्लॉटच्या सीमा : पूर्वेस : इतर ले-आऊट पश्चिमेस : ७.५० मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस : मोकळी जागा, दक्षिणेस : प्लॉट नं. २ँ

**प्लॉट विकणारे :** श्री. मधु चिरंजीवीलाल अग्रवाल, वय ६९ वर्षे
**प्लॉट घेणारे :** श्री. दत्ताकुमार अंबादासराव इंगोले

वरील नमूद ले-आऊटमधील प्लॉट बाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, वारसदार किंवा अन्य कोणालाही कोणतीही हरकत, दावा, हक्क, बोजा, तारण, चार्ज किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर लेखी स्वरूपात कळवावे.

निश्चित कालावधीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, संबंधित ले-आऊटमधील प्लॉटबाबत कोणाचाही दावा नाही, असे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**संपर्कासाठी :**
**मोबाईल क्रमांक : ९५०३६०९१०८**

---

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.३३१/२०२५ — ने.ता.२८.०१.२०२६

**अर्जदार** - १. सावित्रीबाई अशोकराव वानखडे
२. अशोक उकंडा वानखडे,
दोघेही रा.राजीव गांधी नगर, सावंगी मेघे, वर्धा, ता.जि.वर्धा

-- विरुध्द --

निरंक

ज्याअर्थी मयत **मंगेश अशोक वानखडे** यांचा मृत्यू दि.**०१.११.२०२५** रोजी ग्रामीण रुग्णालय, नांदगांव खंडेश्वर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही आई आहे आणि अर्जदार नं.२ हे वडील आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १७ डिसेंबर सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.३१६/२०२५ — ने.ता.०१.०१.२०२६

**माया -- विरुध्द**

१. श्रीमती माया प्रकाशराव ठाकरे

-- विरुध्द --

१. अश्विनी अक्षय ठाकरे
२. उन्नती अक्षय ठाकरे

ज्याअर्थी मयत **अक्षय प्रकाश ठाकरे** यांचा मृत्यू दि.**११.०५.२०२५** रोजी सालोड, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. तसेच **प्रकाश विठ्ठलराव ठाकरे** यांचा मृत्यू दिनांक **१९.०४.२०१९** रोजी सालोड येथे झाला. **अक्षय प्रकाश ठाकरे** यांची अर्जदार नं.१ ही आई आहे व गैरअर्जदार नं.१ पत्नी व गैरअर्जदार नं.२ ही मुलगी आहे.मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ डिसेंबर सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

---

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद स्थावर मालमत्ता (शेतजमीन) **देवदास लक्ष्मणराव नखाते,** रा.धनोडी, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांच्याकडून खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन :-**

**नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण व कचेरीचे कक्षेतील जि.प. अमरावतीचे हददीतील मौजे-धनोडी, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील शेत गट नं. ३१९, क्षेत्रफळ ० हे. ७४ आर, आकार रु.१.७५ पैसे, भोगवटदार वर्ग -१, सालीम झाडाझुडपासह व इतर तदंगभूत वस्तूंसह आहे.**

उपरोक्त नमूद शेतजमीनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसबंध, बोजा,गहाण, वारसाहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी, निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेन्डट अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांचे आंत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. मुदती नंतर माझे पक्षकार सदर्हू शेतजमीनीची खरेदी करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरीता सदर जाहीर नोटीस.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- १७/१२/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**ॲड.बी.एस.तिवारी**
**मोरबाग, अरुण होस्टल, अमरावती**
**मो.क्र.९४०५३५०८११**

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं. ४६५३ /२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१२/१२/२०२५

**वि.दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
किरकोळ अर्ज क्र.५०३/२०२५ — ने.ता.१७.०१.२०२६

अर्जदार -
१. **सुमती गणेशराव ठाकरे,** वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोळेगांव, पो.शिवर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. **रोशनी अभिजीत उर्फ अभिजीतराव ठाकरे,** वय ४० वर्षे, धंदा - नोकरी
३. **आर्या अभिजीत उर्फ अभिजीतराव ठाकरे,** वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण
४. **पार्णवी अभिजीत उर्फ अभिजीतराव ठाकरे,** वय १२ वर्षे, धंदा - शिक्षण
अ.क्र.३ व ४ चे अ.पा.क.आई अ.क्र.२ रोशनी ठाकरे
अ.क्र.२ ते ४ रा.जागृती कॉलनी, रेल्वे स्टेशन जवळ, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की,**अभिजीत गणेशराव ठाकरे** हे **दि.२८/१०/२०२५ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक (प्रशासन)** दिवाणी न्यायालय व.स्तर , दर्यापूर

---

**उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश अमरावती यांचे कार्यालय**
क्र.अपील/जाहीर नोटीस/अ.नि.नि.क्र.१५५३/२०२५ — दि.१७/१२/२०२५

## जाहीर नोटीस

**प्रति,**
**अपिलार्थी**
मे.जवंजाळ मिल्क ॲन्ड मिल्क प्राडक्ट अमरावती तर्फे संजय नारायण जवंजाळ
रा.५३ राठी नगर, अमरावती,ता.जि.अमरावती ८८८८६५५६८९

विरुध्द

**उत्तरार्थी**
१. श्रीमती बिंदाबाई रामचंद्र समरीत
२. श्रीमती कलावतीबाई देविदास कठाणे मयत तर्फे वारस दिलीप देविदास कठाणे व इतर
३. सचिन बाळकिसन बानपुरे
४. रमेश जवाहरमल चावला
५. लक्ष्मण शामराव गडलिंग
६. शामराव दिवटू गडलिंग
७. किशोर शामराव गडलिंग
१ ते ७ राहणार - शेवती जहा.ता.जि.अमरावती

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कलम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे-शेवती जहांगिर,ता.जि.अमरावती येथील गट नं.७० बाबत उत्तरवादी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वेळी वारंवार उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, **दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** या पिठासनासमोर आपण स्वतः अगर आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर राहावे. नाहीपेक्षा प्रकरणी एकतर्फी निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्कयानिशी दिले असे.

*(मा.उ.सं.भू.अ.अम.यांचे निर्देशानुसार)* — शिक्का

**सही/-**
**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख (सं)**
**उपसंचालक भूमि अभिलेख**
**अमरावती प्रदेश,अमरावती**

---

**जाहीर नोटीस**
**विद्यमान २९ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**
सक्सेशन क्र.७७/२०२५ — चौ.ता.२९.०१.२०२६

**अर्जदार :** 1. Sunil Ganpat Malokar,
Age 57 Yrs. Occu.: Labour
R/o Ram Nagar, Ward No.5, Rajura Bzr.Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Post Office Saving Bank through it's Manager,
Branch at Gokul Market, Amravati Branch
Tq. Dist. Amravati.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालायात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **गणपत महादेव मालोकर** यांचे निधन दिनांक **०९.११.२०२४** रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.११ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४.०२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक (प्रशासन)** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७७५/२०२५
**श्रीमती अनिता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१३.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Anita Rajesh Mathane, Age 42 Yrs. Occu.: Household
2. Sonali Rajesh Mathane, Age 19 Yrs. Occu.: Education
3. Sumit Rajesh Mathane, Age 21 Yrs. Occu.: Education
1 to 3 R/o Main Road, Rahatgaon Plot, Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **राजेश विश्वनाथ मथने** हे दिनांक 14.09.2025 रोजी **पर्वतापूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीमती अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज क्र.२८१५/२०२५
**श्रीमती सोनिया -वि- गैरअर्जदार प्रतिभा अधिक दोन**
पुढील ता.१५.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. सोनिया सुभाष भारसाकळे, वय ४२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.द्वारा-सुभाष भारसाकळे, रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. प्रतिभा सुभाषराव भारसाकळे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. सुदीप सुभाषराव भारसाकळे, वय २९ वर्षे, व्यवसाय - व्यापार
३. धनश्री सुभाषराव भारसाकळे, वय २७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
वरील सर्व गैरअर्जदार नं.१ ते ३ रा.रुक्मिणी नगर, अमरावती,

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाष देविदास भारसाकळे** यांचे दिनांक **०४.१०.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सोनिया विरुध्द गैरअर्जदार प्रतिभा अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोनिया विरुध्द गैरअर्जदार प्रतिभा अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८५४/२०२५
**पूजा -वि- निरंक**
पुढील ता.२१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pooja Pranay Kulkarni, Age 55 Yrs. Occu.: Household
2. Praharsh Pranay Kulkarni, Age 28 Yrs. Occu.: Service
Both R/o Ashirwad IMA Hall, Mangilal Plot, Camp Amravati
3. Purva Pranay Kulkarni, (After Marriage Sau.Purva Ajinkya Malasane) Age 32 Yrs. Occu.: Service
R/o Gurukunj Colony, Shegaon Road, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **डॉ.प्रणय प्रकाशराव कुलकर्णी** हे दिनांक 29.07.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पूजा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पूजा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८१९/२०२५
**श्री.प्रमोद अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pramod Bhagwan Borse, Age 53 Yrs. Occu.: Business
R/o Hello Corner Danish Colony, Court Z.P.Road, Amravati.
2. Vinod Bhagwanrao Borse, Age 56 Yrs. Occu.: Service
R/o Rachnashri Apartment, First Floor, Abhinav State Bank Colony, Camp, Amravati.
3. Bharti Anil Ahirrao, Age 58 Yrs. Occu.: Household
R/o Plot No.1761/B, Rajendra Hotel VTC Dhule, Dist.Dhule.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भगवान देवचंद बोरसे** हे दिनांक 06.01.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रमोद अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमोद अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्रीमती कोकीळा श्रीधर काळे,** रा.विजस्नेही कॉलनी, कठोरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी मेसर्स हॉरीझोन किएटर्स, अमरावती तर्फे मुखत्यार योगेंद्र सुरजलालजी देसाई यांचेकडून नोंदणी तुकडी अमरावती व पोटतुकडी अमरावती व अमरावती महानगरपालिका कक्षेतील मौजे शेगांव, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.४८/३ मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे रेव्हेन्यू केस नं.रामाक्र.३४/शेगांव-७६/२०१६-१७ दिनांक २१.०१.२०१७ व मा.तहसीलदार, अमरावती यांचे रेव्हेन्यू केस क्र.रामाक्र.३४/शेगांव/ङ-१/२०१७-१८ दिनांक २१.०८.२०१७ नुसार मंजूर झालेले लेआऊट मधील प्लॉट नं.१ याचे एकुण क्षेत्रफळ १७३०० चौ.फुट (१६०७.२० चौ.मी.) वरील उभारलेल्या हॉरीझोन हाईटस् मधील अप्पर ग्राउंड फ्लोअर वरील दुकान नं.९ याचे क्षेत्रफळ ३३.४६ चौ.,मी. (३६० चौ.फुट) हे खरेदीखत नोंदणी क्र.१२७३/२०, दिनांक ११.०३.२०२० रोजी खरेदी केलेले आहे.

माझे पक्षकार यांचेकडून सदरच्या दुकानाची मूळ खरेदीखत हे बॅकेच्याकामाचे वेळी कुठेतरी गहाळ झालेली आहे. सदर मूळ खरेदीखत गहाळ झाल्याबाबत माझे पक्षकाराने दिनांक २९.०५.२०२५ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती येथे तक्रार नोदविलेली आहे. सदरचे मूळ खरेदीखत गहाळ/हरविले गेल्यामुळे सदर दुकानाचे कुणीही मूळ खरेदीखत दाखवून कोणताही अधिकार निर्माण करीत असल्यास त्यांचेशी कोणताही व्यवहार करु नये तसेच कोणताही हक्क प्रस्थापित करु नये. तसे केल्यास सदरचा व्यवहार हा गैरकायदेशीर समजण्यात येईल.

वर वर्णनीत दुकानाचा कोणीही कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार, गहाण, बोझा व ईतर व्यवहार करु नये. केल्यास तो माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही व होणाऱ्या नुकसानास आपण स्वतः जबाबदार राहाल, करीता जाहीर सूचना.

दिनांक १७.१२.२०२५

**(ॲड.प्रविण एन.बिजवे)**
पोटे टाऊनशिप, कठोरा रोड, अमरावती.
पक्षकाराकरीता अधिवक्ता
मो.नं.९८९०१८४८८९

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### महाविद्यालयात जागतीक एड्स दिन

**अमरावती-**वसुधाताई देशमुख कृषि महाविद्यालय, बोडणा, अमरावती, येथे राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक एड्स दिनानिमीत्य प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. इर्विन चौक, रेल्वे स्टेशन, राजकमल, जयस्तंभ, कॉटन मार्केट, जिल्हा सामान्य रूग्णालय येथे झाली. जागतीक एड्स दिनानिमीत्य विविध मान्यवरांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.जागतीक एड्स दिनानिमीत्य महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धा, पोस्टर मॅकींग, निबंध स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहा. प्रा. स्वाती देशमुख व सहा.प्रा. सौरभ इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी काम केले. या कार्यक्रमाला मा. अध्यक्षा वसुर्धा देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. संजय देशमुख, विनय चौधरी, स.प्र.अ.,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील स्वयंसेवक उपस्थित होते.

### भाऊसाहेबांच्या जयंतीनिमित्त शिबिर

**अमरावती -** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मोर्शी रोड, अमरावती येथील विविध बाह्यरुग्ण विभागांमध्ये (ओ.पी.डी१७.१२ .२०२५ ते ३१.१२.२०२५ पर्यंत विशेष रोगनिदान व शस्त्रक्रिया तसेच जयपुर फुट वाटप (कृत्रिम हातपाय ) शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या कालावधीत येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयातील खालील सेवा सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येईल.ओ.पी.डी नोंदणी शुल्कासह सुपरस्पेशालिटी तपासणी नोंदणी मोफत, बेड चार्जेस सह (आय.सी.यू.वगळता) आय.पी.डी. नोंदणी मोफत ,भरती झालेल्या रुग्णांकरिता नाश्ता सह दुपार व संध्याकाळचे जेवण मोफत, प्रसूती शस्त्रक्रिया व मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत ,रक्त चाचण्या ( ण्ँ,ॅए, ॅत्दद् उेदल्ज ॅ ळेग्हा ॅदलूहा श्ग्म्देम्दज्ज ) मोफत, हृदयरोग संबंधित पहिल्या १० रुग्णांना अँजिओग्राफी व इतर चाचण्या मोफत. जयपूर फूट (कुत्रीम हात पाय ) वाटप मोफत.करिता जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष,हर्षवर्धनजी देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता,डॉ. अनिल देशमुख व रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. पवन टेकाडे व उप-वैद्यकीय अधीक्षक, डॉ. सोमेश्वर निर्मळ यांनी केले आहे.



### पीडीएमएमसी येथे 'Know Your Organs' कार्यशाळेचे आयोजन

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील शरीररचनाशास्त्र विभागाच्या डिसेक्शन हॉल येथे 'Know Your Organs' कार्यशाळेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धनजी देशमुख यांचे मार्गदर्शनात करण्यात आले होते. पीडीएमएमसी येथील शरीररचनाशास्त्र विभाग आणि २०२४ बॅचच्या विद्यार्थ्यांनी Organ Odyssey' माध्यमातून 'Know Your Organs' प्रदर्शनीचे यशस्वी आयोजन केले होते. शाळा-महाविद्यालयांच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी निःशुल्क स्वरूपात असलेल्या 'Know Your Organs' प्रदर्शनीबद्दल समाधान व आनंद व्यक्त केला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शरीररचनाशास्त्र विभागातील डॉ. गितांजली यादगीरे, डॉ. सरिता कडू, डॉ. अनंत काळबांडे, डॉ. अंकुर अग्रवाल, डॉ. ऋग्वेदा ठाकरे, डॉ. साक्षी भोजने, दिपाली गोरले, विलास भाकरे, रणजीत ढेपे, अंकुश लुगे, सुरेश मानकर वे विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### टोंगलापूर फाटा, मासोद येथे जिल्हा स्तरीय स्वदेशी क्रीडा स्पर्धा आयोजित

**आसेगाव पूर्णा-** सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था द्वारा संचालित पयोष्णी गुरुकुलम प्राथमिक मराठी शाळा व निवासी मूकबधिर विद्यालय टोगलापुर फाटा, मासोद तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २२ २३ व २४ डिसेंबर रोजी 'स्वदेशी क्रीडा ' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता ३री व ४ थी च्या विद्यार्थ्यांकरिता या स्पर्धा होत आहेत.यामध्ये सांघिक व वैयक्तिक असे खेळ घेण्यात येत आहे. आज मोबाईल वरील आभासी खेळामध्ये मातीतील खेळ हरवत आहे. अनेक पिढ्यांना घडविणारा खेळांचा हा समृद्ध वारसा जपता यावा आणि पुढील पिढ्यांना देता यावा. मातीतील खेळ कुठेतरी लोप पावत चाललेले आहे आणि हा वारसा असा कायमस्वरूपी टिकून राहावा आणि प्रत्येक मुलापर्यंत कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचावा हाच या स्पर्धेमागचा उद्देश. सदर स्पर्धा दिनांक २२ डिसेंबर २०२५ ; कबड्डी, पोत्याची शर्यत, लंगडी, २३ डिसेंबर-रस्सीखेच, लगोरी,धावण्याची शर्यत. २४ डिसेंबर- दोरीवरील उड्या, खोखो, लांब उडी. बक्षीस सांघिक खेळ,प्रथम चषक, द्वितीय चषक. ,वैयक्तिक खेळ. प्रथम मेडल ,द्वितीय मेडल, सांघिक गुणाच्या आधारे विजेता संघाला शालेय स्तरावर फिरता चषक देण्यात येईल. संपर्क माधुरी बोरवार ९६३७९९४३४२, मोहन मोरे ९६८९६४३७७३, भूषण दादा जाणे ९२८४४८७८९०, वंदना मोहोड मॅडम ८६०५२८६६२५ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नया अकोलाच्या 'श्रद्धा भूमी'वर विकासावर चर्चा

# 'रमाई एक्सप्रेस'साठी प्रयत्न करणार-वासनिक

**अमरावती/क्रा.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील नया अकोला या गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिस्मारक असूनही त्याची माहिती अद्याप सर्वदूर पोहोचलेली नाही. मात्र माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या 'अभिवादन यात्रे'मुळे नया अकोला 'श्रद्धा भूमी' म्हणून नव्याने ओळख निर्माण झाली आहे. या श्रद्धा भूमीचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार मुकुल वासनिक यांनी केले.



नवी दिल्ली येथे खासदार मुकुल वासनिक यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीत ते बोलत होते. अनु. जाती विभागाचे अध्यक्ष प्रवीण मनोहर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने वासनिक यांची भेट घेऊन नया अकोला श्रद्धा भूमीच्या विकासाबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी अकोला जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे हेही आवर्जून उपस्थित होते.बैठकीदरम्यान श्रद्धा भूमीच्या विकासासाठी आवश्यक मूलभूत सुविधा, भाविकांसाठी सोयी-सुविधा, पायाभूत विकासकामे, पर्यटनदृष्ट्या स्थळाचा विकास तसेच राष्ट्रीय पातळीवर या पवित्र स्थळाची ओळख निर्माण करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. श्रद्धा भूमीच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.दरम्यान, रमाई जयंतीच्या निमित्ताने 'नागपूर-मडगाव एक्सप्रेस' ही रेल्वे सात दिवसांसाठी 'रमाई एक्सप्रेस' म्हणून चालविण्यात यावी, अशी मागणी अनु. जाती विभागाकडून करण्यात येत आहे. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत खासदार मुकुल वासनिक यांनी, 'रमाई एक्सप्रेससाठी मी स्वतः आणि खासदार बळवंत वानखडे दोघेही सातत्याने प्रयत्न करू,' अशी ठाम ग्वाही दिली.या बैठकीला जिल्हा अनुसूचित जाती विभागाचे प्रवीण मनोहर, राहुल उके, सुकुमार खंडारे, अमोल गुळधे, अविनाश गवई, गौतम दाभाडे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. श्रद्धा भूमीच्या विकासामुळे आणि रमाई एक्सप्रेसच्या मागणीमुळे सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक चळवळीला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

### रमाई जयंतीसाठी हवी 'नागपूर-मडगाव एक्सप्रेस'

'रमाई' म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर. रमाबाई यांचे जन्मगाव वनंद हे दापोली तालुक्यात असून रमाई जयंतीनिमित्त विदर्भासह राज्यातील आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने वनंद येथे जात असतात. मागील वर्षी यशोमती ठाकूर यांच्या पुढाकाराने शेकडो कार्यकर्त्यांनी वनंद येथे जाऊन रमाई जयंती उत्साहात साजरी केली होती.सध्या नागपूरहून नागपूर-मडगाव एक्सप्रेस आठवड्यातून दोन दिवस धावते. रमाई जयंतीच्या निमित्ताने एक आठवडाभर या एक्सप्रेसचे 'रमाई एक्सप्रेस' असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी अनुसूचित जाती विभागाकडून करण्यात येत आहे.

## श्रीरामचंद्र संस्थानचा आदर्श उपक्रम

# अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या इंधनाची मोफत व्यवस्था

**नांदगावपेठ/वार्ताहर**

येथील अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक श्रीरामचंद्र संस्थानने समाजहिताचा एक महत्त्वपूर्ण आणि मानवतावादी उपक्रम सुरू केला आहे. अंत्यसंस्काराच्या दुःखद प्रसंगी लागणाऱ्या इंधनासह आवश्यक साहित्याची व्यवस्था संस्थानच्या वतीने करण्यात येत असून, त्यामुळे शोकाकुल कुटुंबीयांना मोठा आधार मिळत आहे.

वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय तसेच संतश्री गुलाबराव महाराज यांच्या उपासनेचे केंद्र असलेले श्रीरामचंद्र संस्थान हे धार्मिकतेबरोबरच सामाजिक कार्यासाठीही परिचित आहे. वर्तमान काळात नांदगावपेठ व परिसरातील पंचक्रोशीमध्ये दुर्दैवाने मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी लागणारे इंधन व अन्य साहित्य मिळवताना कुटुंबीयांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन, मृत्यूसारख्या दुःखद प्रसंगी शोकाकुल कुटुंबीयांना अधिक अडचणींना सामोरे जावे लागू नये, या सेवाभावी उद्देशाने श्रीरामचंद्र संस्थानने लाकूड, इंधन, गोवरी, तु-हाटी आदी साहित्याची व्यवस्था संस्थानच्या वतीने उपलब्ध करून दिली आहे.या उपक्रमाचा आतापर्यंत अनेक कुटुंबीयांनी लाभ घेतला असून, संस्थानच्या या सेवेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. संस्थानच्या या सेवाभावी कार्याबद्दल ग्रामस्थांकडून कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे. गावातील कोणत्याही व्यक्तीला मृत्यूसारख्या दुःखद प्रसंगी अधिक त्रास होऊ नये, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे संस्थानने स्पष्ट केले आहे.या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समाजप्रेमी बांधवांनी व ग्रामस्थांनी लाकूड, गोवरी, तु-हाटी किंवा यथाशक्ती आर्थिक स्वरूपात योगदान द्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. संस्थानने ही व्यवस्था व्यापक स्वरूपात केली असून, आजूबाजूच्या गावातील नागरिकांनाही या सेवेचा लाभ घेता येणार आहे. यासाठी संबंधितांनी श्रीरामचंद्र संस्थानशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थानचे प्रमुख प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी केले आहे.

# मनपा आयुक्तांकडून उत्तर झोन कार्यालयाची पाहणी

**अमरावती/का.प्र.**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिका उत्तर झोन क्र. १ कार्यालयाची सखोल पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया सुचारू, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या तयारीचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. या पाहणीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक नियोजनाशी संबंधित विविध बाबींवर अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. मतदान केंद्रांची निवड, त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या मूलभूत सुविधा, मतदारांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी, मतदान यंत्रांची सुरक्षितता, मनुष्यबळाचे योग्य नियोजन तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपाययोजना करण्याच्या आराखड्याची माहिती त्यांनी घेतली. निवडणूक कामकाजात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी सर्व विभागांनी वेळेत आणि समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.निवडणुकीच्या काळात नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याच्या सूचना आयुक्त चांडक यांनी दिल्या. तसेच दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व महिला मतदारांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. कोणत्याही प्रकारची



हलगर्जीपणा किंवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.या पाहणीमुळे निवडणूक तयारीला अधिक गती मिळणार असून प्रशासन सज्ज असल्याचा सकारात्मक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला आहे. आगामी निवडणुका सुरळीत आणि शांततेत पार पडाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.या पाहणी दरयान निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती श्रध्दा बबन उदावंत उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता आशिष अवसरे, अजय विंचुरकर, अभियंता आनंद जोशी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# आयुक्तांनी घेतला शहरातील साफसफाई व अतिक्रमणाचा आढावा

**अमरावती/का.प्र.**

शहर स्वच्छ, सुंदर व अतिक्रमणमुक्त ठेवण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी शहरातील प्रमुख भागांची सविस्तर पाहणी केली. या पाहणीदरम्यान जयस्तंभ चौक ते जुना कॉटन मार्केट, चौधरी चौक, विलास नगर तसेच गाडगेनगर परिसराचा आयुक्तांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.



पाहणीदरम्यान शहरातील साफसफाईची सद्यास्थिती, रस्त्यांची अवस्था, सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा तसेच वाहतूक व नागरिकांच्या दैनंदिन वर्दळीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. काही ठिकाणी साफसफाईची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देत स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.विशेषतः गाडगेनगर परिसरात उभे असलेले कंटेनर तात्काळ हटविण्याचे आदेश आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिले. या कंटेनरमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून परिसरातील नागरिकांना गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.तसेच पाहणीदरम्यान शहरातील विविध भागांत अतिक्रमणाची समस्या गंभीर असल्याचे आढळून आले. यावर कठोर भूमिका घेत आयुक्तांनी संबंधित विभागांना कोठेही अतिक्रमण आढळून आल्यास त्वरित व प्रभावी कारवाई करून अतिक्रमण हटविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. अतिक्रमणामुळे शहराचे सौंदर्य व शिस्त बाधित होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो, असेही त्यांनी नमूद केले.शहर स्वच्छता, सुयोग्य नियोजन व अतिक्रमणमुक्त वातावरण राखण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून यापुढेही अशा प्रकारच्या नियमित पाहण्या व कठोर कारवाया करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.या पाहणीमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक मजबूत होणार असून अतिक्रमणावर नियंत्रण मिळविण्यास प्रशासनाला बळ मिळणार असल्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.या पाहणीदरम्यान वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डिक्याव, श्रीकांत डवरे, स्वास्थ निरीक्षक तसेच मनपा कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या आचार्य पदवी प्रवेशास मुदतवाढ

# अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आचार्य पदवी प्रवेशाची अधिसूचना यापूर्वी प्रकाशित करण्यात आलेली आहे. तथापि विनंतीवरुन प्रवेशाच्या तारखेत मुदतवाढ देण्यात येत असून सुधारित वेळापत्रकानुसार महाविद्यालयात/संशोधन केंद्रात ३१ मार्च, २०२६ पर्यंत उमेदवारांना प्रवेशित होता येईल. ऑनलाईन एन्रोलमेंट अर्ज दि. १ ते १५ एप्रिल, २०२६ पर्यंत, पीएच.डी. कोर्स वर्क दि. १६ एप्रिलपासून, तर पोर्टलवर गुण/क्रेडिटस् भरण्याची तारीख १ ते १० ऑगस्ट, २०२६, कोर्स वर्क पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे १५ ऑगस्ट पर्यंत आणि विद्यापीठास सिनॉप्सिस सादर करण्याची तारीख १६ ते ३१ ऑगस्ट, २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. निदेश क्र. ४१/२०२५ नुसार ज्या संशोधन केंद्रांमध्ये इतर महाविद्यालयातील मार्गदर्शक रुजू असतील त्यांना नवीन संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी करुन घेता येणार नाही, याची दक्षता महाविद्यालय व संशोधन केंद्रांना घ्यावयाची आहे. जर नोंदणी केल्यास ती कोणत्याही क्षणी रद्द करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय/संशोधन केंद्रांची राहील, याची संबंधितांनी नोंद घ्यावयाची आहे. महाविद्यालय/संशोधन केंद्रांना सूचित करण्यात येते की, नामांकन पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कोर्स वर्क करिता नोंदणी करण्यात यावी. नामांकन न झालेल्या विद्यार्थ्यांचे कोर्स वर्क पूर्ण झाले.

# भीमाकोरेगाव मानवंदना कार्यक्रमाची आढावा बैठक

## सामाजिक संघटना, माजी सैनिक, समता सैनिक दलाचा मोठा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

जानेवारीमधील १, २ व ३ रोजी सायन्स कोर मैदान, अमरावती येथे होणाऱ्या विश्वविक्रमाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भीमाकोरेगाव मानवंदना कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस विविध सामाजिक संघटना, माजी सैनिक, समता सैनिक दलाचे पदाधिकारी व प्रतिनिधी यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला.

मागील १४ वर्षांपासून अमरावती येथे सातत्याने भीमाकोरेगाव मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून, यंदाही हा कार्यक्रम भव्य व ऐतिहासिक स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. माजी सैनिक संघटना व समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा त्यांच्या कुटुंबीयांसह २ जानेवारी रोजी सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी समाजभूषण पुरस्कार वितरण समिती स्थापन करण्यात आली असून समाजभूषण पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्याचे आवाहन करण्यात आले. या बैठकीत तीन दिवसीय कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून पहिल्या दिवशी दि.१ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता समता सैनिक दल व माजी सैनिकांच्या वतीने मानवंदना देण्यात येणार असून, सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध गायिका कडूबाई खरात, अभिजीत राजे, राहुल शिंदे व विपिन तातड यांचा संगीत मैफलीचा कार्यक्रम होणार आहे.

दुसऱ्या दिवशी दि.२ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा, तर सायंकाळी ६ वाजता आधुनिक प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे प्रबोधनात्मक विचारमंथन व गायक अजय देहाडे यांचा 'भीमा कोरेगाव' संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तर ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. बैठकीचे प्रास्ताविक धनंजय गुळदेकर यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश अंभोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन बबिता डोंगरदिवे यांनी मानले. या बैठकीस कैलास मोरे, रमेश कटके, धनंजय गुळदेकर, कपिल धवणे, मनीष गुडदे, सुमित कांबळे, मंगेश तायडे, व्ही. एम. वानखडे, कृष्णराव वानखडे, भानुदास वानखडे, सिद्धार्थ चोरपगार, किशोर सरदार, देवेंद्र रामटेके, सफीभाई सौदागर, यशवंत बादशाह, प्रशांत तायडे, रमेश कटके ,धनंजय गुडदेकर, सफीभाई सौदागर, किशोर सरदार, गौतम वानखडे, प्रेमचंद इंगळे शांतरक्षक गवई, सुमेध कांबळे, प्रवीण आठवले, प्रकाश खरुले, अँड.प्रभाकर वानखडे, उदयभान गजभिये, संजय बनसोड, रुपेश भिवगडे, संजयभाऊ गडलिंग, राजकुमार वरघट,बंडूभाऊ चोटपगार, सचिन मुन, पंकज धर्माजी वंजारी, देवेंद्र रामटेके,मंदा गवई ,बबीर्ता डोंगरदिवे ,सुवर्णा गावंडे ,वंदर्ना चव्हाण, माधुरी डोंगरे, मंगर्ला डोंगरे, सविता आमटे ,प्रतिभा गेडाम, उषा लांडगे, अनुराधा वरघट, कल्पना बनकर, आरती ठाकूर, ममता किर्तकार, माधुरी इंगळे, अर्चना जवंजाळ, चंदा मकेश्वर, छाया गाडेकर, प्रतिभा वानखडे, बबीता तायडे, नंदा वानखडे, तृप्ती वानखडे, तेजू ठाकूर, रिया वरघट, रुचिका दामोधरे, यांच्यासह असंख्य महिला-पुरुष प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन कारसह दुचाकीचा भीषण अपघात




### -वाठोडा खुर्द गावाजवळील घटना

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** कुऱ्हा ते तिवसा मार्गावर असलेल्या वाठोडा खुर्द गावा नजीक १६ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजता दरम्यान दोन कार सह एका दुचाकीचा भीषण अपघात झाला. यात एकजण जागीच ठार असून पाच जण जखमी असल्याची माहिती पुढे येत आहे. अनिल शेषराव खारकर (वय ६६ रा. वाठोडा खुर्द) असे अपघातातील मृतकाचे नाव असून दुचाकीवरील अजय बबन चव्हाण (वय ३०), रोशन श्रीधर चव्हाण (वय २९), शुभम विजय इंगोले (वय ३०), सर्व रा. घोटा, नॅनो कारचालक चंद्रशेखर मनोहर ठाकूर (वय ५४ रा. सातरगाव), तसेच स्कोडा कारचालक दीपक सुभाष पडोळे (वय ३६ रा. कुऱ्हा), निलेश केशवराव लोंदे (वय ४२रा. वाठोडा खुर्द) अशी सहा जखमीची नावे आहे.



प्राप्त माहिती नुसार घोटा येथील तीन मित्र हे एम एच २७ बी ए १०५६ क्रमांकाच्या युनिकॉर्न दुचाकीने गावी जातं होते, याच दरम्यान कुऱ्हा वरून येणाऱ्या एम एच २७ एआर ३५०२ क्रमांकाच्या नॅनो कार व दुचाकीची समोरासमोर धडक झाली. ज्यात घोटा येथील तीनही मित्र गंभीररित्या जखमी झाले. यावेळी मदतीसाठी वाठोडा खुर्द येथील युवक काँग्रेसचे कार्यकर्ते लुकेश केने हे घटनास्थळी दाखल ☞(पान २ वर)

# व्यापाऱ्याला १६.५३ लाखांने फसवणारा ताब्यात

## आंतरराज्यीय टोळीशी आरोपीचे घनिष्ठ संबंध



**अमरावती/प्रतिनिधीः-** व्हॉट्स ॲपवर आलेल्या बनावट संदेशातून मोबाईल हॅक करून तब्बल १६ लाख ५३ हजारांहून अधिक रकमेची

### -सायबर पोलिसांची यशस्वी कामगिरी

ऑनलाइन फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार अमरावतीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी क्रेडिट कार्डद्वारे रक्कम ट्रान्सफर करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर टोळीतील एका मुख्य आरोपीला☞(पान २ वर)

# दर्यापूर येथील राष्ट्रीय लोक न्यायालयात १२७ प्रकरणे निकाली





**खल्लार/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे दर्यापूर येथे तालुका विधि सेवा समितीच्यावतीने लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर लोक न्यायालयामध्ये एकाच दिवशी १२७ प्रकरणांमध्ये समझोता घडवून आणण्यात आला व सदर प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. न्यायालयात प्रलंबित असलेली ९७ प्रकरणे व ३० दाखलपूर्व प्रकरणे निकाली ☞(पान २ वर)

> सदर लोक न्यायालयामध्ये आपले प्रकरण तडजोडीने मिटविण्यासाठी एक वृद्ध अपंग पक्षकार आला होता. तिसऱ्या मजल्यावर पायऱ्या चढून तो जावु शकत नव्हता. जिल्हा न्यायाधीश सत्यवान डोके हे स्वतः तीन मजले खाली उतरून त्याच्याजवळ पोहोचले व त्याचे प्रकरण तडजोडीने निकाली काढले.

# महसूल मंत्री बावनकुळे यांच्या विरोधात अधिकाऱ्यांचा एल्गार

### -१९पासून काम बंदचा इशारा

### -निलंबन सत्राविरुद्ध आक्रोश



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात व बाहेर महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा सपाटा लावला आहे. यामुळे महसूलचे अधिकारी व कर्मचारी दहशतीखाली काम करीत आहे. यामुळे अखेर महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महसूल मंत्री बावनकुळे यांच्याविरुद्ध एल्गार पुकारलाय आहे. आज बुधवार १७ डिसेंबर रोजी राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेले निलंबन रद्द करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. मागणी पूर्ण न झाल्यास १९ तारखेपासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काही यशस्वी तोडगा काढतात काय याकडे राज्याच्या महसूल खात्यासह प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे.

निवेदनानुसार महसूलमंत्री मार्फत विधिमंडळात अधिकारी व कर्मचारी यांच्या विनाचौकशी होणाऱ्या निलंबनाच्या घोषणा तथा महसूल विभागाच्या दिर्घकालीन प्रलंबित असलेल्या आर्थिक ☞(पान २ वर)

# पोलीस आयुक्तांनी खोलापुरी गेट ठाण्याची केली पाहणी

## पवन वानखडे हत्याकांडाचीं घेतली माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवीन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी मंगळवारी दुपारी आपला पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारतानाच ते ॲक्शन मध्ये आले. त्यांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्याला सरप्राईज विजिट दिली. त्यांनी प्रॉपर्टी ब्रोकर पवन हत्याकांडाचा तपासाची विस्तृत माहिती घेतली. या भेटीदरम्यान ☞(पान २ वर)





# ट्रकच्या धडकेत ऑटो पुलाखाली कोसळला

### बाभळी येथील घटना, सुदैवाने जिवित हानी टळली

**खल्लार/प्रतिनिधीः-** अकोट-दर्यापूर मार्गावरील सिद्धार्थ नगर समोरील बाभळीच्या पुलावरून एक ऑटो पुलाखाली कोसळल्याची धक्कादायक घटना बुधवारीं (दि.१७) दुपारच्या सुमारास घडली आहे .या अपघातात ऑटो चालक व एक प्रवासी महिला ही किरकोळ जखमी झाले आहेत.



अकोट कडून दर्यापूरकडे येत असलेल्या ☞(पान २ वर)

### श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयांमध्ये

# आजपासून डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा महोत्सव

**अमरावती/प्रतिनिधीः-** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी येत्या १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त वार्षिक भव्य ' क्रीडा महोत्सवाचे' आयोजन श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक , कनिष्ठ



महाविद्यालयातील सुमारे १५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन १८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबु इंगोले यांच्या हस्ते होईल.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. तनुजा राऊत, प्र-संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संत गाडगेबाबा ☞(पान २ वर)

# राजापेठ उड्डानपुलावर अपघातात एक ठार, दुसरा जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ उड्डाणपुलावरील रस्त्यावर सोमवारी दुपारी दुचाकींचा भीषण अपघात झाला, ज्यामध्ये एकाचा मृत्यू झाला तर एक जखमी झाला. संजय शिरोदचंद्र रॉय (वय ३५, रा. पश्चिम बंगाल) असे मृताचे नाव असून, जखमी कार्तिक अजय नाईसेला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राजापेठ उड्डानपुलावर हा वाहनांचा अपघात घडला. या अपघातामध्ये जखमी झालेल्या युवकाचे नाव कार्तिक अजय नाईसे (वय २४, रा. खेरडा जयपूरे, कारंजा लाड) ☞(पान २ वर)




# मनपा प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज

## ६ लाख ७७ हजार १८० मतदार निवडणार ८७ नगरसेवक

### -आयुक्त सौम्या शर्मा यांचे नियोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य निवडणूक आयोगाद्वारे महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यानंतर महापालिका प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज झाले आहे. ६ लाख ७७ हजार १८० मतदार २२ प्रभागातून ८७ नगरसेवक निवडतील. यामध्ये पुरुष ३ लाख ३७ हजार ९३५ तर महिला ३ लाख ३७ हजार १७७ व इतर ६८ मतदार आहेत. अशी माहिती आयुक्त सौम्या शर्मा यांनी आज बुधवार १७ डिसेंबर रोजी आयोजित एका पत्रकार परिषदेत दिली.



त्यांनी सांगितले की, निवडणूक कार्यक्रम घोषित होताच आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. २२ प्रभागातील उमेदवारांसाठी ७ ठिकाणी नामांकन पत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. महापालिकेचे नियमित ५ झोन व्यतिरिक्त तहसील कार्यालय मध्ये नामांकन भरले जाऊ शकतील. २३ ते २९ डिसेंबर पर्यंत नामांकन दाखल करण्यात येईल, २५ डिसेंबरला क्रिसमस व २८ डिसेंबरला रविवार असल्याने दोन दिवस सुट्टी राहील. उत्तर झोन रामपुरी कॅम्प मध्ये प्रभाग १, २ व ५, नवीन तहसील कार्यालय मोर्शी रोड येथे ३, ४, ७, राजापेठ मध्य झोंन मध्ये ११, १२, १८, पूर्व झोन क्रमांक तीन दस्तूर नगर मध्ये ८, ९, १०, अंबापेठ येथील मनपा पालिका☞(पान २ वर)

# वडाळी व जनता कॉलनीत अवैध दारूवर कारवाई

### -१.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढलेल्या अवैध दारू तस्करी व विक्री विरोधात कार्यवाही करण्याचे आदेश सर्व ठाणेदारांना देण्यात आले आहे. त्यानुसार फ्रेजरपुरा व राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी कार्यवाही करून १ लाख ४५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. ☞(पान २ वर)



# कत्तलीकरिता बांधून ठेवलेल्या २६ गोवंशाला जीवदान

### सुफी नगरमध्ये गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगांव मार्गावरील सुफी नगरमध्ये एका गोठ्यात कत्तली करिता निर्दयतेने २६ गोवंशाला बांधून ठेवण्यात आले होते. गुन्हे शाखेच्या पथकाने येथे कार्यवाही करून ५ लाख २० हजार किंमतीचे २६ गोवंशाला जीवदान दिले आणि आरोपी मोहम्मद साकीब मोहम्मद जाकीर (वय २१, कसाबपुरा ) याला ताब्यात घेतले. माहितीनुसार गुन्हे शाखेचे पथक वलगांव हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की सुफी नगर येथे एका



गोठ्यात कत्तलीसाठी गोवंशाची साठवणूक करण्यात आली आहे. यावरून पथकाने सुफी नगर येथे आरोपी मोहम्मद साकीब ☞(पान २ वर)

